इ/१५८

Rewarded No.

# तीन तत्त्वज्ञानी.

गोविंद चिमणाजी भाटे.

च-२९९
००९०५

No 27 38/1921/22
Received on 7-1-22
क६६८
इ/१९४५

# तीन तत्त्वज्ञानी.

लेखकः
**गोविंद चिमणाजी भाटे, एम्. ए.**
प्रिन्सिपाल, विलिंगडन कॉलेज, सांगली.

---

मुद्रक व प्रकाशकः
**केशव रावजी गोंधळेकर,**
'जगद्धितेच्छु प्रेस', ५०७ शनवार, पुणें.

---

( सर्व हक्क स्वाधीन. )

प्रथमावृत्ति.

---

सन १९२१.

---

किंमत बारा आणे.

६/१५८

# प्रस्तावना.

अलीकडील मासिकांतील किंवा वर्तमानपत्रांतील औषधांच्या जाहि-राती पहा, देशी परदेशी औषधांच्या दुकानदारांच्या विक्रीकडे नजर फेंका, वैद्य-डॉक्टरांच्या औषधांच्या पाठांचें निरीक्षण करा, किंवा सध्यां आमच्या लोकांच्या खाण्यापिण्यांत येणाऱ्या पदार्थांकडे लक्ष द्या, या सर्वांवरून आमच्यामध्यें अग्निमांद्याचा किती फैलाव झाला आहे, हें स्पष्ट दिसून आल्याखेरीज राहणार नाहीं. अलीकडे लोकांची खाण्यापिण्याची लालसा वाढली आहे. पूर्वींचा एकभुक्त राहण्याचा, किंवा निवळ दोन वेळ भोजन करण्याचा प्रघात आतां बहुधा गेला आहे. प्रवासांत दिवसचे दिवस—धार्मिक सम-जुतीनें म्हणा, किंवा कडक सोंवळ्याओंवळ्याच्या कल्पनांनीं म्हणा—उपास काढण्याचा प्रचार मोडला आहे. आगबोटींत व आगगाडींत ब्राह्मण—मंडळी सुद्धां महाराच्या मांडीला मांडी लावून नाहीं—तरी अस्पृ-श्यांच्या स्पर्शाचा विधिनिषेध मनांत न आणतां यथास्थित फराळ करतांना दृष्टीला पडतात. पण या खाण्यापिण्याच्या लालसेबरोबर खाल्लेले पदार्थ पचविण्याची शक्ति मात्र बरीच कमी झालेली दिसते, किंवा ती वाढलेली तरी नाहीं. यामुळेंच सकस अन्न अलीकडच्या मंडळीला पचत नाहीं व मग अर्थातच तें पचविण्याकरतां त्यांना पाचक औषधांचा आश्रय करावा लागतो. खावयाची तर हौस आणि खाल्लेलें पचत तर नाहीं ! तेव्हां अगदीं पचलेलें हलकें अन्न तरी खावें, किंवा सकस अन्नाला पच-विणाऱ्या औषधांचा आश्रय तरी करावा, अशी स्थिति झाली आहे.

जशी शरीराला ही गोष्ट लागू आहे, तशीच अलीकडील मंडळीच्या मनालाही लागू आहे. ज्याप्रमाणें खाण्यापिण्याची हौस वाढली आहे, पण त्याबरोबरच अग्निमांद्य वाढलें आहे, त्याचप्रमाणें आमच्यांत अलीकडे वाचनाभिरुचि वाढली आहे, पण त्याबरोबरच मनोमांद्यहि वाढलें आहे. गेल्या पांचपंचवीस वर्षांत देशांत शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें झाला

आहे, साक्षरांची संख्या भूमितिश्रेढीनें वाढत आहे, आणि यामुळें वाचनाची गोडी लोकांना लागत आहे. मात्र बहुतेक लोकांना वाचावयाचीं पुस्तकें शास्त्रीय, ऐतिहासिक, निबंधपर चालत नाहींत; कारण अशा वाचनाला थोडे मानसिक श्रम लागतात. तेव्हां असे ग्रंथ जरा जड वाटतात, व ते आम्हांला पचत नाहींत. पण कल्पित कथा, मनोरंजक गोष्टी, कादंबऱ्या आणि नाटकें, हीं वाचावयाला चालतात. कारण हीं वाचण्याला हलकीं जातात. आरामखुर्चीवर पडून सहज अर्धवट झोंपेंत मनाला त्रास न देतांही अशीं पुस्तकें भराभर वाचतां येतात. यामुळें गेल्या पांच-दहा वर्षांत अशा वाङ्मयाचा महाराष्ट्रांत अगदीं पाऊस पडूं लागला आहे ! निवळ करमणूक करणारीं अशीं नवीं नवीं मासिकें प्रत्यहीं निघत आहेत, आणि त्यांची संख्या आज बरीच झाली आहे. गोष्टी वाचतांना सुद्धां कमी त्रास व्हावा, म्हणून त्या गोष्टींना चित्रांची जोड देण्याचीही प्रवृत्ति वाढत आहे. अशा नियतकालिक मासिकांखेरीज किती तरी माला प्रसिद्ध होत आहेत. हें सर्व वाङ्मय इतक्या घाईनें आणि जलदीनें प्रसिद्ध होत आहे कीं काहीं विचारूं नका ! एका मालेचीं दोन चार पुष्पें निघालीं नाहींत, तों दुसरी माला निघते ! 'एकआणामाला' निघाली कीं तिच्या पाठोपाठ 'अर्धाआणामाला', 'पैसामाला' निघते ! कुसुममाला निघाली कीं, तिचे लागोपाठ पुष्पमाला ठेवलेलीच ! या सर्व माला म्हणजे लहान लहान गोष्टी होत, व या इतक्या जलद निघतात तरी कशा ? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. या स्वयंस्फूर्तीनें प्रतिभारूपी जिवंत झऱ्यापासून निघालेल्या नसतात. त्या अशा असत्या तर निदान आमच्या मनःसामर्थ्याचें व जोमाचें आविष्करण झालें असतें. पण यांतील बहुतेक गोष्टी इंग्रजी मासिकांतून व इंग्रजी पुस्तकांवरून कशा तरी रूपांतर करून घेतलेल्या असतात, व असें रूपांतर करतांना गोष्ट चोरलेली दिसूं नये म्हणून त्यांत अद्भुत प्रसंग घालून त्या गोष्टी जास्त चटकदार करण्याचा प्रयत्न केलेला असतो, किंवा आपल्या इकडील सन्मान्य व्यक्तींच्या किंवा सुधारणेच्या टवाळीचा गरमागरम मसाला घालून तरी त्या गोष्टी चवदार केलेल्या असतात.

पण या वाङ्मयाच्या दिखाऊ प्रसारावरून आमचें मनोमांद्य मात्र

दिसून येतें. लेखकामध्येंहि जीवंत प्रतिभा दिसून येत नाहीं. वाचकांना करमणुकीपलीकडे कांहीं चालत नाहीं व करमणूक करण्याचें साधन म्हणजे काल्पित गोष्टी, असाच अलीकडे सर्वसाधारण समज झाल्यासारखा दिसतो ! पण सत्यज्ञान देणारें कोणतेंहि वाङ्मय असो, तें तथ्य असून प्रिय असतें, हें विसरतां कामा नये. केव्हां केव्हां काल्पितापेक्षां सत्यच जास्त आश्चर्यकारक असतें व या दृष्टीनें इतिहास व चरित्रें हीं कमी करमणुकीचीं साधनें नाहींत. पण हल्लींच्या वाचकांची प्रवृत्ति अशी आहे कीं मथळ्यावरून एखादा लेख चरित्रात्मक किंवा इतिहासात्मक अथवा शास्त्रीय दिसला कीं, त्याकडे कानाडोळा करून एकदम कल्पिताकडे धांव घ्यावयाची ! पण चरित्रें सुद्धां काल्पितापेक्षांही जास्त मनोरंजक असतात हें दाखवण्याकरतां या लेखमालेचा उद्देश आहे."

वरील उपोद्घात मी मासिक मनोरंजनांत कांहीं तत्त्वज्ञान्यांचीं चरित्रें लिहितांना लिहिला होता. या चरित्रमालेंत पांच सहा चरित्रें लिहिण्याचा विचार होता. त्यांपैकीं तीन चरित्रें लिहून झालीं होतीं. त्या चरित्रांपैकीं दुसऱ्या दोन चरित्रांना त्या त्या तत्त्वज्ञान्यांच्या तत्त्वज्ञानाची थोडीशी माहिती जोडून हीं चरित्रें 'तीन तत्त्वज्ञानी' या नांवानें प्रसिद्ध करावीं असें मनांत आल्यावरून हीं आज पुस्तकरूपानें प्रसिद्ध करीत आहें. प्रथमतः हीं चरित्रें लिहिलीं तेव्हां तीं यदृच्छया निवडलीं होतीं,पण आतां तीं एकत्र छापतांना न कळत कां होईना एक प्रकारची संगति यांत आली आहे असें वाचकांस दिसून येईल. या चरित्रांतील 'तीन तत्त्वज्ञानी' हे निरनिराळ्या देशांतील व निरनिराळ्या काळांतील आहेत हें खरें, तरी पण ते आपापल्या काळचे 'पर्वकर्ते तत्वज्ञानी' (Eyoch-molsing philosophers ) आहेत. तसेंच ते तिघेही 'चेतनवादी' आहेत. शेवटीं त्यांचीं चरित्रेंहि स्फूर्तिदायक आहेत, असें वाचकांस दिसून आल्याखेरीज राहणार नाहीं.

गोविंद चिमणाजी भाटे.

# अनुक्रमणिका.


१ साक्रेटीस .... .... .... १-५६
१ इतिवृत्त .... .... .... १
२ साक्रेटिसावरील खटला व त्याचा निकाल .... .... ११
३ साक्रेटिसाचा तुरुंगवास .... .... २३
४ साक्रेटिसाचा मृत्यु .... .... ३१
५ फलश्रुति .... .... .... ४६
२ जॉर्ज बार्क्ले .... .... .... ५७-७९
१ अल्प चरित्र .... .... ५७
२ बार्क्लेचें तत्त्वज्ञान .... .... ७०
३ कँट .... .... .... .... ८०-११५
१ जीवन-वृत्तांत .... .... ८०
२ कँटच्या पूर्वीचें तत्त्वज्ञान .... ९४
३ कँटचें तत्त्वज्ञान .... .... १०१

# तीन तत्त्वज्ञानी.

## साक्रेटिस.

(१)

### इतिवृत्त.

'जेथ जेथें धूर आहे, तेथें तेथें विस्तव आहे, पर्वतावर धूर आहे, म्हणून पर्वतावर विस्तव आहे.' संस्कृत तर्कशास्त्रज्ञांचें हें ज्याप्रमाणें अनुमानाचें एक आवडतें उदाहरण आहे, त्याप्रमाणेंच 'सर्व माणसें मरणाधीन आहेत, सॉक्रेटीस माणूस आहे, म्हणून तो मरणाधीन आहे.' हें इंग्रजी तर्कशास्त्रज्ञाचें अनुमानाचें आवडतें उदाहरण आहे. यामुळें साक्रेटिसाचें नाव आमच्या सर्व सुशिक्षिताच्या अत्यंत परिचयाचें झालेलें आहे हें खरें आहे. पण 'अतिपरिचयादवज्ञा' या म्हणीची सत्यता या ठिकाणीं दिसून येते. म्हणजे जरी साक्रेटिसाचें नांव सर्वतोमुखीं झालेलें आहे तरी त्याच्याबद्दलची माहिती मिळविण्याची जिज्ञासा आमच्यांतील फारच थोड्यांमध्यें दिसून येते.

परंतु युरोपांत या पुरुषाची माहिती आबालवृद्धांस आहे. कारण ग्रीक भाषेमध्यें झेनाफन व प्लेटो या दोन ग्रंथकारांनीं सॉक्रेटिसाच्या चरित्रावर व विशेषतः त्याच्या मनोरंजक व उपदेशपर संभाषणांवर सर्वमान्य ग्रंथ लिहिले आहेत. यामुळें जोंपर्यंत ग्रीकभाषा जिवंत आहे, तोंपर्यंत सॉक्रेटिसाची कीर्ति अजरामर राहील यांत तिळमात्र संदेह नाहीं. प्लेटो या प्रसिद्ध तत्त्ववेत्त्याला तर आपल्या गुरूबद्दल इतकी विलक्षण पूज्य बुद्धि होती, कीं त्यानें आपले तत्त्वविषयक सर्व विचारच मुळीं सॉक्रेटिसाच्या तोंडीं घातले आहेत. यामुळें प्लेटो व सॉक्रेटिस हा वाङ्मयांत एक जोड-

ताराच झाला आहे. ज्याप्रमाणें कितीही मोठ्या शक्तीची दुर्बीण घेतली तरी जोडताऱ्याच्या प्रकाशाचें पूर्ण विभक्तीकरण करतां येत नाहीं, त्याप्रमाणेंच प्लेटोच्या ग्रंथांवरून साक्रेटिसाचे विचार व प्लेटोचे विचार यांचें पूर्णपणें विभक्तीकरण करणें अशक्य झालें आहे. तरी पण प्लेटोनें आपल्या गुरूच्या चरित्रांतील प्रसंगांचें व विशेषतः त्याच्या आयुष्यांतील शेवटच्या भागाचें इतकें हुबेहूब व इतकें हृदयंगम चित्र रेखाटलें आहे कीं, घडलेल्या गोष्टी तीन हजार वर्षांपूर्वींच्या आहेत तरी त्या आजकाल घडल्यासारख्या डोळ्यांपुढें उभ्या राहतात व तें वर्णन वाचतांना मनुष्याच्या डोळ्यांतून टिपें पडल्याखेरीज रहात नाहींत. म्हणून व कालानुक्रमानेंही तो सर्वांत जुना तत्त्वज्ञानी आहे म्हणून तीन तत्त्ववेत्त्यांच्या या चरित्रमालेंत साक्रेटिसाला आम्हीं अग्रपूजेचा मान दिला आहे.

सॉक्रेटीस हा खिस्ती शकापूर्वीं ४०० वर्षांखालीं ग्रीस देशांत एक मोठा तत्त्वज्ञानी व साधु पुरुष होऊन गेला. चमत्काराची गोष्ट अशी आहे कीं, इतक्या जुन्या काळांत होऊन गेलेल्या या महापुरुषाच्या मनोघटनेंत व बऱ्याच अलीकडे आपल्या इकडे होऊन गेलेला महासाधु पुरुष तुकाराम याच्या मनोघटनेंत विलक्षण साम्य आहे. तें इतकें कीं, थिऑसफीसंबंधाच्या पुस्तकाच्या सतत वाचनानें सुलभश्रद्धा अशी जी मनाची स्थिति होते तशी आमच्या मनाची स्थिति असती तर येवढ्या साम्यावरून आम्हीं बेधडक असें विधान केलें असतें कीं, साक्रेटिसाच्या आत्म्यानें आपली अधिकतर आत्मोन्नति करून शेवटीं मोक्ष मिळविण्याकरतांच हिंदुस्थानच्या धर्मभूमींत अवतार धारण केला ! परंतु आमची मनःस्थिति इतकी सुलभश्रद्धा नसल्यामुळें असें विधान आमच्यानें करवत नाहीं. परंतु इतकें मात्र खरें कीं, तुकाराम व साक्रेटीस यांचें मनोघटनेंतच नव्हे तर त्यांच्या परिस्थितींतही विलक्षण सादृश्य दिसून येतें. दोघेही मोठे साधू पुरुष बनले; दोघांची स्वार्थबुद्धि पूर्णपणें गळाली होती; दोघांनाहीं परोपकार व लोकहित यांशिवाय अहर्निश दुसरा व्यवसाय नव्हता; दोघांनींही आपलें सर्व आयुष्य लोकशिक्षणांत घालविलें; दोघांचीही

'ब्रह्मानंदीं लागली टाळी, कोण देहातें सांभाळी' अशी स्थिति होती; दोघेही खरे भगवद्भक्त होते; दोघांनाही दांभिकपणा व कर्मठपणा यांचा संताप येत असे व दोघेही या दांभिकपणाचा भीडभाड न ठेवतां स्फोट करीत असत. या मनोघटनेप्रमाणेंच दोघांच्या परिस्थितींत व बाह्य गोष्टींतही साम्य दिसतें. दोघेही आपापल्या देशांत कमी दर्जाच्या मानलेल्या गरीब कुलांत जन्मलेले होते; साक्रेटीस हा एका पाथरवटाचा मुलगा होता, तर तुकाराम हा एका वाण्याचा मुलगा होता; दोघेही आपल्या अंगच्या गुणांनीं ' नर करणी करे तो नरका नारायण हो जाय ' या म्हणीप्रमाणें साधुत्व पावले होते; दोघांचीही घरची फार गरीबी होती; दोघांचीही राहणी अत्यंत साधी होती; दोघेही वासनाच्छेदांत आनंद मानीत व दोघेही सुखसोई, ख्यालीखुशालीबद्दल बेपर्वा व बेफिकीर असत; दोघेही प्रापंचिक होते व आमरणांत प्रपंचापासून बाह्यतः पराङ्मुख झाले नाहींत; दोघांनाही बायकामुलें होतीं; दोघांच्याही बायका खाष्ट त्राटिका होत्या; साक्रेटिसाच्या बायकोचें नांव झांटिपी असें होतें व या कजाग बायकोमुळें 'झांटिपी' हा शब्द कैकेयीप्रमाणें सामान्यनाम झालेला आहे; दोघांचाही तत्कालीन लोकांकडून बराच छळ झाला, सॉक्रेटिसाला तर या छळापायीं विषप्राशन करून मरणाची शिक्षा भोगावी लागली; दोघांच्याही सदुपदेशाचा व त्यांच्या उज्ज्वल चरित्राचा प्रकाश त्यांच्या पश्चात् वृद्धिंगत होत गेला.

तरी पण दोन गोष्टींमध्यें या साधु पुरुषांत फार मोठा भेद आहे. पहिली गोष्ट त्यांच्या लेखांसंबंधीं होय. सॉक्रेटिसानें आपले विचार कधींही कागदावर नमूद केले नाहींत. संभाषणाच्या ओघानें जे जसे विचार येतील तसे ते प्रगट करावयाचे असा त्याचा परिपाठ असे. सॉक्रटिसानें चाळीस वर्षें सतत लोकशिक्षणाचें काम केलें. परंतु तें सर्व आपल्या मोहक वाक्प्रवाहानें केलें. सॉक्रेटिस कोठेंही संभाषण करो, त्याच्या भाषणांत हास्यविनोदादि सर्व प्रकारचे रस असल्यामुळें अॅथेन्समधील सर्व लोक, विशेषतः तरुण मंडळी, त्या भाषणाकडे आकर्षिली जात असे. परंतु

सॉक्रेटिसानें स्वतः होऊन आपले विचार केव्हांही टिपून ठेवले नाहींत. मागें सांगितल्याप्रमाणें तें काम, त्याच्या शिष्यांपैकीं झेनाफन व प्लेटो या दोन शिष्यांनीं केलें. परंतु तुकारामानें आपल्या अभंगांचीं टिपणें ठेवलीं व तुकारामानें स्वतः तयार केलेले अभंग आज आपल्याला उपलब्ध आहेत. तुकारामाच्या नांवाखालीं मोडणारे सर्वच अभंग खुद्द तुकारामानें केलेले आहेत किंवा नाहीं तें खात्रीनें सांगतां येत नाहीं; परंतु त्यांतला बराचसा भाग तुकारामाच्या हातचा आहे यांत संदेह नाहीं.

आणखी एका महत्त्वाचे बाबतींत या दोन साधुंमध्यें फरक आहे तो त्यांच्या मोक्षप्राप्तीच्या मार्गामधील होय. तुकाराम हा भक्तिमार्गी होता, तर सॉक्रेटीस हा ज्ञानमार्गी होता. तुकारामाचें हृदय भगवद्भक्तीनें ओतप्रोत भरलेलें होतें. त्याला ध्यानीं, मनीं, स्वप्नीं "पांडुरंगपाय" आठवत होते व अशी निस्सीम पांडुरंगभक्ति करण्यानेंच मोक्षप्राप्ति होते असें त्याच्या उपदेशाचें सार होतें, तर सॉक्रेटिसाला ज्ञानाची तळमळ लागलेली होती. मनुष्याचें अज्ञान हें सर्व पापांचें व दुर्गुणांचें आदिकारण आहे, तेव्हां मनुष्यानें हें आपलें अज्ञान नाहींसें केलें पाहिजे व सत्यज्ञान मिळविण्याची खटपट केली पाहिजे म्हणजेच त्याला सद्गति मिळेल, असें सॉक्रेटिसाच्या उपदेशाचें सार होतें.

सॉक्रेटिसाचा जन्म अथेन्स शहराच्या एका वाडींत खिस्ती शकापूर्वी ४६९ या वर्षी झाला. याच्या बापाचें नांव सोफ्रोनिसकस असें होतें व तो मूर्ति करणाऱ्या पाथरवटाचा धंदा करीत असे. त्याच्या आईचें नांव फेनारेटो असें होतें. ही सुईणीचा धंदा करीत असे व या गोष्टीवरून सॉक्रटीस अपंतर विनोदानें आपल्याला बौद्धिक सुईण म्हणत असे व आपल्या विचारपद्धतीला 'बौद्धिक सुईणपण' असें नांव देई. कारण सॉक्रेटीस म्हणे कीं, "मी सुईणीप्रमाणें स्वतः वांझ आहें. म्हणजे मला स्वतःला ज्ञान नाहीं किंवा विचारही सुचत नाहींत, परंतु तरुण लोकांच्या डोक्यांत जे विचार घुटमळत असतात त्यांची मी आपल्या प्रश्न विचारण्याच्या पद्धतीनें लवकर सुटका करून त्यांना शब्दस्वरूपांत प्रगट

करवितों. अर्थात् लोकांना विचार करावयास भाग पाडून त्यांच्याच मानसिक श्रमानें मी त्यांचें ज्ञान वाढवितों. मी त्यांना प्रत्यक्ष ज्ञान देत नाहीं, कारण, तें माझ्याजवळच नाहीं."

साक्रेटिसाला अथेनियन नागरिकांना मिळणारें शारीरिक व मानसिक शिक्षण मिळालेलें होतें. तो आपल्या बापाचा धंदाही शिकलेला होता व त्याच्या हातच्या मूर्ति म्हणून कांहीं मूर्ति त्याच्या मरणानंतर बऱ्याच काळपर्यंत अथेन्स शहरीं दाखवीत असत, असें कांहीं लेखकांनीं लिहून ठेविलेलें आहे. परंतु लवकरच सॉक्रेटिसाचें लक्ष्य तत्त्वज्ञान व आध्यात्मिक विद्या यांकडे लागलें व विशेषत: मानवी आयुष्याची इतिकर्तव्यता काय हा प्रश्न त्याच्या डोक्यांत घोळूं लागला व या गहन प्रश्नाचें उत्तर त्याच्या मनांत ठरल्यापासून तो लोकांना उपदेश करूं लागला. व हेच त्याचें आयुष्याचें इतिकर्तव्य बनलें व तें त्यानें सतत चाळीस वर्षें म्हणजे आमरणांत चालविलें. तरुणपणीं सॉक्रेटिसाला ॲनॅझगोरास या तत्त्वज्ञान्याच्या लेखांनीं सृष्टिशास्त्राची गोडी लागली होती असें सांगतात. परंतु पुढें तें ज्ञान मिळणें शक्य नाहीं अशी त्याची खात्री झाली व या शास्त्रीय ज्ञानापेक्षां मानवी इतिकर्तव्यतेचें ज्ञान जास्त श्रेयस्कर होय, अशी त्याची मनोदेवता त्याला सांगूं लागली व तेव्हांपासून त्याचा उपदेशाचा व्यवसाय जास्त जोरानें सुरू झाला.

सॉक्रेटिसाचा तीस चाळीस वर्षांचा आयुष्यक्रम एकदम रेखाटण्यासारखा आहे. कारण प्रसिद्ध जर्मन तत्त्ववेत्ता कँट याच्याप्रमाणेंच सॉक्रेटिसाचा क्रम अगदीं ठरलेला असे व त्यांत वर्षानुवर्ष सुद्धां फरक होत नसे. सॉक्रेटीस पहांटेस उठून स्नान वगैरे करून बाहेर पडे. व मोठमोठ्या चव्हाठ्यावर व तालीमखान्यांत जेथें जेथें माणसें व विशेषत: तरुण लोक असतील तेथें तेथें जाई व त्यांच्याशीं संभाषण सुरू करी. त्याचे संभाषणाचे विषय विविध असत. बोलणाराचा जो धंदा असेल किंवा त्याला जो विषय येत असेल किंवा आपल्याला जो विषय येतो अशी याला घमेंड असेल याच विषयावर बोलणें काढून लोकांचें अज्ञान सॉक्रेटीस त्यांना दाखवून देई.



...AN VERNA... SOCIETY

व खऱ्या ज्ञानाबद्दल जिज्ञासा व स्व कर्तव्यजागृति लोकांमध्यें उत्पन्न करण्याचा प्रयत्न करीत असे, याप्रमाणें बराच वेळ झाल्यावर कोणा तरी शिष्याकडे किंवा घरीं जाऊन जेवावें व पुनः बाहेर पडावें व मोठमोठ्या बाजाराच्या ठिकाणीं व जेथें जेथें मनुष्यें आढळतील तेथें तेथें त्यांच्याशीं संभाषण करीत रात्रपर्यंत वेळ घालवावा व रात्रीं कोणाकडे जेवावें किंवा घरीं जेवणास यावें. केव्हां केव्हां सॉक्रेटीस आपल्या स्नेहीमंडळीस घेऊन घरीं एकाएकीं जेवावयास येई; परंतु घरची अत्यंत गरीबी असल्यामुळें व सॉक्रेटिसाचें लक्ष्य संसाराकडे मुळींच नसल्यामुळें आणि तो घरची व्यवस्था मुळींच पहात नसल्यामुळें त्याची बायको अशी मंडळी अकस्मात् आली व त्यांची जेवणाखाणाची तरतूद करण्यास धान्यधून्य नसलें म्हणजे सॉक्रेटिसावर फार रागावे, परंतु सॉक्रेटीस उलट न रागावतां उत्तर देत असे " इतकें वाईट वाटण्याचें कारण नाहीं, जर आपले स्नेही समजूतदार असतील तर त्यांना आपली स्थिति ठाऊक असल्यामुळें मिळेल त्यांत ते समाधान मानून घेतील, परंतु ते जर हलकट लोक असतील तर त्यांच्याबद्दल आपण फारशी फिकीर करूं नये."

झांटिपी व साक्रेटीस यांच्या संसारांतील झगड्याच्या पुष्कळ गोष्टी मागाहून झालेल्या लेखकांनीं लिहून ठेवल्या आहेत, परंतु त्यांपैकीं विश्वसनीय किती आहेत हें आतां सांगणें कठीण आहे. एक तुकारामाच्या एका दंतकथेसारखी आहे तेवढी येथें सांगतों. संसारासंबंधींच्या कटकटीवरून एके वेळीं झॅंटिपी ही सॉक्रेटिसावर फार रागावली व तिनें सॉक्रेटिसावर शिव्याशापांची लाखोली वाहिली व इतक्यानें तिच्या रागाचा उपशम न होऊन तिनें सॉक्रेटिसाच्या डोकीवर पाण्याची घागर आणून ओतली, परंतु या सर्व गोष्टींनीं सॉक्रेटिसाची शांत वृत्ति किंचित् सुद्धां ढळली नाहीं. तो स्मित करून म्हणाला, " इतक्या भयंकर गडगडाटानंतर पाऊस आला हें स्वाभाविकच आहे ! "

वरील वर्णनावरून सॉक्रेटिसाच्या एकंदर आयुष्यक्रमाची सामान्य कल्पना वाचकांस आलीच असेल. सॉक्रेटिसाचें आयुष्य विचार करण्यांत

व लोकांची विचारजागृति करण्यांतच गेल्यामुळें त्याच्या आयुष्यामध्यें सांगण्यासारख्या गोष्टी थोड्याच आहेत. परंतु ज्या थोड्याशा आहेत, त्यांवरून सॉक्रेटिस हा ' बोले तैसा चाले । त्याचीं वंदावीं पाउलें ॥' या कोटीपैकीं होता, हें मात्र स्पष्टपणें दिसून येतें.

सॉक्रेटिसाचा अशा तऱ्हेचा आध्यात्मिक व्यवसाय असल्यामुळें त्यानें राजकीय बाबतींत कधींही मन घातलें नाहीं. मात्र राजशास्त्राच्या तात्त्विक प्रश्नाबद्दल आपल्या संभाषणांत तो नेहमीं ऊहापोह करीत असे. प्रत्येक ग्रीक नागरिकास लष्करी काम करावें लागे व त्याला लष्करी शिक्षणही मिळत असे. त्याप्रमाणें सॉक्रेटिसाला लष्करी शिक्षण मिळालेलें होतें व सॉक्रेटिस हा तीन लढायांत हजरही होता. या सर्व वेळीं तो मोठ्या धैर्यानें लढला व तो सामान्य शिपाई असतांना सुद्धां त्याच्याबद्दल प्रशंसापर उद्गार मोठमोठ्या कामगारांनीं काढले. पहिली लढाई पाटीडिया येथें झाली; तेव्हां सॉक्रेटिसाचें वय ३६ वर्षांचें होतें. या लढाईंत व स्वारींत तो कसा वागला त्याचें वर्णन त्याचें वर्तन प्रत्यक्ष पाहिलेल्या त्याच्या एका शिष्यानें केलें आहे. या लढाईत आलसिब्रायडिस व सॉक्रेटिस एके ठिकाणीं रहात असत व जेवीत असत व त्यानें सॉक्रेटिसाच्या या स्वारींतील वागणुकीचें खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

" सॉक्रेटिसचा विलक्षण सोशिकपणा प्रत्यक्ष पाहण्याची संधि मला येथें मिळाली. त्याचा सोशिकपणा अगदीं अद्वितीय होता. ह्या स्वारींत असतांना कांहीं दिवस शिधासामुग्री मिळण्याचा मार्ग शत्रूंनीं बंद केला व शिपायांना उपास काढण्याची वेळ आली. परंतु या बाबतींत सर्व शिपायांत सॉक्रेटिसाचा नंबर वर लागला. तसेंच थंडी सोसण्यांतहि त्याची कमाल होती. त्या वर्षाचा हिंवाळा फार कडक होता व बर्फ खुपच पडलें होतें. अशा वेळीं सर्व शिपाई तंबुच्या बाहेर पडत नसत अथवा पडलेच तर अगाबर कल्पनातीत कपडे घालून पायाला पिसें व फलाणी बांधून बाहेर पडत. परंतु अशा थंडींत सॉक्रेटीस नेहमींसारखा अनवाणी

व नेहमींच्याच पोशाखांत बर्फावरून चालत जाई व जोडे असून चालणाऱ्या शिपायापेक्षां जास्त जोरानें चाले."

दुसरी लढाई डेलियमची होय. यांतहि सॉक्रेटीस फार शौर्यानें लढला व जरी अथीनीयन लोकांचा पराजय झाल्यामुळें त्याला रणांगण सोडून मागें यावें लागलें, तरी तो इतक्या धिमेपणानें व अभयमुद्रेनें परतत होता, कीं, या त्याच्या वर्तनाबद्दल असे उद्गार काढण्यांत आले कीं, दुसरे शिपाई जर अशा धीराचे लोक असते तर अथीनीयन लोकांचा या लढाईंत पराजयच झाला नसता.

सॉक्रेटिस जींत हजर होता अशी तिसरी लढाई ॲम्फिपॉलिस या ठिकाणची होय. याच लढाईंत ब्रॅसिडास नांवाचा अथीनीयन लोकांमधला मोठा वीर पुरुष पडला व क्लीऑन नांवाचा लोकांचा पुढारी वक्ताहि पडला. या लढाईंतहि सॉक्रेटिसानें आपला धीर शेवटपर्यंत सोडला नाहीं व अखेरपर्यंत तो लढत होता.

हे झाले लढाईंतील धैर्याचे प्रसंग. अथेन्ससारख्या प्रजासत्ताक राज्यामध्यें सॉक्रेटिसासारख्या माणसास लोकक्षोभाच्या विरुद्ध जाऊन सत्याकरितां नीतिधैर्य दाखविण्याचे प्रसंग यावे, हें स्वाभाविक आहे. बाकी सॉक्रेटीस राजकीय उलाढालींत फारसा पडत नसे. कारण, त्याची मनोदेवता अशा कामापासून त्याला नेहमीं परावृत्त करीत असे. तरी पण अथेन्समधलें राज्य पूर्ण लोकसत्तात्मक असल्यामुळें व विशेषतः तेथली न्यायपद्धति सर्वस्वी लोकसत्तात्मक असल्यामुळें व राज्यांतील कांहीं कांहीं अधिकार तर चिठ्या टाकून ठरविण्याची पद्धति असल्यामुळें सॉक्रेटिसास केव्हां केव्हां तरी लोकसभेंत जावें लागे व ज्युरर म्हणूनहि न्यायसभेंत काम करावें लागत असे. अशा एका प्रसंगीं सॉक्रेटिसाचें नीतिधैर्य कसोटीस लागलें. तो प्रसंग असा.:—

खिस्ती शकापूर्वीं ४०६ या वर्षीं अथीनीयन लोकांनीं आर्जीनौझी येथें एक मोठा आरमारी जय मिळविला. परंतु या विजयाला एक गालबोट लागलें. विजयी सेनापतींनीं नासधूस झालेल्या कांहीं गलबतां-

वरील खलाशांचा तपास करण्याकडे व विशेषतः मेलेल्यांचीं प्रेतें उत्तर कार्याकरितां घरीं आणण्याच्या कामांकडे कानाडोळा केला. अथीनीयन लोक प्रेताचें उत्तर कार्य करणें हें फार पवित्र कर्तव्यकर्म समजत असत. विजयी सेनापतींच्या हयगयीमुळें व कर्तव्यपराङ्मुखतेमुळें आपले पुष्कळ नातलग गमावले व विशेषतः मृतांचा धार्मिक प्रेतसंस्कार करणें अशक्य झालें, हें पाहून अथीनीयन जनता खवळली व कांहीं लोकांनीं लोकसभेंत सेनापतींवर कर्तव्यकसूरीबद्दल आरोप आणला. फार मोठें वादळ झालें होतें म्हणून त्या वेळीं माणसें पाठविणें म्हणजे त्यांचेच जीव धोक्यांत घालण्यासारखें होतें, असें एकदां त्यांच्या बाजूनें सांगण्यांत आलें, तर दुसऱ्यांदा ही कामगिरी दोन कामगारांकडे सोपविली होती परंतु त्यांनीं कामचुकारपणा केला म्हणून त्यावर उलट आरोप सेनापतींच्या तर्फे करण्यांत आला. तरी अथीनीयन लोक शांतपणें ऐकून घेत होते व त्यांच्यावरील आरोपाचा विचार न्यायसभेंत करण्याचें ठरलें होतें; परंतु इतक्यांत एक अथेन्समधील सांवत्सरिक कौटुंबिक समारंभ झाला व त्या वेळीं किती तरी कुटुंबांतील किती तरी कर्ते पुरुष नाहींसे झालेले आहेत असें दिसून आलें. लोकांचा क्षोभ व्हावा म्हणून कांहींजण सुतकाचा पोषाख करून या समारंभांत आले होते. या सर्व देखाव्यानें लोकांच्या मनाचा क्षोभ झाला व पहिलें पारडें फिरलें व न्यायासनासमोर न नेतां सर्व सेनापतींच्या वरील आरोपाचा एकदम व एका लोकसभेंतील बहुमतानें निकाल करावा, अशी सूचना सभेपुढें आली. आळीपाळीनें एकएका गोत्रांतील अध्यक्ष करण्याच्या रीतीप्रमाणें सॉक्रेटिसाची अध्यक्षाची पाळी त्या दिवशीं आली होती. ही सूचना उघड उघड गैरकायदा होती. अशी गैरकायदा सूचना मी साफ सभेपुढें ठेवणार नाहीं, असें सॉक्रेटिसानें निक्षून सांगितलें: त्याला लांच देऊं केला, मरणाचें भय घातलें, नाना प्रकारांनीं विनवण्या केल्या. लोक अगदीं खवळलेले होते. तरीसुद्धां सॉक्रेटीस डगमगला नाहीं किंवा सत्यापासून पराङ्मुख झाला नाहीं. सॉक्रेटिसाच्या या नीतिधैर्याचा

उपयोग झाला नाहीं, ही गोष्ट निराळी. कारण अथीनीयन कायद्याप्रमाणें लोकसभेचा अध्यक्ष रोज बदलावयाचा असे. तेव्हां दुसऱ्या दिवसपर्यंत हें काम तहकूब करून सेनापतीविरुद्ध असलेल्या लोकांनीं आपली सूचना दुसऱ्या दिवशींच्या अध्यक्षामार्फत पुढें ठेवून मग पास करून घेतली.

आतां अशा तऱ्हेचा एकच प्रसंग सांगावयाचा राहिला. तो तिसांच्या अनियंत्रित कारभाराच्या कारकीर्दींतलि होय. या तीस जुलमी अधिकाऱ्यांच्या कारकीर्दींत त्यांनीं पांच नागरिकांना सॅलॅमीसमध्यें जाऊन लिऑन या नांवाच्या निरपराधी मनुष्यास पकडून आणण्यास सांगितलें. या जुलमी अधिकाऱ्यांचा उद्देश आपल्याबरोबर बऱ्याच लोकांना जुलमी व अन्यायाच्या कृत्यांत सामील करून घ्यावयाचा होता; परंतु या पांचांमध्यें सॉक्रेटीस होता. असें अन्यायाचें काम मी कदापि करावयाचा नाहीं, असें सांगून सॉक्रेटीस संथपणें घरीं गेला. या त्याच्या उद्दामपणाबद्दल त्या जुलमी अधिकाऱ्यांनीं सॉक्रेटिसावर कड्याळ आणलें असतें, परंतु असें करण्यास त्यांना संधि सांपडण्यापूर्वीं त्यांची अथेन्समधून उचलबांगडी झाली.

## ( २ )

# साक्रेटिसावरील खटला व त्याचा निकाल.

येथपर्यंत सॉक्रेटिसाचें सामान्य चरित्र व इतिवृत्त सांगितलें. आतां त्याच्यावरील विशेष प्रसंगांची हकीकत द्यावयाची आहे. वास्तविक साक्रेटिसावर बिनतोड असा एकच प्रसंग आला. हा प्रसंग त्याच्यावर त्याच्या अगदीं उतार वयांत आला व या प्रसंगावरच प्लेटोनें तीन संभाषणें लिहिलीं आहेत. हीं संभाषणें 'सॉक्रेटिसाचा खटला व त्याचा मृत्यु' या नांवाखालीं इंग्रजींत स्वतंत्र पुस्तकरूपानें 'गोल्डन ट्रेझरी सीरीज' मध्यें प्रसिद्ध झालीं आहेत. ज्याप्रमाणें कालिदासानें आपले इतर कोणतेहि ग्रंथ न लिहितां एक 'मेघदूत'च लिहिलें असतें तरी त्याची कविकुलगुरूंमध्यें गणना झाल्यावांचून राहतीना असें म्हटलेलें आहे, त्याचप्रमाणें प्लेटोच्या या ग्रंथाविषयीं म्हणतां येईल. त्यानें जरी दुसरे कोणतेहि ग्रंथ लिहिले नसते तरी त्याची कीर्ति या एका ग्रंथानें अजरामर झाली असती. प्लेटोनें या संभाषणांत आपल्या गुरूच्या आयुष्यांतील शेवटच्या भागाचें अद्वितीय चित्र काढलें आहे. हा भाग म्हणजे साक्रेटिसावरील फौजदारी खटला, त्याचा तुरुंगवास, व त्याचा मृत्यु हा होय. प्लेटोच्या या स्फूर्तिदायक, उन्नतिकारण व हुरूप आणणाऱ्या काव्यमय ग्रंथाच्या आधारानें खालील विवेचन केलें आहे.

साक्रेटिसासारख्या साधु पुरुषावर फौजदारी खटला होऊन त्याला लोकांनीं मरणाची शिक्षा भोगावयास भाग पाडावें, हें सकृद्दर्शनीं फार विसंगत दिसतें. परंतु थोडया बारकाईनें विचार केल्यास अशा गोष्टींत फारसें आश्चर्य नाहीं, असेंच वाटेल. कारण खरा साधुपुरुष व जनता यांच्या मनोघटनेंत बराच विरोध असल्यामुळें साधुपुरुषाचें हृद्गत जनतेस

कळत नाहीं व यामुळें जनता साधुपुरुषाविषयीं भलताच ग्रह करून घेते. 'सत्यान्नास्ति परो धर्मः' हें साधुपुरुषाचें वर्तनतत्त्व असतें, तर 'बाबावाक्यं प्रमाणम्' हें जनतेचें वर्तनतत्त्व असतें; सदसद्विवेकबुद्धि व सुविचार यांच्या पायावर उभारलेल्या शास्त्रावर खऱ्या साधूची भिस्त असते, तर दुराग्रह, श्रद्धा व 'पिच्छसे आई' रूढी यांवर जनतेची भिस्त असते; खऱ्या साधुपुरुषाची आत्मनिरीक्षण करून स्वतःचे दोष पाहून ते नाहींसे करण्याची प्रवृत्ति असते, तर जनतेला आपले दोष पाहण्याची व ते सुधारण्याची मुळींच संवय नसते; खऱ्या साधुपुरुषाची आपले गुण झांकून दुसऱ्याचे अणुइतकेही गुण मोठे करून दाखविण्याची प्रवृत्ति असते, तर जनतेला आपले गुण फारच मोठे भासतात, दुसऱ्याचे गुण लहान वाटतात व आपल्या डोळ्यांतील मुसळ दिसत नाहीं परंतु दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळसुद्धां दिसतें ! शेवटीं, खऱ्या साधुपुरुषाला थातांड व दांभिकपणा मुळींच खपत नाहीं, त्याला दुसऱ्याचे दोष निस्पृहपणें दाखविल्याखेरिज राहवत नाहीं व त्याला खोटी स्तुति करतां येत नाहीं; तर जनतेची धर्मथोतांडबंड करणारावर व आपल्या छंदाप्रमाणें वागणारावर बहाल मर्जी असते, आणि ती स्तुतिप्रिय असते. विशेषतः खऱ्या साधुपुरुषाच्या या शेवटच्या विशेषामुळें लोकांमध्यें त्याला फार शत्रु बनतात व मग ते त्या साधुपुरुषाला त्रास देतात, त्याचा छल करतात व हातांत अधिकार असल्यास त्याचाहि उपयोग करून त्या साधुपुरुषाला शिक्षासुद्धां करण्यास मागें पुढें पहात नाहींत.

साक्रेटिसाला याच कारणामुळें शिक्षा झाली. त्याची शिक्षणपद्धति वादविवादात्मक होती, हें पूर्वी सांगितलेंच आहे. तो व्याख्यानरूपानें उपदेश करीत नसे, तर भेटेल त्याला त्याच्या विषयाविषयीं उलट सुलट प्रश्न विचारून त्याला कुंठित करी व त्याचें अज्ञान त्याला दाखवून देई व मग त्याला आणखी प्रश्न विचारून त्याच्या जवळून सत्यरूप उत्तरें काढून त्याला उपदेश करी. हा सर्व

वादविवाद लोकांच्या देखत चालत असे व कोणत्याहि माणसाला सर्वांदेखत आपली फाजिती झालेली खपत नसे. त्यामुळें सर्व धद्यांच्या लोकांचें साक्रेटिसानें वैर संपादन केलें होतें. शिवाय, साक्रेटिस हा मोठा सुधारणावादी होता, व प्रत्येक चालीचें, प्रत्येक संस्थेचें, प्रत्येक मताचें व प्रचलित कल्पनेचें युक्तिवादानें समर्थन करतां आलें तर तो खरी असें तो म्हणत असे. यामुळें पुराणमताभिमानी लोकांचेंहि वैर त्यानें संपादन केलें होतें. याप्रमाणें त्याच्या आयुष्यामध्यें त्याच्याविरुद्ध वैराचा अग्नि सारखा धुमसत होता व त्याचा भडका अथेन्समध्ये जुलमी तीस अधिकाऱ्यांची सत्ता जाऊन पुनः प्रजासत्ताक राज्याची स्थापना झाल्याबरोबर झाला. या जुलमी अधिकाऱ्यांच्यामध्यें कांहीं साक्रेटिसाचे शिष्य होते. यामुळें तर लोकक्षोभांत जास्तच भर पडण्यास कारण झालें. अथेन्सला भोगाव्या लागलेल्या सर्व आपत्तीचें आदिकारण साक्रेटिसचें शिक्षण, अशी लोकांची समजूत झाली. तेव्हां हें मूळच नाहींसें करुन टाकलें पाहिजे असें कित्येकांस वाटून त्यांनीं साक्रेटिसावर फौजदारी खटला करून त्याचा अंत करण्याचा निश्चय केला व तो अथेन्समधल्या न्यायपद्धतीमुळें त्यांना सहज पार पाडतां आला.

अथेन्समधील न्यायपद्धतीची हल्लींच्या काळच्या लोकांना मुळींच कल्पना व्हावयाची नाहीं. अथेन्सच्या राजकीय सत्तेप्रमाणेंच अथेन्सची न्यायपद्धतीही पूर्ण लोकसत्तात्मक होती. तेथें आधीं लिहिलेले असे कायदे नसत, निष्णात न्यायाधीशही नसत, सामान्य लोकांची ज्यूरी असे. परंतु ही ज्यूरी इंग्रजी पद्धतीप्रमाणें न्यायाधीशास सल्ला देण्यापुरतीच नसे, तर सर्व न्यायाचे अधिकार ज्यूररच्या मताधिक्यावर अवलंबून असत व ज्यूररची संख्याही फारच मोठी असे. म्हणून अथेन्समधील न्यायसभा ही लोकसभेप्रमाणें सर्व नागरिकांची सभाच असे. वादीप्रतिवादींनीं आपापले खटले स्वतःच चालविले पाहिजेत असाही दुसरा एक नियम असे. न्यायसभेच्या अशा घटनेमुळें खटले वादीप्रतिवादींनीं स्वतःच चालविण्याच्या नियमानें व कारभाराच्या पूर्ण लोकसत्तात्वामुळें ग्रीस देशांत वक्तृत्व

शिखरास पोहोंचलें होतें. वक्तृत्वकलेची इतकी प्रगति दुसऱ्या कोठेंच झाली नाहीं. आपलें संरक्षण करण्यास वक्तृत्वशक्तीची जरूरी असल्यामुळें प्रत्येक नागरिकाला वक्तृत्व आवश्यक होतें व वक्तृत्वकला हें तेथल्या शिक्षणाचें एक प्रमुख अंग झालें होतें. असो.

खिस्ती शकापूर्वी ३९९ या वर्षी सॉक्रेटिसावर खटला झाला. खटल्याची नोटिस मेलीटस या कवीनें दिलेली होती व खटल्यांत एक धार्मिक आरोप असल्यामुळें अथीनीयन कायद्याप्रमाणें आर्कन नांवाच्या अधिकाऱ्यानें पूर्वतपास केला होता व न्यायसभेचा या दिवशीं तोच अध्यक्ष होता. ज्यूरर ५०१ होते. खटल्याचा निकाल योग्य व खऱ्या रीतीनें देऊं अशी शपथ घेतल्यावर ज्यूरर लोक चटया आंथरलेल्या लांब बांकावर येऊन बसले. शेजारीं असलेल्या प्लॅटफॉर्मवर वादीप्रतिवादी समोरासमोर ठाकले. कठड्याच्या पलीकडे पुष्कळ प्रेक्षक बसले होते. धूपारती व न्यायसभेच्या घोषकानें म्हटलेली प्रार्थना होऊन कामाला सुरुवात झाली. कोर्टाच्या क्लार्कनें आरोप व लेखी कैफियत वाचली. आरोप असा होताः—

"सॉक्रेटिस हा गुन्हेगार आहे. कारण तो संस्थाननें मानलेले देव मानीत नाहीं व त्यानें नवीन देवांचा लोकांत प्रसार केला आहे; आणखी तो तरुणांना बिघडवितो."

नंतर अध्यक्षानें वादीपक्षाच्या लोकांस अग्रासनीं येऊन बोलण्यास फर्माविलें. प्रथमतः मेलीटस कवि बोलला. त्याचें भाषण म्हणजे आपल्या देशभक्तीचें व वक्तृत्वकलेचें प्रदर्शन होतें! परंतु त्याचें भाषण फारसें चांगलें झालें नाहीं. नंतर अनीटस व लायकन यांचीं भाषणें झालीं. तीं जास्त चांगलीं झालीं व त्यांचा ज्यूररवर परिणामही झाला. अनीटस म्हणाला, "सॉक्रेटिसाशीं आपला खाजगी द्वेष नाहीं व कोर्टाचें समन्स न मानतां जर सॉक्रेटीस देश सोडून जाता तर आपल्याला आनंद झाला असता. परंतु ज्या अर्थी सॉक्रेटिस हजर राहिला आहे त्या अर्थी आतां त्याची सुटका होणें श्रेयस्कर नाहीं."

वादींच्या भाषणांत सॉक्रेटिसाच्या शिष्यांच्या दुष्कृत्यांचा पुष्कळ उल्लेख होता व त्यावरून सॉक्रेटिसाचें शिक्षण तरुणांना बिघडविणारें आहे असें वादींचें म्हणणें होतें. वादींनीं आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ कांहीं पुरावा सादर केला होता किंवा नाहीं हें कळण्यास साधन नाहीं. नंतर सॉक्रेटिसाची उत्तर देण्याची पाळी आली. त्याचें भाषण अत्यंत साधें, पण अकृत्रिमवक्तृत्वपूर्ण होतें. सॉक्रेटिस म्हणाला:—

"अथीनियन नागरिकहो! माझ्या प्रतिपक्षीयांनीं तुमच्या मनावर आपल्या भाषणानें काय परिणाम केला आहे, हें मला सांगतां येत नाहीं. माझ्या संबंधानें विचाराल तर मी कोण आहें हें मी बहुतेक विसरून गेलों आहें, इतकें त्यांचें भाषण मोहक भ्रामक आहे, तरी पण त्यांच्या भाषणांत सत्याचा अंश क्वचितच सांपडेल! परंतु त्यांच्या असत्य विधानां-पैकीं मला ज्याबद्दल विशेष आश्चर्य वाटलें तें विधान हें:-त्यांनीं तुम्हांला सांगितलें कीं, मी मोठा वस्ताद वक्ता आहें व तुम्हांला तेव्हांच भुरळ घालीन! आतां या विधानाचा खोटेपणा मी आपल्या तोंडांतून एक शब्द काढल्याबरोबर दिसून येईल व तुम्हांला समजेल कीं, माझ्यांत मुळींच वक्तृत्व नाहीं! खरें बोलणारा तो मोठा वस्ताद वक्ता असा जर यांचा अर्थ असला तर मात्र गोष्ट निराळी! या अर्थानें मीं कबूल करतों कीं, मी त्यांच्यापेक्षां जास्त मोठा वक्ता आहें. कारण मी खरें खरें तेंच सांगतों व आतां सांगणार आहें. मोहक भाषेनें शृंगारलेलें नाटकी भाषण करणें मला आतां शोभत नाहीं. मीं आपली कैफीयत आधीं तयार केली नाहीं. मला जे आयत्या वेळीं शब्द सुचतील त्या शब्दांतच मीं बोलणार आहें. मला आतां सत्तरावें वर्ष लागलें आहे. न्यायसभेंत पाऊल टाक-ण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग आहे. यामुळें येथल्या भाषणपद्धतीशीं मी अगदीं अनभिज्ञ आहें. ज्याप्रमाणें तुम्ही परकी देशांतील मनुष्याला आपल्या भाषेंत आपल्याच तऱ्हेनें बोलूं द्याल त्याचप्रमाणें माझ्या नेह-मींच्या पद्धतीनें आपण मला बोलूं द्यावें अशी विनंति आहे. माझी बोल-ण्याची भाषाशैली कशी आहे—ती चांगली असेल अगर वाईट असेल—

त्याकडे आपण लक्ष्य देऊं नका. परंतु मी म्हणतों तें न्याय्य आहे किंवा नाहीं हें आपण पहा. कारण ज्याप्रमाणें खरें बोलणे हें वकिलाचें कर्तव्य-कर्म आहे; त्याप्रमाणेंच न्याय्य कोणतें हें ठरविणें न्यायाधिशाचें काम आहे."

" माझ्या प्रतिपक्षीयांचे दोन वर्ग आहेत. एक जुने एक नवे. मेलीटस व त्याचे स्नेही हे नवे आहेत. त्यांचें मला इतकें भय वाटत नाहीं, परंतु माझे जुने प्रतिपक्षी हे यांच्यापेक्षांही जास्त प्रबल आहेत. कारण यांनीं आज कैक वर्षें तुमच्या कानींकपाळीं माझी नालस्ती केली आहे. तुमच्या कोंवळ्या मनावर त्यांच्या मतांचा दृढ परिणाम झालेला आहे. शिवाय हे प्रतिपक्षी असंख्य आहेत. व त्यांचीं मला नांवेंही टाऊक नाहींत. यामुळें त्यांना पुढें उभें करून त्यांची उलट तपासणी करून माझ्या म्हण-ण्याचें समर्थन करणें मला शक्य नाहीं. तरी पण ते माझे जुने प्रतिपक्षी आहेत म्हणून त्यांच्या आरोपाचें खंडन प्रथमतः करून मग मी मेलीटस व त्याचे स्नेही यांचेकडे वळणार आहें.

जणूं काय माझे प्रतिपक्षी येथें माझ्या समोर आहेत असें धरून मी त्यांचा आरोप आपल्याला सांगतों. ते म्हणतात, 'साक्रेटिस हा एक फार वाईट मनुष्य आहे. कारण तो पृथ्वीवरील व आकाशांतील वस्तु-जाताचा शोध करतो; तसेंच त्याला वाईट व असत्य यांना चांगल्याचें व सत्याचें आभासरूप देण्याची कला अवगत आहे व या सर्व गोष्टी तो तरुणांना शिकवितो.' नाटकांतून माझें असेंच असत्य चित्र काढलें आहे, परंतु अशा प्रकारचें ज्ञान मला मुळींच नाहीं! अशा प्रकारचें ज्ञान मनु-ष्यास मिळणें शक्य असल्यास तें वाईट नाहीं, परंतु असलें ज्ञान मला नाहीं हें खास! माझीं पुष्कळ भाषणें आपल्यापैकीं पुष्कळांनीं ऐकलीं असतील. त्यांनीं मी अशा विषयावर कधीं बोललों आहें काय याबद्दल आठवण करून पहावी, म्हणजे माझ्या म्हणण्याच्या खरेपणाला त्यांची मनोमय साक्ष पटेल.

" तसेंच मी तरुणांस शिकवितों व त्यांचेकडून गुरुदक्षिणा घेतों, असें तुम्हीं ऐकलें असेल, परंतु तेंही अगदीं खोटें आहे! असें जर मला करतां

आलें असतें तर फार चांगलें होतें. कांहीं लोक आपल्याला मनुष्याच्या कर्तव्यकर्माचें ज्ञान करून देतां येतें अशी घमेंड मारतात व अशा तऱ्हेनें पुष्कळ पैसे मिळवितात व तरुण लोक यांचे पाठीमागें लागतात. परंतु मी अशा तऱ्हेची घमेंड मारली नाहीं किंवा कोणाकडून पैसेही मिळविले नाहींत!

"पण आपणांपैकीं कोणी तरी विचारील, 'अहो सॉक्रेटिस! जर तुम्हीं कांहींच केलें नाहीं असें म्हणतां तर मग तुमच्याबद्दल इतकी निंदा कां? सामान्य लोकांमध्यें नाहीं असें कांहीं तरी असाधारण तुमच्या वर्तनांत व तुमच्या पद्धतींत असल्याखेरीज तुमच्याविरुद्ध इतक्या कंड्या पिकतील कशा? तेव्हां तुमचा खरा व्यवसाय काय तो आम्हांला सांगा. म्हणजे तुमच्या खटल्याचा आम्हांस योग्य निकाल करण्यास सांपडेल.' हा प्रश्न वाजवी आहे व माझ्याविरुद्ध इतक्या कंडया कां पिकल्या व माझें नांव इतकें वाईट कां झालें आहे याचें स्पष्टीकरण मी आतां करणार आहें. मी विनोदानें कांहीं तरी सांगत आहें, असें समजूं नका. मी अगदीं सत्य तेंच सांगत आहें. माझें नांव बद्दू होण्याचें कारण माझ्यामध्यें असलेलें एक प्रकारचें शहाणपण होय. हें शहाणपण सर्व मनुष्यप्राण्यांस साध्य करून घेतां येण्यासारखें आहे. परंतु या निराळें एखादें शहाणपण माझे अंगीं नाहीं. माझ्या प्रतिपक्षीयांना असल्यास न कळे! या माझ्या म्हणण्याच्या समर्थनार्थ मी डेलफाय देवाची साक्ष आणूं शकेन. तुम्हांला चेरीफान ठाऊक आहे. तो तरुणपणापासून माझा सोबती होता. त्यानें लोकांबरोबर जुलमी अमलात देशत्याग केला व लोकांबरोबरच तो परत आला. त्याचा स्वभावही तुम्हांला माहीत आहे. त्यानें एखादी गोष्ट मनांत आणली म्हणजे ती तो शेवटास नेल्याखेरीज रहावयाचा नाहीं. त्यानें एकदां डेलफाय देवाला प्रश्न विचारला कीं, 'सॉक्रेटिसापेक्षां कोणी शहाणा आहे काय?' देवाकडून उत्तर आलें, 'नाहीं.' ही गोष्ट खरी आहे याची साक्ष चेरीफानचा येथें हजर असलेला भाऊ देऊं शकेल."

" या डेलफाय देवाच्या म्हणण्याचा अर्थ तरी काय ? असा मी विचार करूं लागलों. मला तर मुळींच शहाणपण नाहीं, हें मला ठाऊक आहे. तेव्हां देवाच्या म्हणण्याचा अर्थ काय ? देव तर खोटें बोलणार नाहीं. कारण तो देवच आहे. शेवटीं देवाचें म्हणणें खरें आहे कीं खोटें आहे याचा खालील पद्धतीप्रमाणें मी पडताळा पाहण्याचा निश्चय केला. शहाणपणाबद्दल अत्यंत नाणावलेल्या एका मुत्सद्याकडे मी गेलों व त्याला पुष्कळ प्रकारचे प्रश्न विचारून त्याच्याशीं संभाषण केलें, त्यावरून मला असें समजलें कीं, जरी त्याला सर्व लोक ज्ञानी समजतात, व तो आपल्या स्वतःलाही ज्ञानी समजतो, तरी पण तो अज्ञानी आहे व या अज्ञानाची त्याला जाणीव नाहीं. तेव्हां मी व तो या दोघांनाही ज्ञान नाहीं असें दिसलें. मात्र माझ्या अज्ञानाची मला जाणीव होती, पण त्याला मात्र ती नव्हती. तेव्हां या बाबतींत मी त्याच्यापेक्षां शहाणा खरा, असें अनुभवास आलें. पुढें मी एका कवीकडे गेलों. परंतु त्याला आपल्या कवितेबद्दल व आपल्या कवनपद्धतीबदल कांहींच ज्ञान नाहीं असें मला दिसून आलें. तेव्हां मी ताडलें कीं कवींना आपल्या कलेचें ज्ञान नसतें, ते कविता करतात खऱ्या, परंतु त्या ज्ञानानें नव्हे तर साहजिक स्फूर्तीनें करतात. पुढें मी कारागिरांकडे गेलों, त्यांना माझ्यापेक्षां जास्त शहाणपण असेल असें मला वाटलें. त्यांना आपल्या कलेबद्दल व धंद्याबद्दल माहिती होती खरी, परंतु या एका प्रकारच्या ज्ञानावरून आपल्याला सर्व तऱ्हेचें ज्ञान आहे असें त्यांना वाटत असे. या बाबतींतही मी त्यांचेपेक्षां बरा, असें मला दिसून आलें. याप्रमाणें देवाच्या जणुं कांहीं आज्ञेनेंच मी आपला व्यवसाय चालविला होता. परंतु यामुळें मी आपल्याला जास्त जास्त शत्रु करीत होतों. ज्याच्या ज्याच्या जवळ संभाषण करून मी त्याला कुंठित करून त्याचें अज्ञान दाखवीत असें, तो तो मनुष्य आपल्या अज्ञानाला दोष न ठेवतां मलाच शिव्या देई. तरुण मंडळी हा वादविवाद पहात असत. तेव्हां त्यांना मी जास्त शहाणा आहें असें वाटे व माझ्या

प्रश्नपद्धतीचें ते आपापसांत अनुकरण करीत व या पद्धतीचा प्रयोग दुसऱ्यावरही करीत.

" याप्रमाणें ज्या लोकांचें अज्ञान बाहेर पडे ते लोक आपल्यावर रागावण्याऐवजीं मजवर रागावत व सॉक्रेटिस हा तरुणांना बिघडवितो, अशा प्रकारचा आरोप मजवर करीत. हे आरोप तुम्ही लहानपणापासून ऐकत आलां आहांत व येवढ्याशा थोड्या वेळांत तुमचे दुराग्रह काढून टाकणें कठीण आहे. परंतु मी जें सांगितलें आहे तें सर्व खरें आहे. मीं कांहीं एक चोरून ठेवलें नाहीं, किंवा कांहींएक गाळलें नाहीं. आहे तसें स्पष्टपणें सांगितलें आहे व हा माझा स्पष्टवक्तेपणाच मला नेहमीं भोंवला आहे व आतांही तो भोवणार.

" आतां मला देशाभिमानी मेलीटसकडे वळलें पाहिजे. याचा आरोप असा आहे, " सॉक्रेटिस हा तरुणांना बिघडविणारा व शहरच्या देवतांवर भरंवसा न ठेवतां दुसऱ्याच देवतांवर भरंवसा ठेवणारा वाईट मनुष्य आहे.' आतां मी तरुणांना बिघडवितों हा आरोप मेलीटसनें फारसा विचार न करतां केला आहे असें मी त्याची प्रत्यक्ष तुमच्यापुढें उलट तपासणी करून दाखवितो. (साक्रेटीस मेलीटसची उलट तपासणी न्यायाधीश सभेपुढें घेतो.) " अथीनियन लोकहो ! पाहिलेंत तुम्ही कीं मेलीटसनें याविषयीं मुळींच विचार केला नाहीं, असें त्याच्या विसंगत विधानांवरून स्पष्ट होत आहे. तोच प्रकार दुसऱ्याही आरोपाचा आहे. त्यांतही सर्वस्वीं विसंगतपणाच भरलेला आहे. परंतु तुमच्यापैकीं कोणी विचारील 'सॉक्रेटिस ! ज्या व्यवसायामुळें तुमच्या जीवावर येऊन बेतली, असा व्यवसाय चालू ठेवण्याचें तुमच्या मनांत येतें कसें ? याला माझें उत्तर म्हणजे माझा सर्व आयुष्यक्रमच होय. कोणत्याही माणसानें आपलें कर्तव्यकर्म आपल्या आयुष्याची पर्वा न करतां केलें पाहिजे. मीं तीन वेळां तुमच्या सेनापतीच्या हाताखालीं काम केलें व या तीनही वेळां मी आपल्या जीवाकडे किंवा सुरक्षितपणाकडे पाहिलें नाहीं. याप्रमाणें सेनापतीची आज्ञा पाळ-

तांना जर मरणाची भीति मनांत आणली नाहीं, तर हा माझा व्यवसाय मला देवानेंच लावून दिला आहे तेव्हां मी त्याची अवज्ञा कशी करूं ? मी जर आतां मरणाच्या भीतीनें देवाची आज्ञा उल्लंघिली तर मात्र मेलीटस याला मजवर नास्तिक्याचा आरोप खरोखरीं आणतां येईल. मला जर तुम्ही म्हणालात, कीं ' सॉक्रेटिस ! एक वेळ आम्ही तुला गय करतों परंतु यापुढें हा आपला व्यवसाय थांबीव.' तर मी याला असें उत्तर देईन कीं, 'अथीनियन लोकहो ! मला तुमच्याबद्दल अत्यंत आदर व प्रेम वाटतें. परंतु तुमच्यापेक्षां मी देवाच्या आज्ञेला जास्त मान देतों व जोंपर्यंत माझ्या जिवांत जीव आहे व जोपर्यंत माझ्या वाचेंतून शब्द निघत आहे तोंपर्यंत मी सत्यपरीक्षणाचा व्यवसाय व तुम्हांला उपदेश करण्याचा व्यवसाय सोडणार नाहीं ! मी तुमच्या कानीं कपाळीं तुमच्या अज्ञानाबद्दल तुमच्या कामचुकारपणाबद्दल तुमची कानउघाडणी करीत राहणार. आपल्या आत्म्याच्या पूर्णतेकडे आपलें सर्व लक्ष लावा पैशाकडे किंवा विषयसुखाकडे लक्ष देऊं नका. पैशापासून सद्‌गुण निघत नाहीं तर सद्‌गुणापासूनच पैसा व इतर श्रेयस्कर गोष्टी उत्पन्न होतात, असाच उपदेश मी करीत रहाणार ! हाच उपदेश मी तरुण पिढीला करीत आलों आहें व या उपदेशानेंच जर मी तरुणांना बिघडवीत असेन तर माझ्या हातून मोठाच गुन्हा होत आहे. अथीनियन लोक हो ! तरी तुम्ही अनीटसचें ऐकून मला शिक्षा तरी करा, किंवा माझें ऐकून मला सोडा. परंतु हें ध्यानांत ठेवा कीं, मी हा आपला व्यवसाय कधींही सोडणार नाहीं. याकरितां जरी मला असंख्य वेळ मरावें लागलें तरी बेहेत्तर !

" अथीनियन नागरिकहो ! झालें. माझ्याकडून होईल तसें मीं आपल्या बाजूचें समर्थन केलें आहे. तुमच्यापुढें नेहमीं येणाऱ्या आरोपींप्रमाणें आपलीं बायकामुलें पुढें करून तुमच्या मनांत दया उत्पन्न करून आपली सुटका करून घेण्याची रीत आहे. परंतु मी तसें कधींही करणार नाहीं ! मलाही मुलेंबाळें आहेत, माझाही संसार आहे, परंतु न्यायाधिशाचें काम न्याय करणें हें होय व आरोपीनें आपल्या निरपराधीपणाची

खात्री युक्तिवादानें पटविली पाहिजे. आपली सुटका करून घेण्याचे दुसरे मार्ग–दयादि उत्पन्न करणें–हे न्यायाधिशाला व आरोपीला कमीपणा आणणारे आहेत. तेव्हां असल्या कमीपणा आणणाऱ्या मार्गाचा मी अवलंब करणार नाहीं व तुम्हींही कधीं करूं नये, अशी आपल्याला विनंति आहे. तुम्ही खरा न्याय देण्याची शपथ घेतली आहे. तेव्हां तुमच्या दयेचा फायदा घेणें म्हणजे तुमची शपथ तुम्हांला मोडण्यास लावणें होय. मीं असें केलें तर मात्र देव नाहीं असेंच मी तुम्हांला शिकविल्यासारखें होईल व मेलीटसचा आरोप मी आपल्या वर्तनानें शाबीत केल्याप्रमाणें होईल! अथीनियन नागरिक हो! खरा प्रकार निराळा आहे. माझ्या प्रतिपक्षीयांचा सुद्धां नसेल असा माझा देवावर भाव आहे व माझा खटला मी तुमच्यावर व देवावर सोंपवितों; म्हणजे त्याचा निकाल तुम्हांला व मला श्रेयस्कर असा होईल!

सॉक्रेटिसाचें अशा तऱ्हेचें भाषण झाल्यावर सर्व न्यायाधिशांचीं मतें घेण्यांत आलीं व सॉक्रेटिसाला २८१ विरुद्ध २२० मतांनीं अपराधी ठरविलें. नंतर अथीनियन कायद्याप्रमाणें वादीनें आरोपीला कोणची शिक्षा द्यावयाची याबद्दल सूचना आणावयाची असते. त्याप्रमाणे सॉक्रेटिसाला मरणाची शिक्षा व्हावी अशी मेलीटसनें सूचना आणली. आरोपीला दुसरी कमी दर्जाची शिक्षा सुचविण्याचा अधिकार असतो व ही शिक्षा सुचवितांना आरोपीनें न्यायाधिशाशीं नम्रपणाचें वर्तन करून त्याची करुणा भाकून आपल्या दुःखाचें प्रदर्शन केलें म्हणजे न्यायसभेचें बहुतेक कमी शिक्षेला बहुमत पडत असे. त्याप्रमाणें सॉक्रेटिसानें गयावया केलें असतें, आपण मरणार याबद्दल त्यानें दुःख प्रदर्शित केलें असतें, आपलीं मुलें-बाळें आणून त्यांचें व आपल्या विपन्न स्थितीचें प्रदर्शन केलें असतें, तर त्याची थोड्या दंडावरही सुटका झाली असती. परंतु सॉक्रेटिसासारखा धीरगंभीर कर्तव्यपरायण साधुपुरुष अशी लाजिरवाणी गोष्ट कशी करील! उलट त्यानें आपलें निरपराधित्व मोठ्या अभिमानानें सांगितलें. आपण अथेन्सवर कसे उपकार केले आहेत हें त्यानें दाखवून दिलें

व या उपकारांची खरी फेड म्हणजे आपल्याला आपल्या उतार वयांत शहरानें आपल्या खर्चानें पोषण करणें ही होय असें सांगितलें. परंतु मित्राच्या सुर्वतीखातर व न्यायाधिशाच्या समजुतीखातर सॉक्रेटिसानें तीस मिनींचा दंड देण्यास आपण कबूल आहों असें जाहीर केलें.

मतें घेतल्यावर असें दिसून आलें कीं, पहिल्यापेक्षां पुष्कळच जास्त मतानें सॉक्रेटिसास मरणाची शिक्षा देण्यांत आली. ही शिक्षा ऐकून त्याला मुळींच वाईट वाटलें नाहीं. मात्र आपल्याला अन्यायानें शिक्षा दिल्याबद्दल तुम्हांला पुढें पश्चात्ताप होईल असें सॉक्रेटिसानें भविष्य सांगितलें.

शेवटीं सॉक्रेटिस म्हणाला, " परंतु आतां वेळ झाली व आपण येथून निघालें पाहिजे. मी मरायला जाणार, आपण जगण्यास जाणार. पण आयुष्य जास्त चांगलें किंवा मृत्यु जास्त चांगला, हें फक्त देवालाच ठाऊक ! ! !"



( ३ )

# साक्रेटिसाचा तुरुंगवास.

साक्रेटिसाला मरणाची शिक्षा झाली ती कांहीं आगंतुक कारणांनीं नाहीं. त्याचा तुरुंगवास मात्र आगंतुकच होता. त्याची शिक्षा ही मानवी स्वभावांत असलेल्या दोन परस्परविरोधी तत्वांचा परिणाम होय. या दोन तत्वांच्या झगड्यांत मनुष्यमात्राची प्रगति घडून आलेली आहे. साक्रेटीस व त्याचे प्रतिपक्षी यांच्या तंटयाचें मूळ या तत्त्वांत आहे. साक्रेटीस हा नव्याचा अभिमानी होता, तर त्याचे प्रतिपक्षी हे जुन्याचे अभिमानी होते; तो सुधारणावादी होता, तर ते रूढिवादी होते; साक्रेटिसाला डोळस अशी धर्मभक्ति पाहिजे होती, तर त्यांना अंधधर्मश्रद्धा हवी होती; साक्रेटिसाची पारमार्थिक दृष्टि होती, पर त्यांची सांसारिक दृष्टि होती; तो खऱ्याचा भोक्ता होता, तर ते आभासावर भिस्त ठेवणारे होते; त्याला अस्सल पाहिजे होतें, तर त्यांचें नकलेवर समाधान होत होतें; तो दूरदृष्टि होता, तर ते संकुचितदृष्टि होते; तो स्वार्थपराङ्मुख होता, तर ते स्वार्थपरायण होते. याप्रमाणें परस्परविरोधी तत्त्वांच्या वालींचा झगडा अपरिहार्यच होता, व या झगड्यांत साक्रेटिसाच्या प्रतिपक्षीयांचा क्षणैक विजयहि झाला खरा. परंतु आपल्या अन्यायी कृत्याबद्दल पुढें अथीनियन लोकांना इतका पश्चात्ताप झाला कीं, ज्या पुरुषाला त्यांनीं गुन्हेगार म्हणून विष प्राशन करावयास लावलें त्यालाच त्यांनीं पुरुषश्रेष्ठाचा मान दिला व त्याच्या पश्चात् त्याचें विलक्षण गौरव केलें. साक्रेटिसाचा तुरुंगवास ही मात्र एक आकस्मिक गोष्ट होती व त्याचें कारणहि क्षुल्लकच होतें व केव्हां केव्हां क्षुल्लक गोष्टीपासून फार मोठे परिणाम झालेले आपण पाहतों त्या कोटींपैकीं हा तुरुंगवास होता. अथीनियन लोकांचें—नव्हे

सर्व जगाचें—सुदैव कीं, साक्रेटिसाला मरणाची शिक्षा झाली असतांना सुमारें एक महिना त्याला तुरुंगवास भोगावा लागला व यामुळें त्याच्या अंगच्या कित्येक गुणांचें प्रदर्शन झालें. हे तुरुंगांतील दिवस साक्रेटिसानें मोठ्या शांत वृत्तीनें व मोठ्या आनंदांत घालविले. या दिवसांत त्यानें आपल्या आजन्मव्यवसायाला खळ पडूं दिला नाहीं. तुरुंगांत त्याचे शिष्य व परकीय लोक येत व त्यांच्याशीं निरनिराळ्या विषयांवर वादविवाद करीत. असा क्रम थेट त्याच्या मरणाच्या क्षणापर्यंत चालला होता. शिक्षा झालेली असूनहि आपलें कर्तव्यकर्म करीत असतांना साक्रेटिसाला मरण आलें हें त्याचें केवढें भाग्य! असें भाग्य फारच थोडयांच्या वांटयास येतें. असो.

डेलॉस या बेटावर असलेल्या डेलफॉय देवावर अथीनियन लोकांची फार भक्ति होती. ते त्या देवाला आपला संरक्षक देवच मानीत. यामुळें दरवर्षीं एका विवक्षित वेळीं एक स्वतंत्र गलबत नगरातर्फे या देवाच्या पूजेअर्चेकरितां पाठविण्यांत येत असे. अथेन्सच्या बंदरांतून हें गलबत सुटल्यापासून परत येईपर्यंतचा काळ—याला सुमारें महिना लागे—पवित्र व धार्मिक मानला जात असे, व या पर्वणींत कोणत्याहि माणसाला मरणाची शिक्षा दिली जात नसे. साक्रेटिसाच्या खटल्याचा ज्या दिवशीं निकाल झाला त्याच दिवशीं हें गलबत बंदरांतून हाकारल्यामुळें साक्रेटिसाची मरणाची शिक्षा तावडतोब अंमलांत आली नाहीं, व या कारणानें त्याला महिनाभर तुरुंगांत काढावा लागला व तो साक्रेटिसानें कशा प्रकारानें घालविला याचें दिग्दर्शन वर आलेंच आहे.

साक्रेटिसाच्या तुरुंगवासास जवळ जवळ महिना होत आला असतांना एके दिवशीं अगदीं पहाटेस साक्रेटिसाचा पूर्वीचा शिष्य व उतारवयांतील मित्र क्रिटो हा तुरुंगांतील साक्रेटिसाच्या खोलीशीं आला. परंतु त्याला गाढ झोंप लागली आहे असें क्रिटोला समजलें. हें पाहून आपल्या गुरूच्या शांत व आनंदी वृत्तीबद्दल त्याला सप्रेम कौतुक वाटलें. साक्रेटिस आपोआप जागा झाल्याबरोबर त्यानें आपल्या मित्राची विचार

पूस करून इतक्या ऱ्हांटेस येण्याचें कारण विचारलें, तेव्हां क्रिटोनें डेलॉसला गेलेलें गलबत आज येणार अशी दुःखदायक बातमी आली आहे असें मोठा सुस्कारा टाकून सांगितलें. साक्रेटिसास ही बातमी ऐकून कांहींएक वाईट न वाटतां उलट ही सुदैवाची बातमी आहे असेंच त्याला वाटलें. परंतु तो म्हणाला " गलबत आज येईल असें मला वाटत नाहीं. कारण आतांच एक शुभ्र वस्त्र परिधान केलेली सुंदर स्त्री माझ्या स्वप्नांत आली व ती मला म्हणाली:—

'आज पासूनी तिसरे दिवशीं जाशिल तूं यमलोकाला !' तेव्हां तुम्ही मला उठविलें नाहीं हें चांगलें केलें; पण तुमचें येण्याचें कारण सांगा."

क्रिटो मोठया कळकळीनें बोलला " गुरुजी, मीं आपल्याला किती तरी वेळा विनाति केली आहे व आतां ही शेवटची करीत आहें. आपण आपल्या जीवाची उगाच आहुती घालीत आहां. या आपल्या करण्यानें आम्हीं आपल्या मित्रांनीं आपली सुटका करण्याचा कांहीं प्रयत्न केला नाहीं, असा आमच्यावर जनापवाद राहील. मी आपल्याला सांगतों कीं, मी आपल्या सुटकेची सर्व तयारी करून ठेविली आहे. तुरुंगावरच्या सर्व अधिकाऱ्यांची समजी केली आहे. या कामाला फारसा खर्च येतो अशांतला प्रकार नाहीं, व जरी माझी सर्व संपत्ति या कामीं खर्च झाली तरी मी ती करण्यास एका पायावर तयार आहे. आपण आपल्या मित्राच्या साहाय्यानें तुरुगांतून निघून गेल्यास आपल्या मित्रांना सरकाराकडून त्रास, दगदग व खर्च सोसावा लागेल, या भीतीनें जर आपण माघार घेत असाल तर त्याबद्दल आपण अगदीं बेफिकीर असा. आमचें आम्ही पाहून घेऊं ! दुसऱ्या शहराचे लोक आपलें आदरातिथ्य करण्यास व आपल्यास आश्रय देण्यास उत्सुक आहेत. सर्व व्यवस्था मीं थेसलींत करून ठेविली आहे.आपला नुसता रुकार पाहिजे आहे.शिवाय,जीव जगविणें हातांत असतां तो जाणूनबुजून घालविणें हें पाप नाहीं का ? आणखी असें पहा, आपण सडे नाहींत आपल्याला मुलेंबाळें आहेत; त्यांचें संगोपन करणें व त्यांना शिक्षण देऊन उत्तम नागरिक बनविणें

हें आपलें कर्तव्यकर्म आहे. तें कर्तव्यकर्म आपल्या मरणानें आपण टाळीत नाहीं काय ? हा एक आपला भित्रेपणाच आहे. आपल्या पश्चात् आपलीं मुलें पोरक्यासारखींच होणार व अशा मुलांची स्थिति पुढें कशी होते हें आपल्याला ठाऊकच आहे. आपल्या मुलांचें संगोपन व संवर्धन करण्याचें काम करण्याची ज्याची इच्छा नाहीं त्या मनुष्यानें संसारांत पडूं नये ! शिवाय, आपल्या या प्रसंगांत प्रथमपासून अन्याय व चुका झालेल्या आहेत. प्रथमतः आपल्याला मुळीं खटल्यांत हजर राहण्याचेंच कारण नव्हतें ! पुढें खटला चालविण्याच्या कामांतहि चुका झाल्या व आतां शेवटीं आपला अन्यायानें जीव जाणार. तरी आपण या अन्यायाला कां बळी पडावें ? तेव्हां गुरुजी, माझें ऐका. मीं सर्व तयारी केली आहे. आतां विचार करण्यास वेळ नाहीं. आजच्या रात्रींच येथून गेलें पाहिजे. नाहीं तर सर्व घात झालाच म्हणा. तरी ही माझी शेवटची विनंति मान्य कराच !"

या कळवळ्याच्या भाषणास साक्रेटिसानें तितक्याच कळवळ्यानें पण गंभीरपणानें उत्तर दिलें. साक्रेटिस ह्मणाला 'प्रिय क्रिटो ! माझ्या सुटकेबद्दलची तुमची कळकळ जर चांगली असली तर ती बहुमोलाची होय खरी; परंतु जर ती वाईट असली तर मात्र फार भयंकर आहे ! मी आजपर्यंत कोणतीहि गोष्ट अविचारानें केली नाहीं; सुविचारास पटल्याखेरीज कोणतीहि गोष्ट करावयाची नाहीं असा माझा क्रम आहे, हें तुम्हाला ठाऊक आहे. तुमच्या ह्मणण्याप्रमाणें आज माझ्यावर दुर्दैव ओढवलें आहे म्हणून मी आतां सुविचाराची कास सोडणें रास्त होईल काय ? तेव्हां, तुह्मी ह्मणतां तसें वागणें हें नीतिदृष्ट्या चांगलें आहे किंवा नाहीं याचा आपण पाहिजे तर पुनः विचार करून विचारांतीं जें चांगलें ठरेल त्याप्रमाणें वागूं; परंतु नुसत्या लोकांच्या मताला मान देण्याकरितां, किंवा दुसऱ्या कोणत्याहि कारणाकरितां, अयोग्य तऱ्हेनें वागणें आपल्याला व आपल्या आजपर्यंतच्या उपदेशाला शोभणार नाहीं. खर्चाचा, मुलांच्या शिक्षणाचा, दुसऱ्या शहरांच्या आश्रय देण्याच्या उत्सुकतेचा, किंवा इतर

कारणांचा येथें संबंध येत नाहीं. आपलें करणें सुविचाराला पटतें किंवा नाहीं, हाच काय तो आपला महत्त्वाचा प्रश्न आहे. प्रिय क्रिटो! मी करीत आहें हें युक्तीस व सुविचारास धरून आहे, अशी माझी पूर्ण खातरी आहे व तुमचीहि तशीच व्हावी अशी माझी इच्छा आहे. जनतेच्या मताला मान देण्याचें कारण नाहीं, हें मी आजपर्यंत ह्मणत आलों नाहीं का? मत आपल्या फायद्याचें आहे ह्मणून तें मत आजच ग्राह्य झालें काय? वाईट तें सर्वत्र वाईटच ना? आपल्यावर दुर्दैव ओढवलें ह्मणून वाईटाचें चांगलें असें ह्मणावयाचें नाहीं ना? मग अथीनियन लोकांच्या हुकुमानें मला येथें आणून ठेविलें असतां त्यांच्या संमतीवांचून येथून जाणें रास्त होईल का? एकानें अन्याय केला ह्मणून दुसऱ्यानें त्याच-प्रमाणें वागावें काय? एकानें गाय मारली तर दुसऱ्यानें वासरूं मारूं नये असें आजपर्यंत आपण शिकवीत आलों तें आतां धाब्यावर बसवाव-याचें काय? अथीनियन लोकांनीं मला अन्यायानें शिक्षा केली ह्मणून आपण आपलें ब्रीद सोडावें काय? तेव्हां कोणत्याहि दृष्टीनें विचार करतां माझें येथून निघून जाणें गैर होईल; असें तुह्माला दिसत नाहीं काय? मला तर माझें असें वर्तन ह्मणजे सर्व आयुष्यांतील विचारांवर क्षणिक जीवाच्या आशेकरितां पाणी सोडण्यासारखें वाटत आहे! कायदा पालन करणें हा एक सद्गुणाचा प्रमुख भाग आहे. त्याचें अशा करण्यानें उल्लंघन होत नाहीं का? मला तर या क्षणीं माझ्यापुढें जणूं कांहीं अथे-न्सचे कायदे व राज्यघटना हीं मूर्तिमंत उभीं असून तीं माझी कान-उघाडणी करीत आहेत असें वाटतें. 'साक्रेटिस! तुह्मीं काय करावयाचें मनांत आणिलें आहे? तुमच्या पळण्याच्या प्रयत्नानें तुह्मी आमचा गळाच दाबीत नाहीं काय? कायदा व राज्यघटना यांखेरीज कोणता समाज सुरळित चालूं शकेल? जेथें कायद्याची पायमल्ली होते, जेथें खासगी व्यक्ति कायद्याला धाब्यावर बसवितात, जेथें न्यायाधिशांचा निकाल कोणी जुमानीत नाहीं, तेथें सुरक्षितपणें राहणें तरी शक्य आहे काय? साक्रेटीस! तुम्ही म्हणाल, कायद्यांनीं मला अन्यायानें वागविलें,

म्हणून त्यांना मीं झुगारून देतों. यावर आम्ही कायदे तुम्हांला विचारतों कीं, असा का तुमचा आमचा करार होता ! तुमच्या फायद्याचे हिताचे असले म्हणजेच कायदे पाळावे असें म्हणाल तर मग त्यांत कायदा पाळण्याचा सद्गुण तो काय ? तुम्ही स्वार्थाकारितां कायदा पाळला असें होईल. एका विवक्षित प्रसंगीं कदाचित् तुम्हांला अन्याय झाला असेल पण सामान्यत्वें कायद्यांचा तुम्हाला उपयोग होतो ना ? तुमचें जीवित. तुमचें संगोपन, तुमचें शिक्षण, तुमचें जीवितसंरक्षण, तुमची विश्रांति हीं मुळीं कायद्यामुळेंच आहेत ना ? कायद्यानें तुमचे आईबाप विवाहपाशबद्ध झाले व त्याअन्वयेंच तुमचें कुलीनपणानें जगांत येणें संभवनीय झालें. पुढें तुमचें संगोपन, शिक्षण वगैरे सर्व कायद्याच्या बंधनामुळें झालीं. असे मनुष्याच्या सर्वतोपरी उपयोगी पडणारे जे आम्ही कायदे, त्यांच्या मुळावर आपल्या वर्तनानें तुम्ही घाला घालण्यास कसे प्रवृत्त होतां ? कायदा जें काम करावयास सांगेल तें केलेंच पाहिजे, हेंच नागरिकांचें कर्तव्यकर्म नाहीं का ? कायदा पाळण्याच्या सद्गुणाचे तुम्हींच इतके दिवस गोडवे गायलेत ना ? आतां तुमच्यावर कायद्याचा अनिष्ट परिणाम होऊं लाग- ल्याबरोबर तुम्ही आम्हाला झुगारून देणें रास्त होईल काय ? शिवाय जर आमचा अंमल तुम्हाला सुखावह वाटत नव्हता तर तुम्हाला शहर सोडून जाण्याची मुभा होती. परंतु तुम्हाला तर आमचे साम्राज्य आवडत होतें. जरी तुम्ही अथेन्स खेरीज दुसऱ्या राज्य- व्यवस्थेची तारीफ करीत होतां, तरी तुम्हीं आपलें सत्तर वर्षांचें आयुष्य येथेंच घालविलें; आपला संसार येथेंच केलात; येथल्याच कायद्याच्या अंमलाखालीं आपले इतके दिवस सुखासमाधानानें गेले. तुमच्या येथें राहण्यानें, येथें संसार करण्यानें तुम्ही अथेन्सचे कायदे पाळण्याचा प्रत्यक्ष करार केला नाहीं काय ? व आतां तुमच्या मतें तुम्हाला अन्यायानें शिक्षा झाली म्हणून तुम्हीं मुळीं कायद्याच्या मुळावरच घाला घालावयास लागलां, याला काय म्हणावें ? कायदा मोडण्यानें तुम्ही तिहेरी पापाचे धनी होत नाहीं काय ? आम्ही तुम्हाला गुरूसमान, तेव्हां यांत गुरूची अवज्ञा होते.

आह्मी तुमचें संगोपन व पालनकर्ते, तेव्हां यांत कृतघ्नपणाचा दोष येतो. व शेवटीं तुमचा आमचा करार झालेला तेव्हां यांत करार मोडण्याचा दोष येतो. शिवाय, खटल्यास सुरुवात होण्यापूर्वीं कायद्याप्रमाणेंच तुह्माला हा देश सोडून जाण्याची मुभा होती. त्या वेळीं जें करणें तुमच्या हातीं होतें तें तुह्मीं केलें नाहींत व आमच्या निकालावर विसंबून राहिलां. तुह्माला तुमचा निरपराधीपणा शाबीत करण्याचीहि पूर्ण मुभा होती. अशा सर्व गोष्टीची तुह्माला सलवत असतांना तुमच्याकडून त्यांचा अवलंब झाला नाहीं व आतां तुमच्याविरुद्ध निकाल झाल्यावर तुह्मीं देशांतर करण्याचें मनांत आणतां, याला काय ह्मणावें ? समजा, तुह्मीं दुसऱ्या देशांत पळून गेलांत तर तेथें तुह्माला यापुढें सुख लागेल काय ? तुमच्याकडे लोक वांकड्या नजरेनेंच पाहणार. तुम्हीं कायद्यांना धाब्यावर बसविणारे, असेंच लोक समजणार. सुव्यवस्थित राज्यपद्धतीच्या देशांत तुह्माला लोक राहूं देणार नाहींत. कारण, तुम्हीं आपल्या वर्तनानें अशा व्यवस्थेविरुद्धच बंड केल्यासारखें होईल व या आपल्या पळपुट्या वर्तनानें तुम्हीं तुमच्या प्रतिपक्षीयांच्या म्हणण्याचें समर्थनच कराल. थेसलीसारख्या अव्यवस्थित व बेबंदशाई देशांत कदाचित् तुह्माला राहूं देतील; परंतु तेथें तुह्मी काय करणार ? सद्गुण, न्यायीपण, सुव्यवस्थितपणा व कायदापालन यांविषयीं तुह्मी तेथें बोलणार काय? परंतु या गोष्टींचा तेथें गंधहि नाहीं. शिवाय, तुमच्या ह्मणण्याला कोण मानील ? कारण, तुमच्या प्रत्यक्ष वर्तनानें तुह्मीं या गोष्टी जीवापेक्षां व सुखनिवासापेक्षां कमी महत्त्वाच्या आहेत असें दाखविलें आहे. तेव्हां थेसलींत तुह्मांला सन्मान्य शिक्षक ह्मणून राहतांच येणार नाहीं—तर लोकांचा दास व खुषमस्कऱ्या अशा तऱ्हेनेंच रहावें लागेल व अशा वागण्यांत जर तुह्माला सुख वाटेल तर तुमच्या आजपर्यंतच्या सद्गुणाच्या गौरवाच्या गप्पा होत असें लोक समजणार नाहींत काय? तेव्हां साक्रेटीस, आह्मी ह्मणतों त्याचा विचार करा. आह्मी कायद्यांनींच तुमचें सर्वस्वीं संगोपन केलें आहे. तरी मुलाबाळांचा विचार करूं नका, आपल्या जीवाचा विचार करूं नका, किंवा न्यायापलीकडे दुसऱ्या कोणत्याहि

बाबतीचा विचार करूं नका ! तुह्मी अशा तऱ्हेनें वागलांत तरच तुह्माला स्वर्गांतील न्यायाधीशापुढें उजळ माथ्यानें उभें राहतां येईल व आपलें संरक्षण योग्य प्रकारें करतां येईल. हें अगदीं उघड आहे कीं, तुमच्या पळपुट्या वर्तनानें तुह्माला किंवा तुमच्या मित्रांना इहपरलोकीं मुळींच सुख होणार नाहीं, किंवा तुमचें आयुष्य उन्नत किंवा पवित्र होणार नाहीं. आतां तुह्मीं जर मेलांत तर लोक असें ह्मणतील कीं, अथीनियन लोकांनीं साक्रेटिसास अन्यायानें शिक्षा दिली; परंतु तुमच्या विरुद्ध त्यांना चकार शब्दहि काढतां येणार नाहीं. परंतु जर तुह्मीं अशा लज्जास्पद रीतीनें अन्यायाची अन्यायानें फेड केलीत व वाईटाची वाईटानें फेड केलीत आमच्याशीं केलेले करारमदार मोडलेत व ज्याच्या घाताचा विचार तुह्मीं स्वप्नांतहि कधीं आणूं नये त्या तुमच्या मित्रांचा, तुमच्या देशाचा व आमचा घात तुह्मीं केलात तर आह्मी तुमच्या जीवांत जीव आहे तों तुमच्यावर रुष्ट राहूं व तुह्मी मेल्यावर आमचे परलोकचे कायदेबंधु प्रेमानें तुमचें आदरातिथ्य करणार नाहींत. कारण, त्या कायद्यांना समजेल कीं, पृथ्वीवर असतांना तुम्ही आपल्या हातून होईल तितकी कायद्याची पायमल्लीच केलीत. तेव्हां तुम्ही आमचें म्हणणें ऐका. क्रिटोच्या मनधरणीकडे लक्ष देऊं नका !"

" प्रिय क्रिटो ! हे कायद्यांचे शब्द माझ्या कानांत सारखे गुणगुणत आहेत असें मला वाटतें व यामुळें मला दुसरें कांहींहि ऐकूं येत नाहीं व म्हणूनच माझें मन वळविण्याचा तुमचा प्रयत्न अगदीं व्यर्थ आहे ! तरी सुद्धां जर तुम्हाला आपला हेतु साध्य वाटत असेल तर तुम्ही आपला प्रयत्न चालू ठेवा."

यावर क्रिटो म्हणाला " साक्रेटीस ! आपल्या म्हणण्यापुढें माझ्यानें कांहींहि बोलवत नाहीं. मी कुंठित झालों आहें."

साक्रेटीस म्हणाला " प्रिय क्रिटो ! तर मग आपण हा वाद थांबवूं या व ईश्वर जशी आपणाला प्रेरणा करीत आहे त्याप्रमाणेंच वागूं या."

( ४ )

# साक्रेटिसाचा मृत्यु.

" **नास्ति जीविताद‍भिमततरं किमपीह जन्तूनाम्** " ही बाणभट्टाची उक्ति किती यथार्थ आहे ! प्राणिमात्राला आपल्या जीवापेक्षां जास्त प्यारें कांहीं नाहीं ! मातेचें पुत्रावरील प्रेम अत्यंत निरपेक्ष व प्राणापलीकडील असतें असें आपण म्हणतो. परंतु खरी स्थिति एका हरिदासी गोष्टींत वर्णिलेल्या वानरीच्या स्थितीप्रमाणें आहे, यांत शंका नाहीं. एकदां एक वानरी एका पुरांत सांपडली, तेव्हां ती आपलें मूल पाठीवर घेऊन एका उंच ठिकाणीं जाऊन बसली; परंतु तेथेंहि पाणी आल्यावर ती आणखी उंच ठिकाणीं गेली, पण पाणी तितक्या उंच चढलें, तेव्हां वानरीचा निरुपाय होऊन ती दोन पायांवर उभी राहिली, आणि आपल्या मुलाला तिनें डोकीवर घेतलें परंतु पाणी भराभर चढतच चाललें, व तिच्या गळ्यापर्यंत येऊन तिचा जीव गुदमरूं लागला, तेव्हां तिनें आपलें डोकीवरचें मूल काढून आपल्या पायांखालीं घातलें, व त्यावर उभी राहून पाण्यापासून आपला बचाव करूं लागली, पण व्यर्थ ! शेवटीं त्या पुरांत वानरी व तिचें पिलूं या दोघांचाहि अंत झाला. तेव्हां सर्वांना आपल्या स्वप्राणापलीकडे प्रियतम कांहीं नाहीं, हें खरें आहे, व हीच गोष्ट मनुष्यप्राण्यालाही लागू आहे. मनुष्याला जीवितासारखें दुसरें कांहींएक प्रिय नाहीं. " **अंगं गलितं पलितं मुंडं, दशनविहीनं जातं तुंडम्** " अशा जख्खड म्हाताऱ्यालासुद्धां जीवाची आशा सुटत नाही. एखाद्या इरसाल तिमाजी नाईकासारख्या चिक्कू माणसाला प्राणापेक्षां पैसा प्रिय आहेसा दिसतो; परंतु अशा तिमाजी नाईकापुढें जर यमराज खरोखरच दत्त म्हणून उभे ठाकले, तर त्याची

घाबरगुंडी वळून तो तिमाजी नाईक आपली सर्व संपत्ति यमराजाला देऊन टाकून जीव घेऊन धूम ठोकीत घराची वाट धरील, यांत शंका नाहीं. परंतु ज्याप्रमाणें प्राणिमात्राला समान असलेल्या पशुवृत्तीवर आपली विवेकबुद्धि व मनोदेवता या दोन शक्तींच्या योगें मनुष्य विजय मिळवितो, त्याचप्रमाणें याच दोन शस्त्रांच्या सहाय्यानें तो आपला अत्यंत प्रिय जीवहि आनंदानें सोडण्यास तयार होतो. खरी साधुवृत्ति अशा विजयातच आहे. व अशा साधुकोटीपैकींच साक्रेटिस होता, हें आतांपर्यंतच्या त्याच्या आयुष्यक्रमावरून आमच्या वाचकांना समजून आलेंच आहे. आतां या साधुपुरुषाचें मरणसमयीं वर्तन कसें होतें हें त्याच्या आयुष्यांतील शेवटच्या दिवसाची साग्र हकीगत देऊन वाचकांना दर्शविण्याचा मानस आहे.

साक्रेटिसाला मरणाची शिक्षा झाली होती, हें वाचकांना स्मरत आहेच. परंतु अथेन्सच्या नेहमींच्या चालीप्रमाणें त्या संस्थानचें गलबत त्याच संधींत धार्मिक सफरीवर गेलें. व तें परत येईपर्यंत साक्रेटिसाची शिक्षा तहकूब राहिली होती. तें गलबत परत आल्यावर दुसऱ्याच दिवशीं साक्रेटिसाची शिक्षा अमंलांत यावयाची होती. यामुळें ज्या दिवशीं संस्थानचें गलबत परत आल्याची बातमी शहरांत पसरली, त्याच्या दुसऱ्या दिवशीं अगदीं उजाडत साक्रेटिसाची शिष्य मंडळी व मित्रमंडळी आपल्या पूज्य गुरूचें व मित्राचें शेवटचें दर्शन घेण्याकरितां, व त्याच्या शेवटच्या संभाषणाचें पान करण्यासाठीं तुरुंगाच्या बाहेर जमली. त्या दिवशीं पहांटेलाच साक्रेटिसाच्या पायांतील बिड्या काढण्यांत आल्या होत्या. प्रथमतः साक्रेटिसाच्या बायकामुलांना आंत धाडण्यांत आलें. साक्रेटिसाची बायकामुलें फार रडूं लागलीं, म्हणून साक्रेटिसानें लवकरच त्यांना परत लावून तो आपल्या आवडत्या शिष्यमित्रमंडळींत येऊन बसला, व आपल्या हातानें आपले पाय चोळींत चोळीत म्हणाला " मनुष्य ज्याला सुख म्हणतात, ती किती विचित्र वस्तु आहे! सुखाच्या उलट असलेलें जें दुःख त्याच्याशीं सुखाचा किती आश्चर्यकारक

संबंध आहे ! सुख व दुःख हीं मनुष्याला एकदम मिळत नाहींत; परंतु सुखाचा पाठलाग करून तें माणसानें मिळविलें, कीं, त्याच्या मागोमाग दुःख आलेंच म्हणून समजा ! जणूं काय सुखदुःख या दोन भिन्न वस्तूंची एका टोंकाला गांठ बांधलेली आहे ! ही सुखदुःखांची सांगड जर ईसा-बानें पाहिली असती, तर त्यानें यावर एक अशी गोष्ट रचली असती, कीं, सुख–दुःखांचें भांडण होत असतां देवानें त्यांचा समेट करण्याचा प्रयत्न केला. परंतु हें त्याला साधलें नाहीं, तेव्हां त्यानें त्यांचीं टोकें एके ठिकाणीं बांधिलीं, व म्हणूनच मानव प्राण्याला एक मिळालें कीं, दुसरें त्याच्या पाठोपाठ मिळणारच म्हणून समजावें. पहा, माझी अशीच स्थिति झाली आहे. माझ्या पायांतल्या बिड्यांमुळें आतांपर्यंत मला दुःख होत होतें, परंतु त्या बिड्या काढल्याबरोबर दुःखाच्या मागोमाग सुख आलेंच !"

असें म्हणून साक्रेटिसानें आपल्या सभोंवार जमलेल्या मित्रमंडळीकडे दृष्टि फेंकली. तेव्हां त्या मंडळींत अथेन्सशिवाय इतर शहारांतले परकी गृहस्थहि आले आहेत, असें त्याला आढळून आलें व त्यांपैकीं सीब्स या गृहस्थानें प्रथमतः बोलण्यास सुरवात केली. तो म्हणाला ' अहो साक्रेटिस ! तुम्ही तुरुंगांत असतांना अपोलो देवांची प्रार्थना कवितेंत केली, व ईसाबाच्या गोष्टींना पद्यात्मक स्वरूप दिलें याबद्दल दोन दिव-सांपूर्वीं ईव्हीनस हा कवि मजजवळ चौकशी करीत होता. तरी कृपा करून याचें कारण आपण सांगाल काय ?"

सॉक्रेटिस उत्तरला, " सीब्स, त्यांना खरें तेंच सांगा. त्यांना म्हणावें आपल्याशीं किंवा आपल्या कवितांशीं स्पर्धा करण्याच्या बुद्धीनें मीं कविता केल्या नाहींत. तसें करणें कांहीं सोपें काम नाहीं. परंतु नेहमीं नेहमीं मला एक स्वप्न पडत असे, तें असें कीं, सॉक्रेटिस, काव्याचा अभ्यास करून काव्य रचा." या स्वप्नाचा मी नेहमीं असा अर्थ घेत असे कीं, देव मला माझ्या अंगीकृत कामांत उत्तेजनच देत आहे. कारण मीं आपलें सर्व आयुष्य अध्यात्मविद्येंत घालविलें आहे व अध्यात्मविद्या हीच सर्वांत

उच्चतम कविता आहे, अशी माझी समजूत होती. परंतु मी तुरुंगांत पड-ल्यानंतर हें माझें स्वप्न मला लौकिक अर्थानें काव्य करण्यास तर सांगत नाहीं ना असें वाटूं लागलें आणि म्हणून आपल्या मरणापूर्वी या लौकिक अर्थानें कविता रचून मीं स्वप्नांतली आज्ञा पाळण्याचा बेत केला. तदनु-रूप मीं देवाची एक प्रार्थना रचली व मग मला कल्पित गोष्टी रचतां येत नाहींत, म्हणून ईसाबाच्या ज्या कांहीं गोष्टी मला आठवत होत्या, त्यांनाच पद्याचें स्वरूप देऊन मीं आपल्या मनाचें समाधान केलें. तेव्हां सीब्स, तुम्ही ईव्हीनस कवीला हें सर्व निवेदन करा. व माझा त्यांना नमस्कार सांगून माझ्या पाठोपाठ येण्याबद्दल त्यांना माझ्या तर्फे विनंति करा. कारण अथीनियन लोकांच्या इच्छेप्रमाणें मी आज प्रयाण करीन असें दिसतें."

हें भाषण ऐकून सीमियस आश्चर्यानें म्हणाला, "सॉक्रेटिस, ईव्ही-नसला आपला कोण विलक्षण उपदेश हा! मी त्याला पुष्कळ वेळां भेटलों आहें व त्यांच्याबद्दल मला जी माहिती आहे, तीवरून मला असें वाटतें कीं शक्य असेल तेथपर्यंत ईव्हीनस आपल्या उपदेशाप्रमाणें खात्रीनें वागणार नाहीं!"

सॉक्रेटिसानें विचारलें, "काय, ईव्हीनस हा तत्वज्ञानी नाहीं काय?"

सीमीयस उत्तरला, "होय. तो आहे असें मला वाटतें."

सॉक्रेटिस म्हणाला, "तर मग ईव्हीनस मरणाची इच्छा करील व ज्याला ज्याला म्हणून तत्वज्ञानाच्या अभ्यासाची गोडी आहे, तो तो अशीच इच्छा करील. मात्र तो आत्महत्या करणार नाहीं. कारण असें करणें पाप आहे असें म्हणतात."

इतकें बोलून सॉक्रेटिसानें आपले पाय खाटेवरून जमिनीवर ठेवले. व राहिलेल्या सर्व संभाषणाच्या वेळीं तो असाच बसून होता.

नंतर सीब्सनें सॉक्रेटिसाला विचारलें, "सॉक्रेटिस, आत्महत्या करणें वाईट, पण तत्वज्ञानी मरणाऱ्या माणसाच्या लागोपाठ जाण्यास इच्छा करील असें आपण म्हणतां, याचा अर्थ काय?"

सॉक्रेटिस म्हणाला, तुम्हीं दोघेजणांनीं फायलोलॉसजवळ जाऊन या गोष्टीबद्दल ऐकलें नाहीं काय ? "

" निश्चित असें कांहीं ऐकलें नाहीं."

" बरें, मलाही सांगोसांगीच ठाऊक आहे. तरी पण मी जें ऐकलें आहे, तें तुम्हांला सांगावयाला काय हरकत आहे ? खरोखरीं जर मी परलोकाच्या प्रवासाला निघण्याच्या तयारींत आहें, तर त्या प्रवासाच्या स्वरूपाबद्दल व त्या प्रवासाबद्दल बोलणें रास्त नाहीं काय ? आतांची वेळ व सूर्यास्त यांमधल्या काळाचा यापेक्षां जास्त चांगला सद्व्यय आपण काय करणार ?"

" तर मग साक्रेटिस, आत्महत्या करणें वाईट असें ते कां म्हणतात? थीब्स शहरीं असतांना असें करणें चांगलें नाहीं, असें फायलोलॉस म्हणतांना मीं ऐकलें आहे, हें अगदीं खरें आहे. दुसऱ्यांच्या तोंडूनही मीं तेंच ऐकलें आहे, परंतु कोणाकडूनही मला निश्चयात्मक असें कांहींएक कळलें नाहीं."

सॉक्रेटिस म्हणाला, " तुम्हीं धीर सोडतां कामा नये. कदाचित् कधीं काळीं तुम्हांला कांहीं तरी निश्चयात्मक कळेल. दुसऱ्या नियमांना अपवाद असतील, परंतु या नियमाला अपवाद नाहीं. तुम्हांला आश्चर्य वाटत असेल, तें असें कीं, वाईट गोष्ट केव्हां केव्हां व कांहीं कांहीं माणसांच्या बाबतींत चांगली होते. परंतु मरणाला मात्र ही गोष्ट लागू नाहीं. ज्या माणसांनीं मरणें बरें, त्यांनीं देखील आपल्या हातांनीं आपल्यावर मरण आणतां कामा नये, त्यांनीं त्याकरतां दुसऱ्याची वाट पहात राहिलें पाहिजे."

हंसत हंसत व आपल्या प्रांतिक भाषेंत सीब्स म्हणाला, " खरेंच. "

सॉक्रेटिस म्हणाला, " खरेंच. अशा तऱ्हेचें विधान तुम्हांला विचित्र वाटेल. तरी पण तें सयुक्तिक आहे. आणि या विधानाला एक सयुक्तिक कारणही दाखवितां येईल. पण मनुष्यप्राणी हा एका प्रकारच्या तुरुंगांत आहे व तेथून त्यानें आपली मुक्तता करून घेतां कामा नये, अथवा तेथून

पळून जातां कामा नये. हें जें कारण गूढविद्या सांगते, तें बरेंच गहन असून समजण्यास सोपें नाहीं. तरी मला असें वाटतें कीं, देव हे मनुष्याचे पालक आहेत, व आपण मानव हे त्यांची मालमत्ता आहों. तुम्हाला नाहीं का असें वाटत ?"

" होय, मलाही असें वाटतें."

" तर मग तुम्ही तशा प्रकारची इच्छा प्रदर्शित केली नसतांना तुमच्या एखाद्या अंकितानें आत्महत्या केली तर तुम्हांला राग नाहीं का येणार ? आणि शक्य असल्यास तुम्ही त्याबद्दल त्याला शिक्षा नाहीं का करणार ? "

" खात्रीनें करूं."

" तर आतां या विचारसरणीनें कोणत्याही माणसाला आत्महत्या करण्याचा हक्क नाहीं असें नाहीं का होत ? प्रथम म्हटल्याप्रमाणें देवाकडून आग्रहाचें बोलावणें येईपर्यंत मनुष्यानें वाट पाहिली पाहिजे. त्यानें आत्महत्या करतां नये."

सीब्स म्हणाला, " होय. तुमचें म्हणणें स्वाभाविक दिसतें. पण तुम्ही आतांच म्हणत होतां कीं तत्वज्ञानी मरणाची इच्छा करील. मग देव पालनकर्ता आहे, व आपण त्याचे चाकर आहों, हें जर खरें, तर या दोन विधानांत विरोध येत नाहीं का ? सर्व शासनकर्त्यांमध्यें श्रेष्ठ असे देव जर शहाण्यावर देखरेख ठेवतात, तर या अंमलापासून आपली सुटका करून घेण्याची इच्छा शहाणा करील असें म्हणणें युक्तीला पटत नाहीं. देव जितकी त्याची काळजी घेत आहेत, त्यापेक्षां जास्त काळजी आपण स्वतंत्र झाल्यावर आपली आपण घेऊं असें त्याला खास वाटणार नाहीं. कदाचित् मूर्खाला असें वाटेल व आपल्या धन्यापासून पळून गेल्यास बरें, असें तो म्हणेल. इतक्या चांगल्या धन्याला आपण सोडून जाऊं नये, तर शक्य तितका काळ त्याच्याजवळच रहावें, असें त्याच्या मनांत येणार नाहीं, व म्हणून अविचाराच्या भरांत तो पळून जाईल. परंतु आपल्यापेक्षां सर्व तऱ्हेनें श्रेष्ठ असणाऱ्या धन्याजवळ नेहमीं राहण्याची

इच्छा शहाणा करील, यांत शंका नाहीं. पण ही विचारसरणी जर खरी आहे तर आतां आपण म्हणतां त्याच्या उलटच अनुमान निघतें. शहाण्या माणसाला मरणाबद्दल वाईट वाटलें पाहिजे, व मूर्खाला आनंद वाटला पाहिजे.

या सीब्सच्या म्हणण्यानें सॉक्रेटिसाला आनंद झाल्यासारखा दिसला. त्यानें आमच्याकडे पाहिलें व म्हटलें, " सीब्स, हा नेहमीं प्रमाणांची छाननी करतो. त्याला निव्वळ दुसऱ्याच्या विधानानें कधींच समाधान होत नाहीं."

सीमीयस म्हणाला, " होय, सॉक्रेटीस, पण सीब्स म्हणतो, त्यांत कांहीं तरी तथ्य आहे, असें मलाही वाटतें. खऱ्याखुऱ्या शहाण्या माणसांनीं आपल्यापेक्षां चांगल्या धन्यापासून पळून जाण्याची व त्याची चाकरी चटकन् सोडण्याची कां इच्छा करावी ? मला वाटतें कीं, सीब्सच्या म्हणण्याचा सर्व रोख तुमच्याकडे आहे. कारण आपल्याच म्हणण्याप्रमाणें जे देव इतके चांगले धनी आहेत, त्यांना व आम्हांला तुम्ही सोडून जाण्याला इतके उत्सुक झालां आहां."

सॉक्रेटीस म्हणाला, " तुमचें म्हणणें रास्त आहे. मीं न्यायाच्या कोर्टांत असल्याप्रमाणें तुमच्या आरोपाचें खंडन केलें पाहिजे, असें तुमचें म्हणणें."

सीमीयस म्हणाला, " होय. हाच आमचा आशय आहे."

सॉक्रेटिस म्हणाला, " बरें तर माझ्या खटल्याच्या चौकशीच्या वेळीं माझ्या हातून माझ्यावरील आरोपाचें निरसन न्यायाधिशांना पटेल अशा तऱ्हेनें झालें नाहीं. आतां तरी तें तुम्हांला पटण्यासारखें होवो, म्हणजे झालें. सीब्स व सीमीयस, चांगल्या व शहाण्या देवांच्या सहवासांत व या मर्त्यलोकांच्यापेक्षां चांगल्या लोकांच्या सहवासांत माझ्या मरणानंतर मला रहावयाला सांपडेल, अशी जर माझी समजूत नसती तर मला मरणाबद्दल खरोखरी वाईट वाटलें असतें. पण मी चांगल्या लोकांच्या सहवासांत राहणार अशी मला आशा आहे. अशा अतींद्रिय गोष्टींबद्दल जितकी

खात्री असणें शक्य आहे, तितकी माझी खात्री आहे. मी चांगल्या धन्यां-जवळ जाणार आहें. व म्हणूनच मला मरणाबद्दल दुःख होत नाहीं. माझा असा दृढ समज आहे कीं, मेलेल्यांना पुढें कांहीं एका प्रकारचें आयुष्य आहे व तें आयुष्य दुष्टापेक्षां सद्‌गुणी माणसांना जास्त सुखावह असतें."

सीमीयस म्हणाला, "बरें, पण आपण हा आपला समज आपल्या-जवळच ठेवून जाणार कीं, आम्हांलाही त्याचा फायदा देणार? असें दिसतें कीं, या समजांत आमचाही हितसंबंध आहे. शिवाय जर तुम्ही आमची आपल्या म्हणण्याबद्दल खात्री केली तर तुमच्या वर्तनाचें तुम्ही समर्थन केल्यासारखें होईल."

सॉक्रेटिस म्हणाला, "मी प्रयत्न करून पाहतों, पण क्रिटो माझ्या-जवळ बोलायला पाहतो आहे असें मलावाटतें. तर प्रथमतः त्याचें म्हणणें ऐकूं या."

क्रिटो म्हणाला, "सॉक्रेटिस, मला फक्त हेंच सांगावयाचें आहे कीं, तुम्हाला विष देण्याचें काम ज्या माणसाचें आहे त्यानें मला तुम्हाला असें बजवायला सांगितलें आहे कीं आपण फार बोलूं नका. कारण बोल-ण्यानें मनुष्याचें रक्त तापतें व मग विषाचा परिणाम उष्णतेनें कमजोर होतो. जे लोक आपलें रक्त तापवून घेतात, त्यांना केव्हां केव्हां २ किंवा ३ वेळां सुद्धां विषप्राशन करावें लागतें."

सॉक्रेटिस म्हणाला, "बरें तर मग. त्याला आपल्या कामाला लागूं दे व दोनदां किंवा गरज लागल्यास तीनदां मला विष देण्याची त्याची तयारी असूं दे, म्हणजे झालें."

क्रिटो म्हणाला, "तुम्ही हेंच उत्तर द्याल, हें मला ठाऊक होतें. परंतु त्या माणसाचा फार आग्रह होता."

सॉक्रेटिस म्हणाला, "त्याच्या म्हणण्याकडे लक्ष्य देण्याचें कारण नाहीं. पण आपण आपल्या वादाविषयाकडे वळूं."

इतकें प्रस्तावनारूप संभाषण झाल्यावर सॉक्रेटिसानें प्रथमतः तत्वज्ञान ही एक प्रकारची मरणमीमांसा कशी आहे, हें सिद्ध केलें व नंतर आत्मा

अमर आहे, हा आपला समज कसा खरा आहे, याबद्दल विवेचन केलें. सीब्स व सीमीयस यांनीं शक्य तितके आक्षेप घेतले, परंतु या सर्व आक्षेपांचें साक्रेटिसानें खंडन केलें व आपलें म्हणणें प्रमाणांनीं सिद्ध केलें. परंतु हा सर्व वादविवाद व त्यांतील प्रमाणें हीं सॉक्रेटिसाचीं नसून त्या प्रमाणांमध्यें प्लेटोचें सर्व तत्वज्ञान व त्याचीं विशेष मतें यांवरच भिस्त ठेवली असल्यामुळें हा भाग बराच गहन व कांहींसा रुक्ष आहे व तो माझ्या वाचकांना कंटाळवाणा वाटण्याचा फार संभव आहे, म्हणून त्या वादविवादाचा अनुवाद येथें देत नाहीं. शिवाय सॉक्रेटिसाच्या चरित्राच्या दृष्टीनें त्याचा कांहीं उपयोग नाहीं.पण हा आत्म्याचा वाद सॉक्रेटिस बहुतेक सर्व दिवसभर करीत होता. वादाच्या शेवटीं सॉक्रेटिसानें मरणानंतर आत्मा आपापल्या पापपुण्याप्रमाणें निरनिराळ्या लोकीं कसा जातो, व तेथें त्याला आपल्या चांगल्या वाईट कृत्यांबद्दलचें योग्य बक्षीस किंवा शिक्षा कशी होते याबद्दलची आख्यायिका सांगितली. ही गोष्ट अतींद्रिय असल्यामुळें प्रमाणांनीं सिद्ध करतां येण्यासारखी नाहीं, असेंही त्यानें कबूल केलें व नंतर तो म्हणाला, " मी वर्णन केल्याप्रमाणें हुबेहूब स्थिति आहेच, असें समंजस मनुष्य आग्रहानें सांगणार नाहीं. पण आत्मा व त्याचा पुढील निवास यांसंबंधीं असें कांहीं तरी असावें, असें मला वाटतें. कारण आत्मा अमर आहे, एवढें आपण सिद्ध केलें आहे. तेव्हां पुढील वर्णनावर भरंवसा ठेवणें बरें, व मनांत शंका आल्यास त्या असल्या गोष्टीच्या मंत्रांनीं मनांतून घालवून लावणें रास्त. म्हणूनच जर मनुष्यानें शरीर व विषयसुख यांची पर्वा न करतां विद्याधन व सद्गुणधन मिळविण्यांत आपला वेळ खर्च केला असेल,तर त्याने आपल्या आत्म्याबद्दल काळजी न करतां आनंदानें मरणाला राजी असलें पाहिजे. सीब्स सीमीयस व माझ्या इतर स्नेह्यांनो ! तुम्ही सर्व आपापल्या योग्य वेळीं या प्रवासावर निघाल. पण कविवचनाप्रमाणें दैवानें मला आतां बोलाविलें आहे, तेव्हां मी स्नान करून तयार व्हावें, हें बरें. कारण, विष

घेण्याच्या आधींच स्नान केलेलें असलें म्हणजे प्रेताला स्नान घालण्याचा त्रास बायकामाणसांना पडणार नाहीं."

सॉक्रेटिसाचें बोलणें संपल्यावर क्रिटोनें उत्तर दिलें, "आपली इच्छा ठीक आहे. पण तुमच्या मित्रांना किंवा मला आपल्या मुलांबद्दल किंवा दुसऱ्या गोष्टींबद्दल कांहीं सांगावयाचें आहे काय ? शेवटीं आपल्याकरतां आम्हीं काय करावें ?"

सॉक्रेटिस म्हणाला, "क्रिटो, मी आजपर्यंत जो तुम्हांला उपदेश करीत आलों, त्याप्रमाणें तुम्ही वागलांत, म्हणजे मला सर्व कांहीं मिळालें. तुम्ही आपल्या आत्म्याची योग्य काळजी घ्या, म्हणजे माझी, माझ्या मुलां-बाळांची व तुमची स्वतःचीही योग्य सेवा केल्यासारखें होईल. मग तुम्हीं आतां मला वचन दिलें नाहीं, तरी हरकत नाहीं. परंतु जर तुम्ही आपल्या आत्म्याबद्दल बेपर्वा राहिलां, आणि आज व दुसऱ्याही प्रसंगीं वादवि-वादांत ज्या तऱ्हेच्या आयुष्यक्रमाचें चित्र आपण रेखाटलें आहे,त्याप्रमाणें वागलां नाहीं, तर तुम्हीं आज दिलेलीं वचनें कितीही लांबलांब आणि मनोभावानें दिलेलीं असोत, त्यांचा कांहींएक उपयोग नाहीं."

क्रिटो म्हणाला, "आपल्या उपदेशाप्रमाणें वागण्याचा आम्ही होईल तितका प्रयत्न करूं. परंतु तुम्हांला आम्ही कोणत्या तऱ्हेनें पुरावें ?"

सॉक्रेटिस म्हणाला, "तुमच्या इच्छेनुरूप फक्त प्रथमतः मला तुम-च्यापासून दूर जाऊं न देतां धरून ठेवलें पाहिजे."

नंतर सॉक्रेटिसानें हंसतमुख होऊन आपल्या मित्रमंडळीकडे पाहून म्हटलें, "मित्रहो ! तुमच्याजवळ बोलणारा व आपलीं प्रमाणें व्यवस्थेनें मांडणारा तो मी सॉक्रेटिस, ही गोष्ट क्रिटोला कांहीं पटलेली दिसत नाहीं. त्याला वाटतें कीं, लवकरच प्रेत होऊन पडणारें जें माझें शरीर, तोच मी, व म्हणूनच मला कसें पुरावयाचें याबद्दल तो विचारपूस करीत आहे.विष प्राशन केल्यावर मी येथें राहणार नाहीं, तर भल्या लोकांच्या वस्तीला जाईन, हें सिद्ध करण्याकरतां मीं जीं प्रमाणें उपयोगांत आणलीं व ज्या प्रमाणांच्या योगानें तुमचें व माझें समाधान झालें, तीं सर्व प्रमाणें क्रिटो-

च्या मनावर उपड्या घागरीवर पाण्यासारखीं झालीं ! तरी तो ज्याप्रमाणें चौकशीच्या वेळीं मला जामीन राहिला होता, त्याप्रमाणें आतां तुम्ही मला निराळ्या तऱ्हेनें जामीन रहा. तेव्हां मी येथून जाणार नाहीं, हजर राहीन, अशाबद्दल त्यानें हमी घेतली होती, परंतु आतां माझ्या मरणानंतर मी तुमच्याबरोबर राहणार नाहीं, तर येथून जाईन, अशाबद्दल तुम्ही हमी घ्या. असें तुम्ही केलें म्हणजे माझ्या मरणाबद्दल त्याला कमी दुःख होईल, व जेव्हां माझें शरीर जळतांना किंवा पुरतांना तो पाहील, तेव्हां मला भयंकर यातना होत आहेत, असें त्याला वाटणार नाहीं. तसेंच माझ्या स्मशानविधीच्या वेळीं सॉक्रेटिसाला कपडे चढवून नीट बसवीत आहों, किंवा सॉक्रेटिसाला जाळीत किंवा पुरीत आहों, असें तो म्हणणार नाहीं. कारण प्रिय क्रिटो ! तुम्ही हें ध्यानांत ठेवा कीं, अयथार्थ शब्दप्रयोग करणें हा मूळ दोष आहे इतकेंच नव्हे तर त्याच्या योगानें आत्म्यालाही दोष लागतो. म्हणून तुम्ही आनंदी राहून माझें शरीर पुरावयाचें असा शब्दप्रयोग करा व तें माझें शरीर तुम्हाला वाटेल त्याप्रमाणें व तुम्हाला योग्य दिसेल त्या तऱ्हेनें पुरा. "

इतकें बोलून सॉक्रेटिस उठला व स्नान करण्याकरतां दुसऱ्या खोलींत गेला. क्रिटो त्याच्या मागोमाग गेला व बाकीची मंडळी मागें राहिली. सर्वजण सॉक्रेटिसाच्या वादविषयावर बोलत होते व आपल्यावर केवढें संकट आलें आहे, आज जणूं काय आपला पिताच मरत आहे व पुढील सर्व आयुष्यभर आपण पोरके होणार असें त्यांच्या मनांत येत होतें.

इतक्यांत सॉक्रेटिसाची आंघोळ आटपली आणि त्याच्या कुटुंबाची मंडळीची—त्याला दोन अगदीं लहान व एक जाणता मुलगा होता—भेट झाली. क्रिटोच्या समक्षच तो बायकामुलांजवळ बोलला. व आपली शेवटली आज्ञा त्यांना सांगून त्यानें त्या सर्वांना घरीं लावून दिलें आणि मग तो आपल्या मित्रमंडळीकडे वळला. या वेळीं सूर्य अस्ताला जाऊं लागला होता. कारण तो आंतल्या खोलींत बराळ वेळ होता. स्नान होऊन मित्रमंडळींत बसल्यानंतर फारसें बोलणें निघालें नाहीं.

थोड्याच वेळांत सरकारी माणूस येऊन सॉक्रेटिसला म्हणाला, " सॉक्रेटिस, इतर माणसांप्रमाणें तुम्ही असमंजसपणानें वागणार नाहीं,हें मला ठाऊक आहे. सरकारी हुकमाप्रमाणें विष प्यायला मीं त्यांना सांगितलें, कीं ते माझ्यावर रागावतात व मला शिव्याशाप देतात. परंतु आजपर्यंत जे जे लोक तुरुंगांत आलेले आहेत, त्या सर्वांत तुमच्यासारखा उदार, शांत व उत्कृष्ट मनुष्य मला तर आढळला नाहीं ! आणि आतां माझी खात्री आहे, कीं तुम्ही माझ्यावर रागावणार नाहीं, तर ज्यांच्या शिरावर आपल्या मृत्यूचें खापर फुटलें आहे, त्यांच्यावर रागवाल. ज्याला उपाय नाहीं ती गोष्ट आपण शांतपणें सोसण्याचा प्रयत्न करा. मी कां आलों आहें, हें आपल्याला ठाऊक आहेच. आतां मी आपला निरोप घेतों."

सॉक्रेटिसानें त्या माणसाकडे पाहून त्याला म्हटलें, " ठीक आहे, तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें वागण्यास मी तयार आहें."

नंतर मित्रमंडळीकडे वळून तो म्हणाला, " हा मनुष्य किती सभ्य आहे ! माझ्या सर्व तुरुंगवासांत हा मनुष्य मजकडे नेहमीं येत असे. हा केव्हां केव्हां माझ्याजवळ बोले व माझ्याशीं फार चांगल्या तऱ्हेनें वागे. आतां माझ्याकरतां त्याला किती दुःख होत आहे ! क्रिटो, चला तर आपण त्याच्या म्हणण्याप्रमाणें करूं या. विष तयार झालें असलें तर आणवा व जर तें तयार झालें नसलें तर तयार करवा."

क्रिटो म्हणाला, " नाहीं. सॉक्रेटिस, अजून सूर्य टेंकड्यांवरच आहे. तो मावळला नाहीं. शिवाय मला ठाऊक आहे कीं, इतर माणसें अगदीं उशीरां विष प्राशन करतात व विष घेण्याबद्दल इशारा झाल्यावर सुद्धां हौसेनें खातात, पितात व आपल्या निवडक मित्रांचें सहवाससुख भोगतात, तेव्हां घाई करण्याचें कारण नाहीं. अजून वेळ आहे."

सॉक्रेटिस म्हणाला, " क्रिटो, ज्यांच्याबद्दल तूं बोलत आहेस ते साहजिकच तसें करतात, कारण असें करण्यापासून आपला फायदा आहे असें त्यांना वाटतें. पण मी मात्र तसें करणार नाहीं. कां कीं थोड्या उशीरानें विष पिण्यापासून मला कांहीं एक मिळणार नाहीं. उलट जें

आयुष्य बहुतेक संपत आलें आहे, त्या आयुष्याचा अधाशीपणानें संग्रह करण्याबद्दल मी आपल्याला तुच्छ मानूं लागेन. म्हणून मी म्हणतों, त्याप्रमाणें करण्याचें नाकारूं नका."

तेव्हां जवळ असलेल्या आपल्या गुलामाला क्रिटोनें खूण केली. तो गुलाम बाहेर गेला व थोड्या अवकाशानें तयार केलेल्या विषाचा पेला हातांत घेतलेल्या माणसासह तो परत आला.

त्या माणसाला पाहून सॉक्रेटिस त्याला म्हणाला, " मला काय करावयाचें याची तुला सर्व माहिती आहे ?"

त्यानें उत्तर दिलें, " फक्त हें तुम्ही प्राशन करा, व पाय जड होईपर्यंत इकडे तिकडे हिंडा व मग पडून रहा. म्हणजे विषाचा आपोआप परिणाम होऊं लागेल."

असें म्हणून त्या माणसानें तो पेला सॉक्रेटिसाला दिला, व चेहेऱ्यांत किंवा आकृतींत यत्किंचित्‌ही फरक न होऊं देतां व न कापतां मोठ्या आनंदानें सॉक्रेटिसानें तो घेतला.

आपल्या नेहमींच्या स्थिर नजरेनें त्या माणसाकडे पाहून सॉक्रेटिसानें त्याला विचारलें, " या पेल्यांतून देवाचें तर्पण करण्याबद्दल तुमचें काय म्हणणें आहे ? मी करूं कीं नको ? "

तो मनुष्य म्हणाला, " आम्हीं एका माणसाला पुरेल इतकेंच विष तयार करतों."

सॉक्रेटिस म्हणाला, " मी समजलों; पण मला तर्पण करावयाला हरकत नाहीं, व देवाची प्रार्थना मला केलीच पाहिजे. म्हणजे माझा येथपासूनचा प्रवास सुखाचा होईल. हीच माझी प्रार्थना, तरी त्याप्रमाणें घडो."

इतकें बोलून सॉक्रेटिसानें तो पेला तोंडाला लावला व त्यांतील विष त्यानें अगदीं शांतपणानें व आनंदानें पिऊन टाकलें. हें होईपर्यंत सॉक्रेटिसाच्या स्नेहीमंडळीनें आपलें दुःख बरेंच आवरून धरलें होतें; परंतु त्याला विष पितांना व तें संपवून टाकतांना त्यांनीं पाहिलें, तेव्हां त्यांचें

दुःख आवरेना; सर्वांना ओक्साबोक्शीं रडूं कोसळलें. सॉक्रेटिसाकरितां ती मंडळी रडत नव्हती, तर आपला इतका उत्तम मित्र नाहींसा झाला याबद्दल ती रडत होती. क्रिटोला तर आपले अश्रु न आवरल्यामुळें तो बाहेर गेला होता, व त्या सर्व दिवसभर ज्याच्या रडण्याला खळ पडला नव्हता, तो अपॉलोडोरसहि मोठमोठ्यानें रडूं लागला, व त्याच्या हुंदक्यांनीं आणि विलापांनीं सर्वांच्या काळजाचें पाणी झालें. मात्र सॉक्रेटिस अगदीं शांत होता. तो सर्वांना म्हणाला, "मित्रहो, तुम्हीं हें काय मांडिलें आहे ? अशा तऱ्हेचें प्रदर्शन होऊं नये, म्हणून मी बायकांमुलानां मुद्दाम पाठवून दिलें. कारण मीं असें ऐकिलें आहे कीं, मनुष्याला शांततेनें मरण यावें, म्हणून तुम्हीं शांत व्हा व धीर धरा."

हें सॉक्रेटिसाचें भाषण ऐकून सर्व मंडळी लाजली, व त्यांनीं आपला शोक आवरला. इकडे सॉक्रेटिस येरझारा घालीत होता; इतक्यांत आपले पाय जड होत आहेत, असें त्याला भासलें, व मग त्याला सांगितल्या-प्रमाणें तो उताणा निजला. नंतर विष देणारा माणूस राहून राहून त्याचे हातपाय तपासूं लागला, व पायांला जोरानें दाबून येथें संवेदना होतात का म्हणून विचारूं लागला. सॉक्रेटिस म्हणाला, "नाहीं होत." नंतर त्यानें त्याच्या तंगड्या त्याचप्रमाणें दाबल्या, व सॉक्रेटिसाचें शरीर गार व ताठ होत चाललें आहे हें सर्वांना दाखविलें. सॉक्रेटिसानेंहि तें पाहिलें व "हृदयापर्यंत पोहोंचलें, म्हणजे मी जाईन," असें म्हटलें. त्याच्या कमरेपर्यंत गारवा आला, तेव्हां सॉक्रेटिसानें आपल्या चेहऱ्यावरील आवरण काढून टाकलें, व पुढील शब्द उच्चारले. ते त्याचे शेवटचेच होते.


"क्रिटो, ॲस्क्लेपस देवाला मीं एक कोंबडें द्यावयाचें राहिलें आहे तें द्यायला तूं विसरूं नकोस."

क्रिटो म्हणाला, "मी खात्रीनें देईन. आपली आणखी कांहीं इच्छा आहे काय ?"

या प्रश्नाला सॉक्रेटिसानें उत्तर दिलें नाहीं. पण थोड्याच वेळानें

थोडी हालचाल झाली व त्या माणसानें सॉक्रेटिसाला उघडें केलें, तों त्याचे डोळे थिजले होते. नंतर क्रिटोनें त्याचें तोंड व डोळे मिटले.

यांप्रमाणें त्या अद्वितीय शहाण्या, निस्पृही व सर्वोत्कृष्ट साधूला मरण आलें.



( ५ )

# फलश्रुति.

कोणतीही कथा अथवा पुराण पुरें झालें म्हणजे शेवटीं त्याची फलश्रुती सांगण्याची रीति पुरातनच आहे. तदनुरूप साक्रेटिसाच्या कथेचा विषप्राशनाचा लेख लिहून झाल्यावर मी त्या कथेची फलश्रुती सांगण्याचा विचार मनांत आणिला, आणि हातांत लेख लिहिण्याकरितां लेखणी घेतली. पण, आतां फलश्रुति काय सांगावयाची, हें सुचेना. नेहमींच्या पुराणपद्धतीप्रमाणें " जो कोणी हें पुराण श्रवण करील, पठण करील किंवा मनन करील, तो निपुत्रिक असल्यास पुत्रवान् होईल, निर्धन असल्यास धनसंपन्न होईल, पुत्रपौत्रादिकांसह तो इहलोकीं मान्य होईल, व सर्व पापांपासून मुक्त होऊन देहत्यागानंतर परलोकीहि पूज्य होईल, " अशी अंधश्रद्धात्मक फलश्रुति, ज्याचें आयुष्य अंधश्रद्धेचा नायनाट करण्यांत गेलें, त्या पुरुषाच्या चरित्राची सांगणें म्हणजे विपरीतच होय, असें वाटलें. बरें इसापनीतीच्या गोष्टीच्या शेवटीं तात्पर्य सांगतात, त्याप्रमाणें ' मरतांना आनंदानें हा लोक सोडावा, ' इतकीच फलश्रुति सांगून स्वस्थ बसावें तर तसें करणें बरें वाटेना. बरें, साक्रेटिसाच्या उपदेशाचा सारांश देऊन त्याचा अनुवाद करावा म्हटलें, तर तोहि मार्ग स्वशक्तीच्या बाहेरचा वाटला. याप्रमाणें काय करावें काय नाहीं, अशा मनाच्या परिस्थितींत माझा डोळा लागला, व मला असें स्वप्न पडलें, कीं, मी कोठें तरी अंतरिक्षांत वरवर जात आहें. वर जातांना मला निरनिराळे अंतरिक्षांतील लोक लागले, आणि शेवटीं मी एका लोकीं येऊन थडकलों; तेथें पाहूं लागलों, तों निरनिराळ्या थोर पुरुषांच्या आकृति दिसूं लागल्या. त्या आकृतींत एक आकृती मोठमोठ्यानें

पण आपल्याशींच बोलत आहे, असें मला दिसलें; म्हणून मी तिकडे वळलों, तों ती आकृति मी वाचलेल्या साक्रेटिसाच्या वर्णनाशीं हुबेहुब जुळली. हें पाहतांच माझा आनंद गगनांत मावेना. कारण, माझी काळजी दूर झाली, असें मला वाटलें, व मी भराभर त्या आकृतीच्या तोंडून निघालेले उद्गार टिपून घेऊं लागलों. इतकें मला स्वप्न पडलें. सकाळीं उठून पाहतों, तों माझ्या टेबलावर एक वही पडलेली. ती उघडून पाहतांच तींत तें साक्रेटिसाचें आत्मगत भाषण लिहून ठेवलेलें दिसलें. तरी आतां अधिक प्रस्तावना, किंवा हें कसें झालें, याची चर्चा न करितां या भाषणाचा समग्र उतारा फलश्रुतीदाखल देतों.

" केवढा प्रचंड समाज हा ! माझ्या प्रिय देशबांधवांच्या आर्यशाखे-तीलच हे हिंदुलोक आहेत. पण हा एवढा मोठा हिंदुसमाज अगदीं सामसूम कां बरें दिसत आहे ? अरेरे ! या तीस कोटि लोकांपैकीं शेंकडा नव्वद लोक पूर्ण अज्ञानी आहेत. ज्ञान हें तर मानवीप्राण्याचें खरें जीवन आहे; तेंच जर या इतक्या लोकांत नाहीं, तर यांच्यामध्यें जागृति कशी दिसावी व येथें हालचाल तरी कशी दृग्गोचर व्हावी ?

" माझ्या प्रिय ग्रीसदेशांत पुष्कळ गुलाम होते. येथें गुलाम नाहींत खरे, तरी पण येथें सात कोटि अस्पृश्य लोकांचा वर्ग आहे. या लोकांची काय ही हीन स्थिति ! आमच्या वेळचे गुलाम घरांतलीं सर्व कामें करीत. त्यांना आम्ही शेताचीं कामें सांगत असूं. गुलाम आमच्या मुलां-बाळांचें संगोपन करीत असत. ते आमच्यांत मिळतमिसळत असत. त्यांना फक्त राजकीय हक्क नव्हते. पण येथल्या अस्पृश्य जातीची स्थिति गुलामापेक्षांहि वाईट दिसते. अरेरे ! यांना वरच्या जाति पशूपेक्षांहि कमी लेखतात. कारण, ते या वर्गाची सावलीसुद्धां अपवित्र मानतात. हरहर ! ज्या देशांतील तत्त्वज्ञांनीं ' वसुधैव कुटुंबकम् ' किंवा ' सर्वां-भूतीं परमेश्वर ' अशासारखीं उदात्त तत्त्वें प्रतिपादन केलीं, त्याच देशांतील वरिष्ठ जातींनीं सांप्रत आपल्याच सारख्या चालत्या बोलत्या, आपल्याचसारख्या बुद्धिवान् आपल्याचसारख्या विचारवंत व आपल्याच-

सारख्या मनोवृत्ति असलेल्या ईश्वराच्या लेंकरांना अस्पृश्य समजावें, व त्यांच्या वाऱ्यालाहि उभें राहूं नये, व या अस्पृश्य जातीच्या माणसांच्या स्वतःच्या मनाची इतकी अवनति व्हावी, कीं, अशा वागणुकीचा त्यांना त्वेष येऊं नये; आपल्यांतील मनुष्यांश व पर्यायानें ईश्वरांश यांची पूर्ण विस्मृति व्हावी, हें केवढें अगाध अज्ञान व त्याचाच परिणाम ही केवढी अंधश्रद्धा ! माझ्या ग्रीसदेशांत मी आपल्या लोकांचे दोन दोष पाहिले होते. एक अंधश्रद्धा व दुसरी कर्तव्यशून्यता. हे दोन्हीहि दोष एकाच अज्ञानरूप कारणानें उत्पन्न होतात, व म्हणून मी आजन्म सत्यज्ञानाचा प्रसार करण्याकरितां खटपट केली. या समाजांतहि हे दोष दिसून येत आहेत, परंतु सुधारलेल्या राज्यपद्धतीनें येथें ज्ञानाचा प्रसार कांहीं कांहीं लोकांत होऊं लागला आहे. तरी आतां या सुशिक्षित वर्गाच्या मनः-स्थितीचें निरीक्षण करूं या.

" या सुशिक्षित वर्गामध्यें धंद्याप्रमाणें निरानिराळे वर्ग झालेले आहेत. याच श्रमविभागाच्या तत्त्वावर व जितजेते या संबंधापासून या एकजीव आर्यलोकांमध्यें प्रथमतः वर्णभेद उत्पन्न झाला. परंतु, जोंपर्यंत हें वर्गी-करण श्रमविभागावरच होतें, तोंपर्यंत त्यांमध्यें पुष्कळ लवचिकपणा होता. परंतु पुढें पुढें हें वर्गीकरण जन्मावरून ठरूं लागलें, व वर्ण परमेश्वरानेंच निर्माण केले आहेत, अशी समजूत फैलावली आणि तेव्हांपासून जाति-भेद जोरानें सुरू झाला, व त्याला तीव्रस्वरूप प्राप्त झालें. हल्लीं या समाजांत हजारों जाति झाल्या आहेत, व सुशिक्षित लोकहि अंधश्रद्धेनें या चालीला चिकटून राहिले आहेत, ही केवढी शोचनीय गोष्ट आहे ! पण हल्लीं धंद्यामुळें नवे झालेले वर्ग किंवा जाति—हिंदुलोकांना परिचित असा शब्द वापरल्यानें त्यांची होणारी चूक त्यांच्या ध्यानांत येईल, म्हणून तोच शब्द वापरूं या—इंग्रजी शिकणाऱ्या लोकांमध्येंहि दिसून येत आहेत.

पहिली मोठी जात सरकारी नोकरांची. यांत लहान मोठ्या सर्व दर्जाच्या नोकरांचा समावेश होतो. हिंदुलोकांच्या पूर्वीच्या सम-

जुतींत किती फरक झालेला दिसत आहे, शेती उत्तम; व्यापार मध्यम व नोकरी कनिष्ठ, अशी म्हण होती; पण हल्लीं सुशिक्षित लोक नोकरी-करितां किती हपापलेले दिसतात ! पूर्वींची या लोकांमधील विद्येकरितां विद्या शिकण्याची बुद्धि पार नाहींशी झालेली दिसत असून तिच्या-ऐवजीं ऐहिक हेतूकरितां निवळ पोटाचा धंदा म्हणून शिकावयाची प्रवृत्ति झाली आहे, आणि म्हणुन कनिष्ठ नोकरीबद्दल आतां कांहींएक दिक्कत न वाटतां ज्याला त्याला शिकून नोकरी मिळविण्याची हांव दिसत आहे. ही प्रवृत्ति कमी होणें आवश्यक असून अशा प्रकारची हांव थोडी कमी झाल्यासारखी दिसूं लागली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

" बरें, सरकारी नोकरी करावयाची, ती तरी उत्तम नेकीनें व नोकराच्या कर्तव्यकर्माला जागून होत आहे का ? सरकारी नोकरांच्या खऱ्या कर्तव्याची जाणीव हिंदुलोकांच्या कवींना चांगलीच होती, असें दिसतें. कारण पंचतंत्रांत म्हटलें आहे:—

नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके;
जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन;
इति महति विरोधे वर्तमाने समाने
नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता !

" खरोखरी सरकारी नोकर म्हणजे ते लोकांचे आणि राजाचे असे दुहेरी नोकर असतात. प्रत्यक्ष ते सरकारचे नोकर असतात, पण लोकांकडूनच कराच्या रूपानें घेतलेल्या पैशानें त्यांना वेतन मिळतें, अर्थात् लोकांचेंही हित पाहणें हें त्यांचें काम आहे. म्हणजे सरकार व प्रजा यांच्यामध्यें समतोल कांटा धरून वागणें, हें यांचें खरें कर्तव्य आहे. परंतु असे वागणारे किती विरळा ! हल्लीं हिंदुस्थानांतील सरकारी नोकरांत अशा जाणीवेचे कांहीं लोक आहेत खरे; पण बहुतेक नोकरांमध्यें कर्तव्य-बुद्धीचा अभाव, ज्या सरकारची नोकरी करावयाची, त्याच सरकारच्या धोरणाची खाम टालस्ती करणारे, सरकारावर ओंठ चावणारे, सरकार जुलमी आहे व लोकांच्या अनहिताच्या गोष्टी करतें, असें मागून बोल-

णारेच फार. अशा बोलण्यानें हे लोक आपण मोठे जनपदहित करणारे आहोंत, असा आव घालतात. पण ही निवळ लबाडी असते. हेच लोक सरकारी अधिकाऱ्यांजवळ गेले, म्हणजे सरकारचे गोडवे गाऊं लागतात. सारांश, वरून स्वतंत्रपणाचा व परोपकाराचा बहाणा करून आंतून अशा प्रकारचे लोक स्वार्थाकरतां हपापलेले असतात.

" कांहीं सरकारी नोकर अंतरंगी व बहिरंगी स्तुतिपाठकस असतात. यांना सर्व वेळीं सरकारचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांतच आनंद वाटतो व सरकारी नोकर या नात्यानें आपण सरकारचें अगदीं गुलाम आहोंत, असें वाटतें. सरकारचें हित करणें—मग त्यांत लोकांचें कितीहि नुकसान होईना त्याची ते पर्वा करीत नाहींत—हेंच आपलें इतिकर्तव्य समजतात. आपला स्वाभिमान न सोडतां, आपल्या देशप्रीतीला रजा न देतां, पण ज्या सरकारचें आपण अन्न खातों, त्यांच्याबद्दलहि योग्य अभिमान मनांत बाळगून सरकारी नोकरी करणारे किती विरळा दिसतात ! हीच नोकराची खरी कर्तव्यबुद्धि ! या योगानें लोक व सरकार या दोघांचें हित होऊन अशा नोकराची स्वतःची दानतही उच्च दर्जाची राहते. परंतु जो हांजीहांजीपणा हेंच आपलें कर्तव्यकर्म समजतो, त्याची दानत अगदीं खालच्या दर्जाची बनत जाते; त्याचा स्वाभिमान लयाला जातो; देशाभिमानापेक्षां देशद्रोह बळावतो; व असा मनुष्य सरकारचें व लोकांचेंही काम बरोबर करीत नाहीं. पण सरकारला वरवर शिव्या देणारे पण त्यांची नोकरी करणारे तर दानतीनें जास्तच वाईट; यांच्यामध्यें दुटप्पीपणा फार येतो; यांच्यामध्यें गर्व व हांजीहांजीपणा असे परस्परविरोधी गुण येऊं लागतात व असे लोक पहिल्यापेक्षांही भयंकर होतात. यांची दानत अगदींच नीच कोटीमधली बनते. पण हल्लीं हिंदुस्थानांत अशांचा भरणा काय कमी आहे ? हा परिणाम अर्धवट ज्ञानाचा व कर्तव्यबुद्धीच्या अभावाचाच होय.

" या वकिलांच्या जातीचें आतां निरीक्षण करूं या. खरोखर ही जात ब्रिटिश कायद्यामुळेंच उत्पन्न झाली आहे. जुन्या काळीं पंचांनीं न्याय करण्याची पद्धति असे. तेथें साधारण विचारपूस करून खरें पाहून पंचांनीं

निकाल दिला म्हणजे झालें असा प्रकार असे. राजाच्या न्यायकचेरींत गेलें तरी न्यायाधीशच स्वतः वादीप्रातिवादींचें म्हणणें व त्यांचा साक्षी-पुरावा पाहून निकाल देई. परंतु इंग्रजी कायदा सुधारलेला. त्या कायद्याचा शब्दावर भर. असा कायदा साध्याभोळ्या लोकांना कसा कळावा? तेव्हां कायदा जाणणाऱ्या मध्यस्थांची जरूरी उत्पन्न झाली. कारण स्वतः वादीप्रातिवादींना कायद्याच्या कलमांची गुंतागुंत काय कळणार? तेव्हां न्यायकोर्टापुढें वकिलांच्या मुखानेंच जाणें प्राप्त. याप्रमाणें ही जात एका विशिष्ट परिस्थितीमुळें उत्पन्न झाली. आतां या नव्या जातीचें कर्तव्य उघड आहे. अशिक्षित व अडाणी वादीप्रतिवादींना कायद्याच्या कलमाबद्दल व त्यांच्या अर्थाबद्दल योग्य सल्ला देऊन त्यांना योग्य न्याय मिळवून देण्याची खटपट करणें हें त्यांचें कर्तव्यकर्म. म्हणजे परकी, पण सुधारलेलें सरकार व अडाणी अशिक्षित लोकसमुदाय यांमधले दुभाषीच वकील होत. अर्थात् केवळ कायद्याचे खरे हेतु लोकांना समजावून देणें, तसेंच कायद्यानेंच दिलेल्या लोकांच्या हक्कांचें रक्षण करणें व त्या हक्कांची पायमल्ली होत असल्यास तिचा प्रतिकार करणें, या गोष्टींचा यांत समावेश होतो व हें कर्तव्यकर्म उत्तम प्रकारें बजावतां यावें, म्हणून प्रथमतः या वकीलवर्गानें कायद्यांचें, कायदेशास्त्रांचें आणि राजनीतिशास्त्राचें उत्तम अध्ययन केलें पाहिजे. शिवाय कायदा हा नेहमीं वाढता विषय आहे. त्यासंबंधीं नव्यानव्या कल्पना, नवे नवे ठराव व रूळी नेहमीं बाहेर येत असतात. या सर्व गोष्टींचें यथासांग ज्ञान वकिलाला पाहिजे. सारांश, वकिलानें आजन्म विद्यार्थी राहिलें पाहिजे. त्याच्या विद्याव्यासंगाला खळ पडतां कामा नये. तसेंच तंटे वाढविणें, लोकांना खोटीच सल्ला देऊन त्यांना भांडणांना उत्तेजन देणें, सारांश, कज्जेदलालाच्या प्रवृत्तीला योग्य वळण लावून खऱ्याखोट्याच्या निर्णयाला मदत करणें हें वकीलाचें खरें कर्तव्यकर्म आहे. परंतु अशी कर्तव्याची खरी जाणीव असलेले वकील या वर्गात फारसे दिसत नाहींत. एकदां परीक्षा पास झाली म्हणजे पुस्तकांना रामराम ठोकणारे व दरवर्षी जुनाट बनत

चाललेल्या आपल्या ज्ञानपुंजीवर वेळ मारून नेणारे, मोठ्या पुस्तकांतून कायद्याचा आधार काढावयाचा असेल, तर फी जास्त पडेल, अशा प्रकारची बतावणी करून जास्त फी उकळण्यापुरता कायद्याच्या पुस्तकांचा उपयोग करणारे वकील फार. पण बांधलेली शिदोरी किती दिवस पुरणार ? या रीतीनें अशा वकीलांची फारशी चलती चालत नाहीं. या वकिलांपैकीं कांहींना पैशापलीकडे कांहींच दिसत नाहीं. कशा तरी तऱ्हेनें लोकांमध्यें कलागती लावून आपण जास्त जास्त पैसा कसा उकळावा, याकडेच त्यांची दृष्टि असते. तसेंच आपल्या स्वार्थाकरतां न्यायाधीशाची व कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या इतर सरकारी अधिकाऱ्यांची खुशामत करून कांहीं वकील लोक आपल्याला सरकारी नोकरांच्याही खालच्या दर्ज्याला पोहोंचवून घेतात. सारांश, सुशिक्षितांच्या या एका मोठ्या वर्गाची सामान्य स्थिति शोचनीयच आहे. वास्तविक सर्व धंद्यांमध्यें वकिलीसारखा स्वतंत्र धंदा नाहीं. या वर्गाचे लोक सामान्य जनसमूहाचे स्वाभाविक लोकनायक असतात व तशा स्वतंत्र बाण्यानें राहण्यासारखा त्यांचा दर्जा असतो. एका दृष्टीनें लोकांना चांगलें वळण लावण्याचें त्यांचें काम असतें. परंतु या वर्गाला ही खऱ्या कर्तव्याची ओळख झालेली नाहीं व म्हणून त्यांच्यामध्यें अज्ञान व आपस्वार्थीपणा भरलेला आहे. असो.

" सुशिक्षितांचा तिसरा वर्ग म्हणजे डॉक्टर व एंजिनीयर या धंदेवाल्यांचा होय. यांपैकीं स्वतंत्रपणानें एंजिनीयरचा धंदा करणारे हिंदुस्थानांत क्वचितच दृष्टीला पडतात. कारण घरें बांधतांना नकाशा काढून, हवा, उजेड व इतर आयुर्वर्धक गोष्टींची घरांत सोय करणें जरूर आहे, अशी जाणीवच लोकांमध्यें झालेली नाहीं. 'पिच्छेसे आई' या म्हणीप्रमाणें हिंदुस्थानांतील घरें बांधण्याची पद्धति आहे. नवीन सुखसोईची, आयुरारोग्याच्या साधनांची कल्पनाच नाहीं. यामुळें घरें बांधतांना या गोष्टींचा विचार करावा, असें लोकांना वाटत नाहीं व म्हणून शास्त्रीय पद्धतीनें घरें बांधणाऱ्या एंजिनीयरांचीही लोकांना गरज नाहीं. हल्लीं

हिंदुस्थानांत जे एंजिनीयर आहेत, ते बहुतेक सरकारी नोकर आहेत. व त्यांच्यामध्यें सरकारी नोकरांचे दोष आहेत. शिवाय आपल्या धंद्याचें पूर्ण ज्ञान मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेचाहि त्यांच्यांत अभाव आहे. डॉक्टरांच्या धंद्यांत बरेच लोक खाजगी धंदा करणारे आहेत; परंतु येथेंहि वकिलांच्यासारखीच रड आहे. स्वतःच्या धंद्याचें ज्ञान आजतागाईतचें पाहिजे, ही बुद्धि क्वचितच दिसून येते. वैद्यकशास्त्रामध्यें तरी वारंवार नवे नवे शोध लागतात. या सर्व शोधांचा फायदा आपल्या रोग्याला करून देण्याची बुद्धि या वर्गांत फारशी दिसत नाहीं. कॉलेजांत जें कांहीं ज्ञान मिळविलें असेल, त्याच ज्ञानावर काम भागविण्याची बहुतेकांची प्रवृत्ति. स्वतः प्रयोग करून वैद्यशास्त्रांत भर घालण्याचें नांवच नको. पाश्चात्य व पौरस्त्य या देशांत मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करण्याची बुद्धिसुद्धां कमीच आहे. कांहींची दृष्टि निव्वळ पैशाची आहे. तो मिळविण्याकरितां रोग्याचें दुखणें दिरंगाईवर पडेल, असें करण्याची नीच प्रवृत्तीहि कांहीं डॉक्टरांमध्यें दिसून येते. कांहीं डॉक्टर स्वतःची बुद्धि व विचारशक्ति यांचा बिलकुल उपयोग न करितां नवीन व्यापारी कंपन्यांचा दिखाऊ औषधी माल खपविणारे एजंटच बनतात. यांना रोग्यांना नवीं नवीं पेटंट औषधें व कृत्रिम अन्नें देण्याचीच खोड लागलेली असते. आपलें खरें कर्तव्यकर्म म्हणजे आजारी माणसाला आराम पाडून रोगबीज नाहींसें करणें होय, हें हे लोक विसरतात. रोग्याला पाहिलें न पाहिलें, तों एकादा औषधाचा पाठ लिहून आठ आणे रोग्याकडे लागू करण्याची प्रवृत्तिच जास्त लोकांत दिसून येते. बरोबर रोगचिकित्सा करून, मग पूर्ण विचार करून एकादी योग्य औषधयोजना करण्याच्या ऐवजीं कांहीं डॉक्टरांना वरवरच्या लक्षणावर तात्पुरती योजना करण्याची खोड दिसते. आज जरा पोट दुखलें, घाला एक औषध जास्त; आज पोटदुखी बंद आहे, पण कपाळच दुखलें, काढ एक औषध व दे एक पूड घालून ! आज काय तिसरेंच लक्षण झालें, कर त्याची तजवीज असा प्रकार पुष्कळ डॉक्टरांचा असतो.

" एकदां मनुष्य रोगग्रस्त झाला, म्हणजे त्याची प्रकृति फार नाजुक होऊन ती तोळेवजा झालेली असते, व यापुढें बारीकसारीक बाह्य परिस्थितिभेदानें लक्षणांत कमीजास्तपणा होतो. सायंकाळीं सूर्य अस्ताला जात असतांना क्षितिजाच्या रंगांत क्षणोक्षणीं नवीन बदल होत असतो– आतां तांबडा, तर आतां सोनेरी; आतां पिवळा तर आतां निळा; अशा किती तरी छटा क्षितिजावर येतात–पण, त्यामुळें सूर्यास्ताच्या मुख्य गोष्टींत फरक होत नसतो, त्याचप्रमाणें रोगग्रस्त माणसाची गोष्ट असते, व म्हणून रोगाचें निदान केल्यावर त्या रोगाच्या प्रतिकारार्थ अनुभवानें ठरलेली औषधयोजना केली पाहिजे, व क्षणोक्षणीं जरी लक्षणें बदललीं, तरी लहान मुलांच्या खेळांतील 'पातळ झालें पीठ घाल, घट्ट झालें दूध घाल,' असा प्रकार शास्त्रीय पद्धतीनें जाणाऱ्या डॉक्टरांनीं करतां कामा नये, हें डॉक्टरचें खरें कर्तव्यकर्म आहे. परंतु कांहीं डॉक्टरांची प्रवृत्ति याच्या उलट असते. आपल्या रोग्यांना खूष करणें एवढाच अशा त्यांच्या साऱ्या खटपटीचा उद्देश असतो, परंतु ही प्रवृत्ति दुखणें वाढण्यास निदान दिनावधीवर नेण्यास कारणीभूत होते, हें या डॉक्टर लोकांच्या ध्यानांत येत नाहीं किंवा आलें तरी आपली तुमडी भरण्याकरतां ते त्याची फिकीर करीत नाहींत.

" यानंतरचा सुशिक्षितांचा वर्ग किंवा जात म्हणजे वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें वगैरेंचे संपादक व निवळ लेखनाच्या धंद्यावर उपजीविका करणारा वर्ग. हिंदुस्तानांत हाहि वर्ग एका दृष्टीनें वकिलाप्रमाणेंच नवा आहे. पूर्वकाळीं लेखक नव्हते, असें नाहीं. पूर्वीच्या लेखकांनीं संस्कृत, पाली व इतर निरनिराळ्या प्राकृत भाषांमध्यें अवाढव्य वाङ्मय करून ठेविलें आहे. आज जर हिंदुस्तानची कीर्ति सर्व जगभर पसरली असली, तर ती त्या देशांतील संस्कृतभाषेंतील अनुपम वाङ्मयामुळेंच होय. परंतु, पूर्वकाळीं विद्याव्यासंगी लोक आपापल्या आवडीच्या विषयावर निरनिराळे ग्रंथ लिहीत असत. ते ग्रंथ लिहिण्यांत उपजीविका करण्याचा हेतु नसे, व पूर्वकाळीं हल्लींसारखी छापण्याची कला माहिती नसल्या-

मुळें ग्रंथाचा प्रसार तावडतोब होण्यास कांहीं एक साधन नसे. परंतु, हल्लीं हिंदुस्तानांत युरोपांतून छापण्याची कला आली आहे, व तिच्या-योगानें पुस्तकें स्वस्त झालीं आहेत. शिक्षणप्रसारामुळें वाचनाची गोडी लागली आहे, व यामुळें यूरोपांतल्याप्रमाणें वर्तमानपत्रांचा व मासिकांचा एक स्वतंत्र धंदा झाला आहे; तसेंच मनोरंजक व इतर पुस्तकें लिहून त्यांवर उपजीविका करण्याचा एक नवीन धंदा उत्पन्न झाला आहे; परंतु येथेंसुद्धां कर्तव्यबुद्धीपेक्षां दुसऱ्या मनोविकारांचें प्राबल्य दिसत आहे. पूर्वीं लोकप्रीति हा प्रकार लोकांना ठाककच नव्हता. प्रत्येक माणसांत शांत-पणें व गाजावाजा न करितां काम करण्याची बुद्धि जाऊन त्या ठिकाणीं लोकप्रीतीचें वारें उत्पन्न झालें आहे. खरोखर लोकप्रीतीची आवड, म्हणजे एखाद्या मादक पदार्थाप्रमाणें आहे. ज्याप्रमाणें माझ्या प्रिय ग्रीस देशांत डेमेगॉन नांवाचा लोकप्रीति संपादन करून आपला स्वार्थ साध-णारा वर्ग उत्पन्न झाला, त्याप्रमाणें येथल्या सुशिक्षितांतहि प्रकार झाला आहे. कित्येक चांगले बुद्धिवान् व प्रतिभासंपन्न लेखक या लोकप्रीतीच्या पिशाचानें पछाडलेले मला दिसत आहेत. यांना सत्यासत्याची पर्वा नाहीं, चांगल्यावाईटाची चाड नाहीं, पापपुण्याची भीति नाहीं, सदसद्विवेकबुद्धीची मुरवत नाहीं, खऱ्या लोकहिताची फिकीर नाहीं, न्यायान्यायाची निवड नाहीं; सारांश, ज्या प्रवृत्तींच्या योगानें मनुष्याच्या आत्म्याची खरी उन्नति होते, त्यांकडे त्यांचें लक्ष नाहीं. **'येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत्'** हें त्यांच्या वागणुकीचें तत्त्व. आपण प्रसिद्धीला येऊन आपला योगक्षेम चांगला चालला म्हणजे झालें, इतकेंच अशा लोकांचें पाहणें. या देशांतील सुशिक्षितांमधील बरेच लोक—या लोकांचा भरणा वर्तमानपत्रकर्ते, लेखक, व्याख्याते यांमध्येंच जास्त आहे—या बौद्धिक व्यसनाच्या नादीं लागले आहेत, ही मोठी शोचनीय गोष्ट आहे.

"आतां सुशिक्षितांमधली शेवटली जात, म्हणजे शिक्षकवर्गाची होय. या वर्गाचें काम सर्व बहुजनसमाजामध्यें ज्ञानप्रसार करण्याचें आहे, हें उघड आहे. बहुजनसमाजाच्या पुढारीपणाचा मान एकंदर सुशिक्षित

वर्गाकडे येतो. त्यांतल्यात्यांत ज्यांचें काम विद्यादान करण्याचें आहे, त्यांच्याकडे तर हा पुढारीपणा प्रामुख्यानेंच येतो. पूर्वीच्या काळीं हें काम ब्राह्मणवर्णाचें होतें, व त्याकाळचे ब्राह्मण अध्ययन व अध्यापन यांमध्येंच आपला सर्व वेळ खर्च करीत असत. परंतु, अशा प्रकारची उच्च कर्तव्यजागृति या शिक्षकवर्गामध्येंसुद्धां कमीच दिसते. आधीं या धंद्यांत पडणारे सुशिक्षित धंद्याच्या आवडीखातर यामध्यें पडणारे फार थोडे. दुसऱ्या जास्त किफायतीच्या धंद्यांत आपली सोय लागत नाहीं, असें दिसून आल्यावर निरुपाय म्हणून या शिक्षकाच्या धंद्यांत पडणारे फार. जी विद्या आपण शिकवितों, तिच्याबद्दल योग्य अभिमान वाटणारे, विद्यावृद्धि हाच देशाच्या तरणोपायाचा खरा मार्ग आहे, व अशी जीवंत आणि जागरूक जाणीव असलेले, या विद्यार्जनांत व विद्यादानांत आपलें सर्व सामर्थ्य खर्च करणारे शिक्षक दुर्लभ. भाड्याच्या तट्टाप्रमाणें कसेंबसें ओझें वाहणारेच फार ! ज्यांना आपण शिकवितों त्या विद्येबद्दल अभिमान वाटत नाहीं, ज्यांना जनसमूहांत विद्येच्या प्रसाराचा केवढा फायदा आहे याची जाणीव नाहीं, ज्यांना विद्येची खरी गोडी नाहीं, जे विद्यादेवीचे निस्सीम भक्त नाहींत, त्यांच्या हातून विद्यादानाचें काम कितीसें चोख होणार! म्हणूनच या वर्गांतहि कामचुकार लोक फार आहेत. शिक्षकाचा धंदा हे लोक उपजीविकेचें साधन म्हणून करतात. यामुळेंच या वर्गाकडून शिक्षणप्रसाराच्या बाबतींत जितकी जोराची खटपट व्हावयाला पाहिजे तशी होत नाहीं.

सारांश, माझ्या ग्रीसदेशांतील माझ्या बांधवांमध्यें जे दोष मीं पाहिले व जे घालविण्याचा मीं आजन्म प्रयत्न केला, त्याचप्रकारचे दोष या देशांतहि दिसत आहेत. तरी आपण आतां या देशांत जन्माला येऊन येथल्या लोकांचे कान उघडून त्यांच्यामध्यें कर्तव्यजागृति व डोळसश्रद्धा उत्पन्न करण्याचा प्रयत्न करूं या, म्हणजे माझ्या मनाला जास्तच आनंद होईल."

# जॉर्ज बार्क्ले.

## (१)

## अल्प चरित्र.

कोणत्याही देशाकडे दृष्टि फेका. तुम्हांला सर्वत्र सरस्वतिमंदिर मुक्तद्वार दिसेल. तेथें वयानें लहान मोठा हा भेद मानला जात नाहीं, तेथें स्त्री–पुरुष या भेदास महत्त्व नाहीं, तेथें गरीबी–श्रीमंती इकडे लक्ष्य दिलें जात नाहीं, तेथें हीनकुल किंवा उच्चकुल याची आडकाठी येत नाहीं, तेथें वंशपरंपरा किंवा पूर्वसंस्कार या गोष्टी पहाव्या लागत नाहींत, तेथें सामाजिक दर्जा किंवा धंदा याचाही अडथळा येत नाहीं. सारांश, सरस्वतीचे दारीं कोणालाहि मज्जाव नाहीं, सरस्वतीचा वरदहस्त कोणावर पडेल, हें कांहीं एक सांगतां येत नाहीं; परंतु एकदां का सरस्वतीचा वरद हस्त एखाद्या माणसावर पडला म्हणजे तो तत्काळ सरस्वतिभक्त होतो व त्याला सरस्वतिमंदिरांत अग्रपूजेचा मान मिळतो.

जॉर्ज बार्क्ले हा ब्रिटिश बेटांत एक मोठा सरस्वतिभक्त व तत्त्ववेत्ता होऊन गेला. त्याचा जन्म सन १६८५ मध्यें अत्यंत हीन व गरीब कुलांत झाला. बार्क्लेच्या आईबापांमध्यें कोणत्याही प्रकारचे विशेष गुण नव्हते. तीं आपलीं साधींभोळीं सामान्य माणसें होतीं. त्यांना सरस्वतीचा पूर्वसंस्कार कांहीं एक नव्हता. तेव्हां बार्क्लेमध्यें सरस्वतिभक्ति पूर्वसंस्कारानें आली असें मुळींच म्हणतां येत नाहीं. बार्क्ले–घराण्यांत जॉर्ज हा अकस्मात् एकाएकीं उदय पावणाऱ्या धूमकेतूप्रमाणें होता, असें म्हणणें प्राप्त आहे.

बार्क्ले हा १६९६ सालीं किलकेनीच्या शाळेंत जाऊं लागला. 'गली-

व्हरचा वृत्तांत' या जगप्रसिद्ध ग्रंथाचा कर्ता स्विफ्ट हा बार्क्लेप्रमाणेंच आयरिशमन असून याच शाळेंत शिकलेला होता. या शाळेंत बार्क्लेनें चार वर्षें काढलीं. या प्रदेशामध्यें सृष्टिदेवीचें मनोहर रूप दृग्गोचर होत असल्यामुळें बार्क्लेला सृष्टिसौंदर्याची गोडी लागली, व त्याची अवलोकन-शक्ति सूक्ष्म झाली. याचें प्रत्यंतर त्याच्या ग्रंथांत वारंवार दिसून येतें. सन १७०० मध्यें बार्क्ले हा मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास झाला, व पुढील शिक्षणाकरितां तो आयर्लंडची राजधानी जी डब्लिन तेथल्या युनिव्हर्सिटी-तील ट्रिनिटी कॉलेजांत दाखल झाला. येथें त्यानें विद्यार्थी व शिक्षक या नात्यानें आपल्या आयुष्याचीं तेरा वर्षें काढलीं. कॉलेजांत त्याच्या बुद्धीचा झपाट्यानें विकास होऊं लागला व त्याला आध्यात्मिक आणि मानसशास्त्रीय ज्ञानाची गोडी लागली. त्यानें कॉलेजांत असतांना वेळो-वेळीं आपल्या वाचनावरून सुचलेल्या विचारांचें, तसेंच त्यावरून सुचलेल्या प्रश्नांचें व स्वयंस्फूर्तीनें मनांत आलेल्या कल्पनांचें टिपण करून ठेवलेलें आहे. ही बार्क्लेची टिपणवही त्याच्या मृत्यूनंतर कांहीं वर्षांनीं छापली गेली. या टिपणवहीवरून त्याचे आध्यात्मिक विचार कसकसे बनत गेले, व शेवटीं जें तत्त्वज्ञान त्यानें जगाला शिकविलें त्याचा उगम त्याच्या मनांत कशा तऱ्हेनें झाला, हें फार चांगल्या तऱ्हेनें दिसून येतें. कॉलेजां-तील बार्क्लेच्या आयुष्यक्रमावरून त्याच्या भावी मोठेपणाचीं चिन्हें दिसून येतात. त्याच्या वेळच्या विद्यार्थ्यांना तें एक विलक्षण कोडेंच वाटे. त्याच्यापासून दूर दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना तो एक अजागळ विद्यार्थी वाटे, व त्याप्रमाणें त्याची ते थट्टाहि करीत; पण बार्क्लेचा निकट संबंध असलेल्या विद्यार्थ्यांना मात्र त्याची बुद्धिमत्ता, त्याची ज्ञानतृष्णा व त्याची उद्यमप्रियता पाहून बार्क्लेचें कौतुक वाटत असे. प्रत्यक्ष सत्यज्ञान मिळ-विण्याकरितां तो आपला जीवहि धोक्यांत घालण्यास कसा तयार असे, याबद्दलची एक मौजेची गोष्ट बार्क्लेच्या चरित्रकारांनीं लिहून ठेविली आहे, ती येथें सांगण्यासारखी आहे.

बार्क्ले व कँटिरिनी ( हा प्रसिद्ध इंग्लिश ग्रंथकार गोल्डस्मिथ याचा

पुढें मेहुणा झाला ) या नांवाचा त्याचा सोबती असे दोघेजण एकदां फांशीची शिक्षा अमलांत येत असतां ती पाहण्याला गेले. बार्क्ले तेथून परत आला, तो उदास अशा मनःस्थितींत आला; पण फांसावर चढविला जात असतांना त्या गुन्हेगाराला काय संवेदना होत असतील, याबद्दल बार्क्लेचा सारखा विचार चालला होता. आपल्या या विलक्षण जिज्ञासेबद्दल बार्क्लेनें कँटिरिनजवळ गोष्ट काढली, व दोघां मित्रांचें असें ठरलें कीं, फांशीं जातांना काय वाटतें, याबद्दल प्रथम बार्क्लेनें प्रयोग करून पहावा, आणि मग कँटिरिनीनें तोच प्रयोग आपल्यावर करावा. मी खूण केली कीं मला फांसावरून सोडवा असें बार्क्लेनें सांगितलें होतें. ठरल्याप्रमाणें वरच्या तक्तपोशीला दोरखंड बांधून बार्क्लेनें आपल्या मानेला त्याचा शेवट बांधला, व खालची खुर्ची कँटिरिनीला काढून घेण्याला सांगितलें. खुर्ची काढून घेतांक्षणींच बार्क्लेला बेशुद्धी येऊन ठरलेली खूण करण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं. पण खुणेची अधिक वाट न पाहतां त्याच्या मित्रानें त्याला फांसावरून सोडविलें; नाहीं तर बार्क्ले खराखुराच फांशी जाण्याची पाळी आली होती ! दोरी सोडल्यावर बार्क्ले भूमीवर निश्चेष्ट पडला. कांहीं वेळानें सावध झाल्यावर बार्क्ले एकदम म्हणाला " वाहवारे कँटिरिनी ! माझा गळपटा तूं चुरडलास !"

बार्क्लेच्या प्रयोगानंतर अर्थातच कँटिरिनीला त्याप्रमाणें स्वतःवर प्रयोग करून घेण्याची इच्छा झाली नाहीं ! या गोष्टीवरून बार्क्लेचा धाडशी स्वभाव, त्याची ज्ञान मिळविण्याची हौस आणि विशेषतः त्याचा आध्यात्मिक ज्ञानाकडे ओढा, हीं चांगलीं दिसून येतात.

बार्क्लेचा ट्रिनिटी कॉलेजांतील शिक्षणक्रम चांगल्या तऱ्हेनें पार पडला. त्याला १७०२मध्यें शिष्यवृत्ति मिळाली. १७०४मध्यें तो बी.ए.ची परीक्षा पास झाला, व १७०७ मध्यें त्यानें एम्. ए.ची पदवी मिळविली. या परीक्षेंत त्यानें असामान्य विद्वत्ता दाखविली, म्हणून त्याला युनिव्हर्सिटी फेलोशिप देण्यांत आली. १७०७ पासून १७१२ अखेर बार्क्ले ट्रिनिटी कॉलेजांत शिक्षकाचें काम करीत होता. १७०९ मध्यें त्यानें उपाध्या-

याचीहि दीक्षा घेतली होती; पण तो कित्येक उपाध्यायांप्रमाणें आग्रही धर्माभिमानी कधींहि झाला नाहीं, व त्याची **'सत्याची आवड'** आमरणांत कायम राहिली.

बार्क्लेच्या टिपणवहीवरून त्याच्या मनांत घोळणाऱ्या विषयांची चांगली कल्पना येते. पण ही मनांतली खळबळ आंतच न जिरतां ती लेखनद्वारां प्रगट झाली. बार्क्लेनें पहिले दोन लहान लहान निबंध १७०७ च्या आधींच लिहिले, व प्रसिद्ध केले. हे दोन्ही निबंध गणितासंबंधींच्या कांहीं प्रश्नांबद्दल होते, व ते लॅटिन भाषेमध्यें लिहिले होते. पण ज्या दोन ग्रंथांच्या योगानें बार्क्लेनें तत्त्वज्ञान्यांच्या मालिकेंत एकदम वरची जागा पटकाविली, ते दोन ग्रंथ त्यानें या लहान निबंधानंतर दोनतीन वर्षांतच लिहिले. **'दृष्टीची नवी उपपत्ति'** हा बार्क्लेचा पहिला तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ होय. हा त्यानें १७०९ या सालीं प्रसिद्ध केला. या निबंधांत बार्क्लेनें मनुष्याच्या अवलोकनशक्तीची मीमांसा करून असें ठरविलें कीं, वस्तूचा आकार व अंतर हीं आपल्या दृष्टीला दिसतात असें आपण म्हणतों खरें, पण वास्तविक तीं आपल्याला दिसत नाहींत. कारण, दृष्टीचा खरा विषय म्हणजे रंग होय. वस्तूच्या अंधुक किंवा स्पष्ट रंगचित्रावरून आपण वस्तूचें अंतर व आकार यांचा केवळ अंदाज करतों. अंतर व आकार हे पदार्थाचे गुण स्पर्शगम्य आहेत, ते दृष्टिगम्य नाहींत, असें बार्क्लेनें प्रतिपादन केलें. या निबंधाचा तत्त्वज्ञानविषयक मथितार्थ असा होता कीं, जडसृष्टीचें जें ज्ञान आपणाला होतें, तें सर्व मानसिक संवेदनांच्या योगानें होतें.

याच्या पुढचा ग्रंथ बार्क्लेनें दुसऱ्याच वर्षी म्हणजे १७१० मध्यें प्रसिद्ध केला. या ग्रंथांत त्यानें आपलें नवें मत जगापुढें ठेविलें. जड व चित् अशीं स्वतंत्र तत्त्वें मानणाऱ्या तत्त्वज्ञानाचें बार्क्लेनें या ग्रंथांत खंडन केलें आहे. त्याचें म्हणणें सर्व जग हें चिन्मयच आहे. ज्याला सामान्य माणसें जडद्रव्य म्हणतात, तें संवेदनांचा समुदाय होय. आमरणान्त याच मताचें बार्क्लेनें निरनिराळ्या ग्रंथांत उद्घाटन केलें आहे. या मतानें जगांतील नास्तिक्य नाहींसें होईल, असें बार्क्लेला वाटत असे. कारण सर्व

जग चिन्मय आहे, असें म्हटल्यावर जडवादाला जागाच राहात नाहीं, आणि मग जीवात्मा व परमात्मा एवढींच चिन्मय तत्त्वें शिल्लक राहतात, आणि या योगानें मनुष्याची खऱ्या धर्माकडे प्रवृत्ति होईल असें बार्क्लेला वाटत असे. बार्क्लेच्या तत्त्वज्ञानाचा हेतु मनुष्याला धर्मपरायण करण्याचा होता, व औपचारिक कर्मकांडात्मक धर्माचारापेक्षां याच तात्त्विक धर्माला बार्क्ले जास्त महत्त्व देत असे. या दोन ग्रंथांनीं बार्क्लेची स्वतंत्र विचाराचा तत्त्वज्ञानी व उत्तम लेखक अशी ख्याति झाली.

कांहीं अंशीं प्रकृतीकरितां,आणि कांही अंशीं त्या काळच्या ग्रंथकारांचा परिचय करून घेण्याकरितां व साधल्यास आपल्या **'संभाषण'** नामक पुस्तकाच्या प्रसिद्धीकरितां बार्क्लेनें इंग्लंडमध्यें लंडनला जावयाचें ठरविलें. त्याकरितां आपल्या ट्रिनिटी कॉलेजांतून त्यानें रजा घेतली. तो इंग्लंडला आल्यावर त्याची लंडनमधल्या विद्वद्रत्नाशीं ओळख करून देण्याची खटपट बार्क्लेचा देशबंधु 'गलिव्हरच्या वृत्तांता'चा प्रसिद्ध कर्ता स्विफ्ट, व प्रसिद्ध ग्रंथकार स्टील यांनीं केली. दोघांचेंहि बार्क्लेच्या प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांवरून चांगलें मत झालेलें होतें. त्यांनीं आपल्या देशांतील या होतकरू तत्त्वज्ञान्याची राजदरबारींहि ओळख करून दिली. स्टीलच्या 'गार्डियन' या पत्रांत बार्क्ले निबंध लिहूं लागला. प्रत्येक निबंधाबद्दल त्याला एक गिनी मिळत असे. आपल्या मित्राच्या साहाय्यानें बार्क्लेनें ट्रिनिटी कॉलेजांत असतांना लिहिलेला तत्त्वज्ञानात्मक संभाषणाचा ग्रंथ लंडनमध्यें प्रसिद्ध केला. या ग्रंथानें त्याची सर्वत्र वाहवा होऊन त्याच्या मताचा झपाट्यानें प्रसार झाला. त्याच्या मताला पुष्कळ अनुयायी मिळाले, व त्याची यूरोपांतील प्रमुख तत्त्वज्ञान्यांत गणना होऊं लागली.

बार्क्लेच्या या कीर्तीमुळें त्याला सरकारदरबारांत मान मिळूं लागला व युरोपांत प्रवास करण्याची त्याला संधि आली. लॉर्ड पिटरबरो या वजनदार सरदाराची सिसिलीच्या राजाकडे वकील म्हणून नेमणूक झाली व त्यानें बार्क्लेला आपला चिटणीस म्हणून बरोबर नेण्याचें ठरविलें.

बार्क्लेच्या आयुष्यांतील हीं प्रवासाचीं वर्षें त्याला फार आनंदांत गेलीं

व या त्याच्या प्रवासामुळें त्याला ग्रीक तत्वज्ञानाचा विशेष नाद लागून त्याच्या पुढील तात्विक मतांवर प्लेटो या ग्रंथकर्त्यांच्या लेखांचा फारच परिणाम झाला. फ्रान्स, इटली व ग्रीस या देशांमधल्या मोठमोठ्या शहरांत बार्क्लेला महिनेच्या महिने राहण्याला सांपडलें व त्यानें आपल्या या निवासाचा पूर्ण फायदा करून घेतला. आपल्या प्रवासाचीं व त्या प्रवासांत पाहिलेल्या प्रेक्षणीय स्थळांचीं सविस्तर वर्णनें बार्क्ले इंग्लंडांतील आपल्या स्नेह्यांना पाठवीत असे. हा सर्व पत्रव्यवहार प्रसिद्ध झालेला आहे व त्यावरून बार्क्लेची सूक्ष्म अवलोकनशक्ति, त्याचा मार्मिकपणा, त्याची सदभिरुचि, व पाहिलेल्या गोष्टींचें हुबेहूब वर्णन करण्याची त्याची शैली हीं उत्तम तऱ्हेनें दिसून येतात.

सुमारें वर्षदीड वर्ष युरोपांत काढल्यावर ॲन राणीच्या मृत्यूमुळें मंत्रिमंडळांत फरक झाला, व लॉर्ड पिटरबरोंना परत यावें लागलें. त्यामुळें बार्क्लेलाही लंडनला परतावें लागलें. त्यामुळें बार्क्लेची प्रवासाची हौस पूर्ण झाली नव्हती. स्विफ्टच्या वजनानें बार्क्लेला एका श्रीमंत मुलाच्या खाजगी शिक्षकाची जागा मिळून तो पुनः इंग्लंडांतून युरोपांत गेला. या वेळीं त्याला चार वर्षे युरोपात घालवितां आलीं. अर्थात् आयर्लंड सोडून त्याला एकंदर सात वर्षे झालीं.

१७२० च्या सुमाराला बार्क्ले इंग्लंडांत परत आला. तों इंग्लंडमध्यें ' साउथ सी बबल ' या नांवानें इंग्लंडच्या इतिहासांत प्रसिद्ध असलेल्या व्यापारी कंपनीचा बोजवारा होऊन लोकांची फार दैना झाली होती. बार्क्लेनें या बाबतींत एक निबंध प्रसिद्ध करून त्यांत त्यानें लोकांच्या दोषांचें आविष्करण केलें व हे दोष नाहींसे झाल्याखेरिज देशाचा तरणोपाय नाहीं असें प्रतिपादन केलें. पण या प्रसंगानें निवळ तात्विक व वाङ्मयी विषयांपेक्षां सामाजिक सुधारणेकडे बार्क्लेचें जास्त लक्ष्य वेधलें व कांहीं तरी लोककल्याणाचें प्रत्यक्ष काम आपण हातीं घ्यावें, असा विचार त्याच्या मनांत घोळूं लागला.

देशीं परत आल्यावर बार्क्लेला आयुष्यक्रम कायम करण्याची संधि

मिळाली. कारण त्याच्या कॉलेजांत तो आधींपासून फेलो होताच, पण परत आल्यावर त्याला अधिक पगाराच्या शिक्षकाच्या जागेवर नेमण्यांत आलें. तसेंच त्यानें इंग्लंडांत असतांना उपाध्यायाच्या धंद्याची दीक्षा घेतली असल्यामुळें त्या कामावरही त्याला नेमण्यांत आलें. पण लोक-कल्याणाची कल्पना त्याच्या डोक्यांत घोळत असल्यामुळें या स्वार्थी आयुष्यक्रमानें व उद्योगांनीं त्याचें समाधान होईना. याच वेळीं एका मृत्युपत्रान्वयें बरीच मोठी द्रव्याची देणगी त्याला मिळाली. यामुळें त्याच्या लोककल्याणाच्या इच्छेनें उचल खाल्ली व आपण बरमुडा बेटांत जाऊन तेथें एक विद्यापीठ स्थापन करावें, असें त्याच्या मनानें घेतलें. या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याकरतां आपल्याला मिळालेली सर्व संपत्ति, तसेंच आपल्याला दिलेल्या कॉलेजांतील व धर्मखात्यांतील मानाच्या व फायदेशीर जागाहि सोडण्याला तो तयार झाला. त्यानें कांहीं तरुण मंडळीला आपल्या बेताला अनुकूल करून घेतलें व आपल्या भावी विद्यापीठाला सरकारी सनद व सरकारी मदत मिळविण्याची खटपट करण्याकरतां बार्क्ले पुनः इंग्लंडांत आला.

पहिल्याप्रथम ज्याप्रमाणें स्विफ्टनें बार्क्लेला राजदरबारीं प्रवेश करवून दिला, त्याचप्रमाणें याहि वेळीं त्यानें बार्क्लेकरितां खटपट केली. बार्क्लेनें आपला विद्यापीठाचा बेत सविस्तरपणें पुष्कळ जणांना सांगितला व त्यानें खासगी गृहस्थांकडून पैशाच्या मदतीचीं आश्वासनें घेतलीं. बार्क्लेच्या वक्तृत्वानें व कळकळीनें या बेताला बरेंच स्वरूप आलें. त्यानें जॉर्ज राजाची मुलाखत घेतली व राजालाहि ही कल्पना पसंत पडली. मुख्य प्रधान वॉलपोल हा मोठा धोरणी, मुत्सद्दी व व्यवहारज्ञ होता. त्याला बार्क्लेची कल्पना अव्यवहार्य वाटली; पण राजाचा कल पाहून त्यानें आपलें विरुद्ध मत दिलें नाहीं. त्याच्या मनाची अशी कल्पना होती, कीं, पार्लमेंटमध्यें ही योजना पसंत होणार नाहीं. पण येथें वॉलपोलची अटकळ फसली. कारण बार्क्लेनें फारच खटपट केली. तो प्रत्येक सभासदाला जाऊन भेटला व आपल्या गोड भाषणानें त्यानें

आपल्या योजनेला सर्वांची अनुमति मिळविली, व वॉलपोलच्या अटक-ळीबाहेर बार्क्लेच्या योजनेला यश येत चाललें. सनद देण्यासंबंधीं व विद्यापीठाच्या घटनेसंबंधीं व पैशाच्या मदतीसंबंधीं ठराव पार्लमेंटांत पास झाले व चार वर्षांच्या खटपटीनें आपली योजना मूर्त स्वरूप धारण करणार म्हणून बार्क्लेला मोठा आनंद झाला. आपल्या नव्या लोक-कल्याणाच्या कामगिरीवर जाण्यापूर्वी बार्क्लेनें एका सुशील मुलीशीं विवाह करून घेतला, व मोठ्या हुरुपानें १७२८ सालीं तो प्रथमतः रोडबेटांत जाण्याकरितां जहाजावर चढला.

आपल्या विद्यापीठाला सनद मिळण्याचें आणि वार्षिक वर्गणी मिळ-ण्याचें सरकाराकडून आश्वासन मिळालें, आणि लोकांनींहि चांगला आश्रय देण्याचें कबूल केलें, तेव्हां आतां कोणतेंहि विघ्न राहिलें नाहीं, असें बार्क्लेला वाटलें. पण बार्क्लेसारख्या सरळ, उत्साही व परोपकाररत पुरुषाला व्यवहारज्ञ, कुटिलनीतिनिपुण आणि स्वार्थी मुत्सद्यांच्या धोरणी वर्तनाचें बीज कसें कळावें ! बार्क्ले रोड बेटांत जाऊन पोहों-चला. तेथली एकंदर सृष्टिशोभा आणि परिस्थिति पाहून आपल्या पहिल्या योजनेपेक्षां येथेंच विद्यापीठ काढणें चांगलें, असें त्याला दिसून आलें. पण सरकारी वीस हजार पौंडांची मदत येण्याची तो वाट पहात होता. वॉलपोलच्या मनांत बार्क्लेच्या योजनेबद्दल मुळींच आस्था नव्हती. राजाच्या मर्जीविरुद्ध जायाचें नाहीं, म्हणून तो विरुद्ध नव्हता, इतकेंच. पण तो कोठावळा होता ! प्रत्यक्ष पैसे देणें त्याच्या हातांत होतें. जेव्हां बार्क्लेच्या मित्रांनीं वॉलपोलला पार्लमेंटमध्यें पसार झालेल्या ठरावाप्रमाणें पैसे देण्याबद्दल तगादा लावला, तेव्हां त्यानें दिलेलें उत्तर लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तो म्हणाला " प्रधान या नात्यानें जर तुम्ही मला प्रश्न विचारीत असाल, तर मला असें म्हटलेंच पाहिजे, आणि मी खातरीनें म्हणेन, कीं, सरकारी खजिन्याला सवड झाल्या-बरोबर पैसे दिले जातील ! पण वीस हजार पौंडांच्या देणगीच्या भरं-वशावर डीन बार्क्लेनें अमेरिकेंत राहावें किंवा नाहीं, असें जर मित्रत्वाच्या

नाल्यानें तुम्ही मला विचारीत असाल, तर बार्क्लेनें तावडतोब युरोपला परत यावें, व देणगीची आशा सोडावी, असें मी सांगेन."

याप्रमाणें मुख्य प्रधानानें एका उदार योजनेचा नाश केला, याबद्दल बार्क्लेला अत्यंत वाईट वाटलें, हें उघड आहे.

सरकारी मदतीच्या भरंवशावर बार्क्लेनें रोड बेटांत सुमारें शंभर एकरांचें एक शेत विकत घेऊन तेथें त्यानें लहानसें घर बांधलें, व त्याला राजाच्या स्मरणार्थ 'व्हाईट हॉल' असें नांव ठेवलें. त्याचा येथला व्यवसाय म्हणजे अध्ययन व लेखन हा होता. दहा बारा वर्षांत त्याला असा शांत वेळ मिळाला नव्हता. तेथली सृष्टिशोभाहि बार्क्लेला फार आवडत असे. समुद्रकांठची एका खडकाची गुहावजा जागा ही बार्क्लेची आवडती बसावयाची जागा होती. या ठिकाणींच बार्क्लेचा कुटुंबविस्तार झाला. येथें त्याला एक मुलगा व एक मुलगी झाली पण दुर्दैवानें मुलगी फार दिवस जगली नाहीं.

सरकारी मदत मिळण्याची आशा नाहीं, हें ठाम झाल्यावर बार्क्लेला आपल्या योजनेचा नाद सोडून देणें भाग पडलें, व तो आपल्या बायकांमुलांसकट १७३१ मध्यें इंग्लंडला परत आला. तरी बार्क्लेची अमेरिकेच्या सुधारणेची हौस कमी झाली नाहीं. त्यानें आपले शेत येल विद्यालयांत शिष्यवृत्तीकरितां ठेविलें. तसेंच जमविलेल्या वर्गणींतून एक हजार पुस्तकांचा संग्रह त्यानें येल विद्यालयाला नजर केला.

इंग्लंडांत परत आल्यावर दोन महिन्यांनीं बार्क्लेनें तत्त्वज्ञान या विषयावरील आपला सर्वांत मोठा ग्रंथ प्रसिद्ध केला. हाहि संभाषणात्मक आहे. हा ग्रंथ बार्क्लेच्या सर्व ग्रंथांत अत्यंत लोकप्रिय झाला. रोड बेटामध्यें जी अवर्णनीय सृष्टिशोभा त्याला पाहण्याला सांपडली व तात्त्विक अध्ययन आणि मनन करण्याला जी स्वस्थता मिळाली, त्या दोहोंची छटा या ग्रंथांत दिसून येते. हा बार्क्लेचा ग्रंथ तात्त्विक विषयावर असूनहि तो फारच मनोरंजक झालेला आहे. त्याच्या ग्रंथावर कांहीं ठिकाणीं प्रतिकूल टीका झाली, व त्याला त्यानें उत्तरात्मक दुसरें पुस्तक लिहिलें.

रोड बेटांतून परत आल्यावर एक वर्षपर्यंत तो लंडनमध्यें राहिला, व या वर्षभर त्याचा सारखा लेखनव्यवसायच चालू होता.

१७३४ मध्यें बार्क्ले पुनः आपल्या देशीं आयर्लंडला परत आला. अमेरिकेंतील योजनेच्या बाबतींत सरकारच्या धोरणामुळें त्याची निराशा झाली होती. त्याची अंशतः भरपाई करण्याकरतां व कांहीं अंशीं बार्क्लेची थोर योग्यता मनांत आणून सरकारनें बार्क्लेला क्लॉयॉनीची मोठ्या मानाची व हुद्याची बिशपची जागा दिली व बार्क्ले क्लॉयॉनी येथें राहण्याला गेला. येथें तो एकंदर अठरा वर्षे राहिला. बार्क्ले जरी प्रॉटेस्टंट-पंथी होता, तरी त्याचीं मतें उदार होतीं, आणि त्याचा देशाभिमानही संकुचित नव्हता. यामुळें तो प्रॉटेस्टंट व कॅथॉलिक या दोन्ही पंथांच्या लोकांना समानतेनें वागवी. डब्लिन युनिव्हर्सिटींत कॅथॉलिक लोकांना घ्यावें असें त्याचें मत होतें.

येथें आपलें काम करीत असतां बार्क्लेचें लक्ष्य सामान्य लोकांच्या स्थितीकडे लागलें व आयरिश लोकांची किती दैन्यावस्था आहे हें त्याच्या ध्यानांत येऊन मोठ्या लोकांचें लक्ष्य या गोष्टीकडे वेधावें म्हणून त्यानें प्रश्नांच्या रूपानें आपले विचार प्रदर्शित केले. या प्रश्नांचे तीन भाग बार्क्लेनें प्रसिद्ध केले. या तिन्ही भागांत सामाजिक व अर्थशास्त्रविषयक किती तरी तत्वें न कळत ग्रथित झालीं आहेत. ह्यूम किंवा अर्थशास्त्राचा जनक ॲडम स्मिथ याच्यापूर्वी सुमारें ४० वर्षें हा ग्रंथ लिहिला गेला. त्या मानानें त्याची महती विशेषच आहे. ज्या ज्या विषयाकडे बार्क्ले आपलें लक्ष घाली, त्या त्या विषयांत तो कांहीं तरी नव्या कल्पना काढीत असे. साध्या व सुंदर भाषेंत आपले विचार प्रदर्शित करण्याची विलक्षण हातोटी त्याला साधलेली होती.

वर सांगितलेंच आहे कीं, क्लॉयॉनीचा बिशप या नात्यानें बार्क्लेनें १८ वर्षे त्या ठिकाणीं काढलीं. या इतक्या अवकाशांत तो एकदांच बाहेर गेला होता व तो डबलीन येथें पार्लमेंट चालू असतांना होय.

बार्क्ले क्लॉयॉनी येथें कायमचा येऊन राहिल्यावर १७३९ मध्यें आय-

लँडांत मोठा दुष्काळ पडला व दुष्काळाची सोबतीण सांथ हीहि सुरू झाली. यामुळें हजारों लोक मरण पावले. या दुर्धर प्रसंगानें बार्क्लेचें लक्ष्य रोगाला एकादें औषध शोधून काढण्याकडे लागलें. रोड बेटांत असतांना तेथील रहिवाशांकडून त्यानें डामर या पदार्थाच्या विलक्षण गुणाबद्दल ऐकलें होतें. त्यासंबंधीं त्यानें आतां प्रयोग चालविले व डामराच्या पाण्यापासून पुष्कळ ठिकाणीं फार गुण येतो, असें त्याला दिसून आलें. बार्क्लेच्या नेहमींच्या उत्साही स्वभावाप्रमाणें हें औषध सर्वरोगपरिहारक आहे, अशी त्याची समजूत होऊन डामराच्या पाण्याच्या रामबाणपणाबद्दल त्यानें लेख लिहिले व त्याचा जनसमूहावर विलक्षण परिणाम झाला. जिकडे तिकडे डामराचें पाणी तयार करण्याचे कारखाने निघाले ! या वेळीं शास्त्रीय वैद्याबरोबर बार्क्लेला दोन हात करावे लागले व ते त्यानें केलेहि. डामराच्या या विलक्षण शक्तीसंबंधीं बार्क्लेच्या डोक्यांत विचार घोळूं लागले. या काळीं त्याचें वाचन प्लेटो व नीओप्लॅटनिझम यांबद्दल चालू होतें. यामुळें या दृश्य जगाच्या मुळाशीं कांहीं एक अदृश्य तत्व आहे अशी त्याची समजूत झाली व कशा तरी तऱ्हेनें डामरांत तें अदृश्य तत्व येत असावें, व म्हणूनच डामराच्या अंगीं सर्वरोगपरिहारक अशी विलक्षण शक्ति उत्पन्न होत असावी असें बार्क्लेच्या मनानें घेतलें. याप्रमाणें वैद्यशास्त्र व तत्वज्ञान यांचा मिलाफ त्याच्या मनांत अवतीर्ण होऊन याच मनःस्थितींत त्यानें 'सांखळी' म्हणून एक ग्रंथ प्रसिद्ध केला. यांतील डामरासंबंधाचा भाग अर्थात्‌च क्षणिक महत्त्वाचा होता. डामरासंबंधीं बार्क्लेचे विचार अर्वाचीन वैद्यशास्त्राला संमत नाहींत. तरी पण डामर आणि त्याचाच पर्याय क्रिआसोट हीं दोन औषधें अर्वाचीन वैद्यकांत कायमचीं आलीं, हा बार्क्लेच्या लेखांचा आणि प्रयोगांचा परिणाम होय, यांत शंका नाहीं ! परंतु 'सांखळी' या ग्रंथांतील तात्विक भाग हा कायमच्या महत्वाचा आहे व या भागावरून बार्क्लेच्या तात्विक विचारांची वाढ सारखी होत होती असें दिसतें. बार्क्लेच्या कॉलेजांतील तरुणपणच्या दिवसांत त्याचा विशेष ओढा जड द्रव्याचा अभाव सिद्ध करण्याकडे होता. या काळांत त्याचा

प्रत्यक्षावर जास्त जोर होता; व प्रत्यक्ष संवेदनाच्या पलीकडे ज्ञेय असें कांहीं नाहीं, असें त्यानें प्रतिपादन केलें. त्याच्या मध्य-आयुष्यांत त्याचा भर नास्तिक लोकांविरुद्ध होता व त्याच्या उतारवयांत त्याचीं मतें प्लेटोच्या सारखीं होत चाललीं होतीं. दृश्य संवेदनाच्या किंवा इंद्रियांनीं गोचर होणाऱ्या दृश्य जगाच्या पाठीमागें चिन्मय असें एक तत्त्व आहे व या चिन्मय तत्वाचा आपलें दृश्य जग हा विकास आहे, असें बार्क्लेला भासूं लागलें होतें, आणि हाच तत्वविचार 'सांखळी' या ग्रंथांत प्रमुखत्वानें आलेला आहे.


बार्क्लेचा संसार मोठ्या सुखाचा झाला. त्याला बायको त्याच्या अनुरूप मिळाली होती. त्याला दोन मुलगे, एक मुलगी ( रोड बेटांत अगदीं लहानपणीं वारलेली मुलगी सोडून ) इतकींच अपत्यें झालीं. मात्र त्याच्या उतारवयांत त्याचा एक तरुण मुलगा वारला. प्रसिद्ध मुत्सद्दी बर्कला जसें पुत्रवियोगाचें दुःख झालें, तशीच बार्क्लेची स्थिति झाली. एका पत्रांत बार्क्लेनें आपल्या या पुत्रनिधनाचा उल्लेख केलेला आहे. तें पत्र मनाला चटका लावण्यासारखें आहेः—

" खाजगी व दरबारी व्यवसाय, व ज्याला लोकांत सुख मानतात, या सर्वांपासून मी अलिप्त होतों. माझ्या नजरेखालीं शिकलेला माझा एक लहानसा मित्र होता. त्याचें चित्रलेखन मला आनंद देत असे, त्याचें गायन मला मोहून टाकी, आणि त्याचा तरतरीत व आनंदी स्वभाव माझी नेहमीं करमणूक करी. देवानें माझा मित्र हिरावून नेला ! देवाची मर्जी ! त्याचे गुण व त्याचें स्वरूप, त्याचा साधेपणा, त्याची धर्मनिष्ठा व विशेषतः त्याची पितृभक्ति यांनीं माझ्यावर फार छाप ठेवली होती. मला तो प्रिय होता, इतकेंच नव्हे, त्याचा मला गर्व वाटे ! या जगांतील वस्तूंवर ठेवूं नये इतका मी त्याच्यावर आपला जीव ठेवला होता."

आतां बार्क्लेच्या आयुष्यांतील एकच प्रसंगाची हकीकत सांगावयाची राहिली. बार्क्लेनें आपल्या मुलाला ऑक्सफर्ड विद्यालयांत घातलें व आपणही आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस त्याच विद्यापीठाच्या ठिकाणीं घाल-

चावे, असें त्याच्या मनानें घेतलें व आपल्या निश्चयी व उत्साही स्वभावानुरूप कसल्याही अडचणींना न जुमानतां बार्क्लेनें आपला निश्चय पार पाडला. आपला बिशपचा हुद्दा कायम ठेवून त्याला नियमाप्रमाणें ऑक्सफर्डला जातां येईना, तेव्हां त्यानें तावडतोब त्या हुद्याचा राजिनामा दिला. पण जॉर्ज राजानें त्याच्या वयाकडे व विद्वत्तेकडे पाहून त्याच्याकरतां नेहमींच्या नियमाला अपवाद करून बार्क्लेला बिशपच्या हुद्याचा राजिनामा न देतां ऑक्सफर्डमध्यें राहण्याची परवानगी दिली. पण ऑक्सफर्डला येऊन बार्क्लेला फार दिवस झाले नाहींत, तोंच तो एके दिवशीं आपल्या कुटुंबामध्ये मुलाबाळांसमवेत बोलत बसला असतां एकाएकीं १७५३ मध्यें मरण पावला! अशा तऱ्हेचें सुखाचें मरण येणें फार थोड्यांच्या नशिबीं असतें.

बार्क्लेच्या चरित्रापासून त्याचा निश्चयी, उत्साही, सरळ स्वभाव उत्कृष्ट तऱ्हेनें दिसून येतो. त्याचे तात्विक विचार आपल्या इकडल्या हरिदासाप्रमाणें प्रपंचापासून अलग राहिलेले नव्हते, तर त्या विचारांचा पूर्ण अंमल त्याच्या वर्तनावर झालेला होता. खऱ्या तत्त्वज्ञान्याप्रमाणें त्याची वृत्ति बनलेली होती. तो मान, पैसा किंवा कीर्ति यांकरितां हपापलेला नव्हता. आपल्या विचारांशीं आचाराचें तादात्म्य करणारीं माणसें विरळा म्हणून तुकाराममहाराजांनीं अशीं माणसें वंदनीय आहेत असे यथार्थ उद्गार काढलेले आहेत. त्याच कोटीपैकीं बार्क्ले हा तत्त्वज्ञानी होता.



( २ )

# बार्क्लेचें तत्त्वज्ञान.

येथपर्यंत बार्क्लेचें संक्षिप्त चरित्र व कालानुक्रमानें त्याच्या ग्रंथांची माहिती दिली. बार्क्लेच्या चरित्राकडे पाहिलें म्हणजे असें दिसून येतें कीं, ज्याप्रमाणें केव्हां केव्हां कवि हे स्वयंस्फूर्तीनें—अभ्यासानें—अनुकरणानें—परिश्रमानें नव्हे—कवि बनतात त्याप्रमाणें बार्क्ले हा स्वयंस्फूर्तीनें तत्वज्ञानी बनलेला होता. कॉलेजापासून त्याचे तत्त्वज्ञानविषयक विचार चालू झाले व ते आमरणांत चालू राहिले. यामुळेंच त्याचे तत्त्वज्ञानविषयक विचार ठाम किंवा स्थिर न राहता ते कांहींसे बदलत गेले व त्या विचारांचें सिंहावलोकन करणारास त्या विचारांची प्रगति होत गेलेली आहे असें दिसतें. बार्क्लेच्या तत्त्वज्ञानविषयक विचारामध्यें जणू कांहीं अर्वाचीन युरोपच्या तत्त्वज्ञानाच्या इतिहासाचें स्वरूप अल्प प्रमाणांत दिसून येतें. म्हणूनच बार्क्लेच्या तत्त्वज्ञानाच्या तीन पायऱ्या पडतात असें बार्क्लेच्या चरित्रकारांनीं म्हटलें आहे. बार्क्लेच्या आयुष्यांतील तत्त्वज्ञानविषयक विचारांत एकप्रकारची एकसूत्रता असून त्याच्या विचारांची सारखी परिणती होत गेलेली आहे असें दृष्टीस पडतें. बार्क्लेच्या तत्त्वज्ञानाचें सामान्य धोरण त्या काळीं बोकाळत चाललेल्या जडवादाविरुद्ध व नास्तिक्याविरुद्ध होतें. जगाचें आदिकारण जड पंचमहाभुतें नसून चिन्मय असा परमेश्वर आहे हें त्यानें युक्तीच्या साहाय्यानें प्रतिपादन केलें व हें करण्याकरितां 'मूले कुठारः' या न्यायानें त्यानें असें दाखविण्याचा प्रयत्न केला कीं ज्याला जड द्रव्य किंवा पंचमहाभूतें म्हणतात तींच मुळीं चित्तत्वाचीं संवेदनात्मक स्वरूपें होत. आतां बार्क्लेच्या तत्त्वज्ञानविषयक विचारांचें क्रमानें विवेचन करूं.

बार्क्लेचा पहिला तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ म्हणजे 'दृष्टीची नवी मीमांसा' हा होय. या ग्रंथाचा विषय बाह्यतः तत्त्वज्ञानाचा दिसत नाहीं; पण या विषयाचें पर्यवसान तात्त्विक आहे असें बार्क्लेनें दाखविलें आहे. आपल्या पांच ज्ञानेंद्रियांमध्यें आपण दृष्टीला किंवा डोळ्यांना जास्त महत्व देतों. कोणत्याही बाह्य गोष्टीच्या किंवा जड द्रव्याच्या अस्तित्वाचें अत्यंत भरं-वशाचें प्रमाण म्हणजे अवलोकनाचें होय असें आपण म्हणतों. 'चक्षुर्वैसत्यं' या म्हणीवरून सत्यशोधनांत डोळ्याचें केवढें महत्त्व आहे हें समजतें. 'प्रत्यक्ष' हा शब्दही तेंच दाखवितो जडवाद्यांचें प्रमाण-सर्वस्व म्हणजे प्रत्यक्ष होय. जेवढें डोळ्यानें दिसतें तेवढेंच सत्य असें चार्वाकासारखे तत्त्वज्ञानी मानतात. असें या प्रत्यक्ष प्रमाणाचें महत्त्व असल्यामुळें बार्क्लेनें या प्रमाणाचें पृथक्करण आपल्या ग्रंथांत केलें आहे.

वस्तूंचा आकार, त्यांचें रंगरूप, त्यांची लांबी रुंदी खोली—सारांश वस्तूंचे मुख्य मुख्य गुण—विशेषतः त्या वस्तूंना जडत्व देणारे गुण—तसेंच वस्तूंमधलें अंतर म्हणजे वस्तूंचें दूरपण किंवा नजीकपण हे सर्व गुण आपण आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहतो असें सामान्यतः समजलें जातें. पण बार्क्लेनें असें प्रतिपादन केलें कीं, हा आपला समज चुकीचा आहे. आपण खरोखरी हे सर्व विविध गुण प्रत्यक्ष पहात नाहीं, तर प्रत्यक्ष पाहिलेल्या गुणांवरून आपण इतर गुणांबद्दल अनुमान—अंदाज करतो.

दृष्टीचा खरा विषय रंग आहे. पदार्थापासून निघणारे किरण आपल्या डोळ्यांच्या बुबुळांवर पडतात व आपल्या डोळ्यासमोर कमी अधिक स्पष्ट अशी रंगाची आकृति उभी राहते. आपल्या बुबु-ळांवर पदार्थाच्या किरणांचीं टाकें पडतात. तो किरण दुरून आला किंवा जवळून आला हें किरणाच्या कमी अधिक लांबी-वरून कळणें शक्य नाहीं. कारण किरणांची लांबी आपल्याला दिसत नाहीं. म्हणून आपल्या डोळ्यांना अंतर—पदार्थांचा नजिकपणा किंवा दूरपणा हा प्रत्यक्ष दिसत नाहीं. दूरच्या पदार्थाकडून आलेल्या किर-णांनीं पाडलेली आकृति लहान व अंधुक असते, तर जवळच्या पदार्था-

कडून आलेल्या किरणांनीं पाडलेली आकृति अधिक मोठी व अधिक स्पष्ट असते इतकेंच. पदार्थाचा दूरपणा किंवा नजीकपणा हा आपल्याला खरोखरी गतीनें प्रत्यक्ष कळतो. ज्या वस्तूकडे जाण्याला आपल्याला जास्त चालावें लागतें ती वस्तु दूर आहे असें आपण समजतों व ज्या वस्तूकडे जाण्याला थोडें चालावें लागतें ती जवळ आहे असें आपण म्हणतों. वस्तु दूर असतांना तिची आपल्या डोळ्यावर पडणारी आकृति लहान व अंधुक अशी आपण पाहतों व जसजसे आपण वस्तूच्या जवळ जवळ जातों तसतशी ही आकृत्ति मोठी व स्पष्ट होत आहे असें आपल्याला दिसून येतें. तेव्हां आकृतीचा कमीअधिक अंधुकपणा व लहान-मोठेपणा या पदार्थाच्या कमीअधिक दूरपणाच्या अंतराच्या खुणा आपल्या अनुभवावरून आपण मनांत बनवितों व वस्तूची डोळयावर पडलेली आकृति स्पष्ट व मोठी असल्यास वस्तु जवळ आहे असें न कळत आपण अनुमान करतों. खरोखरी डोळ्यांनीं आपल्याला पदार्थाचें अंतर किंवा खोली दिसत नाहीं. हळुहळू अनुभवानें आपण बिनचूक अनुमान करूं शकतों. ही गोष्ट एका दाखल्यानें स्पष्ट करतां येईल. एखादा मनुष्य जन्मतः आंधळा आहे असें समजा, त्याला वस्तूंचें ज्ञान स्पर्शेन्द्रियानें व हालण्याचालण्यानें किंवा गतीनेंच फक्त झालेलें असतें. म्हणजे त्याला वस्तूची लांबीरुंदीखोली वस्तूचा दूरपणा वगैरे सर्व गोष्टी स्पर्शानें व गतीनें प्रत्यक्ष झालेल्या असतात, पण त्याला वस्तूच्या रंगाचें ज्ञान नसतें. अशा आंधळया मनुष्याला डोळे आले व त्यानें एका आकाराचा व एका रंगाचा चेंडु व त्याच आकाराचें व त्याच रंगाचे चेंडूचें चित्र एकदम व सारख्या अंतरावरून पाहिलें तर त्याला चेंडू कोणचा व चित्र कोणतें हें ओळखतां येणार नाहीं. कारण डोळयावर पडणाऱ्या दोन्ही रंगांच्या आकृतीमध्यें सूक्ष्म भेद असेल खरा; पण तो भेद त्या डोळस झालेल्या आंधळ्याला कळणार नाहीं. त्या दिसत्या आकृतीकडे चालत जाऊन त्या दोन्ही वस्तूंना स्पर्श करून जेव्हां तो डोळस मनुष्य पाहील तेव्हांच त्याला चित्र व चेंडू यांतला फरक कळेल व मग पुनः दुरून डोळ्यानें पाहून त्याला चित्राच्या व

चेंडूच्या डोळ्यांवर पडलेल्या आकृतींतील सूक्ष्म भेद ध्यानांत येईल.म्हणजे डोळ्यांवर पडलेल्या आकृतींच्या कमीअधिक स्पष्टपणावरून तो स्पर्शेंद्रियानें होणाऱ्या वस्तूच्या खऱ्या आकाराचें व स्वरूपाचें बिनचूक अनुमान करूं लागेल. आपल्या डोळ्यांना प्रत्यक्ष अंतर दिसत नाहीं, तर संवयीनें व अनुभवानें आपण अंतर अजमावतों, याचें अर्वाचीन काळचें उदाहरण म्हणजे एकामागें एक असलेले सिग्नलचे दिवे होत. रात्रींच्या वेळीं हे दिवे एकाच अंतरावर असून समोरासमोर असलेल्या दोन दिव्यांप्रमाणें नवख्या माणसाला भासतात. पण रात्रींच्या प्रहरीं काम करणाऱ्या स्टेशन-वरच्या पोर्टरला दिव्यांच्या उजेडाच्या कमीअधिक प्रमाणावरून व लहान-मोठ्या आकारावरून दूरच्या अंतराचा दिवा कोणता व जवळचा कोणता हें बिनचूक सांगतां येतें.

अशा व अशाच तऱ्हेच्या दुसऱ्या प्रमाणांवरून बार्क्लेनें असें प्रतिपादन केलें कीं, आपण जें वस्तूचें पाहणें म्हणतों तें खरोखरी पाहणें नसून अज-मावणें असतें. म्हणजे प्रत्येक अवलोकनक्रियेमध्यें मानवी मनाचा तर्क-व्यापार न कळत चालू असतो. पदार्थापासून ज्या अवलोकन-संवेदना आपल्या मनावर उमटतात त्या एक प्रकारच्या खुणा असतात. त्यावरून त्याला दुसऱ्या इंद्रियांनीं कोणत्या संवेदना अनुभवतां येतील हें समजतें. आतां उघड उघड संवेदना या मानवी मनावर अवलंबून आहेत. मानवी मन नसेल तर संवेदना नाहींत व संवेदना नाहींत म्हणजे पदार्थ नाहींत. उदाहरणार्थ आंधळ्याला रंगाच्या संवेदना नाहींत. म्हणून त्याला डोळ्यानें कोणत्याच गोष्टीचें अस्तित्व कळत नाहीं व त्या आंधळ्याला जर दुसरीं स्पर्शेंद्रियांसारखीं इंद्रियें नसली तर त्याला बाह्य वस्तूचें ज्ञान कांहीं होणार नाहीं, नव्हे बाह्य वस्तु ही कल्पनाच त्याला होणार नाहीं. त्याला भासणाऱ्या सर्व गोष्टी मानसिक आहेत असें त्याला वाटेल. यावरून संवेदना या एक प्रकारची भाषा आहे असें म्हणणें प्राप्त आहे. ज्याप्रमाणें भाषेंतील शब्दाचे द्वारें शब्दापेक्षां अगदीं भिन्न अशा वस्तूचें आपल्याला

ज्ञान होतें, त्याप्रमाणें एका प्रकारच्या संवेदनांवरून भिन्न संवेदनांचें आपल्याला ज्ञान होतें. हाच बार्क्लेच्या पहिल्या ग्रंथाचा मथितार्थ आहे.

या ग्रंथानंतर लवकरच प्रसिद्ध झालेला बार्क्लेचा दुसरा ग्रंथ म्हणजे 'मानवी ज्ञानावरील ग्रंथ' होय. या ग्रंथांत बार्क्लेनें 'जड द्रव्य' 'बाह्य वस्तु' व 'अचेतन सृष्टि' या कल्पनांवरच घाला घातला आहे. ज्याला आपण बाह्य वस्तु म्हणतों, ज्या मानवी मनापासून अगदीं भिन्न आहेत असें आपण समजतों त्या वस्तूचें ज्ञान आपल्याला इंद्रियांच्या संवेदनांनीं होतें. एखादें नारिंग आपण पाहतों, त्याच्या रंगाचें ज्ञान आपल्याला डोळ्यानें होतें, त्याच्या आकाराचें, त्याच्या मृदुपणाचें ज्ञान स्पर्शानें होतें, त्याचा सुवास नाकानें कळतो, त्याची रुचि जिभेनें कळते. सारांश नारिंगाचे सर्व गुण आपल्याला निरनिराळ्या इंद्रियांनीं कळतात. आतां आपलीं इंद्रियें आपल्या मनांत संवेदना उत्पन्न करतात, म्हणजे आपलें बाह्य वस्तूचें सर्व ज्ञान संवेदनात्मक आहे. ज्यांना आपण बाह्य वस्तूंचे गुण म्हणतों त्या सर्व संवेदनाच होत. तेव्हां आतां बाह्य वस्तूंचें बाह्यत्व व स्वतंत्र अस्तित्व कोठें राहिलें ? कारण समजा, आपण पहात असलेलें नारिंग पुढारणें नाहीसें झालें, पण जोंपर्यंत आपल्या मनाला रंगाच्या, आकाराच्या, मृदुपणाच्या, सुवासाच्या, रुचीच्या व इतर गुणांच्या संवेदना भासत आहेत, तोंपर्यंत तें नारिंग नाहींसें झालें आहे असें आपल्याला कळणारच नाहीं. अर्थात् पहिल्यापासूनच नारिंग नसलें तरी त्याचीहि प्रतीति आपल्याला होणार नाहीं. जोपर्यंत आपल्याला संवेदना होत आहेत तोपर्यंत बाह्य वस्तु आहेच असें आपलें मन आपल्याला सांगणार. तेव्हां बाह्य वस्तु म्हणजे संवेदनांचा समुदाय होय. वस्तूचे गुण म्हणजेही संवेदनाच होत. संवेदनाच्या किंवा गुणांच्या पाठीमागें असणारी निराळी आणखी बाह्य वस्तु नाहीं. तेव्हां बाह्य वस्तूची बार्क्लेच्या मतानें खालील व्याख्या ठरते. नियमानें एकत्र राहणाऱ्या संवेदनांचा समुदाय म्हणजे बाह्य वस्तु होत. बाह्य वस्तूंना मानवी मनाव्यतिरिक्त निराळें अस्तित्व नाहीं. या दृष्टीनें जगांत जड म्हणून पदार्थच नाहीं असें होतें;

सर्व कांहीं चिन्मय आहे, कारण जड वस्तु ही मानवी मनाच्या संवेदना होत.

पण या सिद्धांतावर एक जबरदस्त आक्षेप येतो तो हा कीं, बाह्य वस्तु व सृष्टि ही संवेदनांसारखी क्षणिक ठरते. संवेदना अनुभवण्यास मनुष्य नसला कीं जग नाहींसें होतें असें यावरून सिद्ध होतें. आपण निजलों कीं जग नाहींसें झालें या दृष्टीनें 'आप गई डुब गई दुनिया' ही म्हण खरी ठरते. व ज्या वेळीं जगावर मानवी प्राणी नव्हते तेव्हां जग नव्हतें,असेंहि या दृष्टीनें निष्पन्न होतें. या आक्षेपाच्या निराकरणांत बार्क्लेचें परमेश्वरविषयक तत्व पुढें येतें. मनुष्य पहात नसला, मानवी मन विनाश पावलें तरी बाह्य सृष्टि विनाश पावत नाही. कारण अविनाशी व शाश्वत असा परमेश्वर आहेच. तेव्हां मनुष्य जरी निजला असला तरी जग नाहींसें होत नाहीं. कारण परमेश्वर सदा पहात आहे. कारण बाह्य वस्तु जर संवेदनासमुदाय होत तर कोणत्या तरी मनाच्या, परमेश्वरी किंवा मानवी, संवेदना सतत चालूच आहेत. तेव्हां बार्क्लेच्या मतें बाह्य सृष्टि म्हणून कांहीं एक स्वतंत्र तत्त्व नाहीं. तें सर्वस्वीं परमेश्वरावर अवलंबून आहे. परमेश्वर शाश्वत व अविनाशी आहे म्हणून सृष्टि ही शाश्वत व अविनाशी आहे. कारण सृष्टि ही परमेश्वराची संवेदनाच आहे. तेव्हां जगात दोन चिन्मय तत्वें आहेत एक परमेश्वर किंवा परमात्मा व दुसरें मनुष्यें किंवा जीवात्मे. मनुष्याचें सर्व ज्ञान संवेदनात्मक आहे. या संवेदना अन्वर्थक किंवा सूचक आहेत. म्हणजे एका प्रकारच्या संवेदनांवरून दुसऱ्या प्रकारच्या संवेदनांचें अनुमान करतां येतें. ज्याप्रमाणें वस्तुच्या रंगाच्या आकृतीवरून वस्तूचें अंतर आपल्याला कळतें, त्याचप्रमाणें एका प्रकारच्या संवेदनांवरून दुसऱ्या प्रकारच्या संवेदनांचा आपल्याला अंदाज करतां येतो. सृष्टीचें ज्ञान म्हणजे या संवेदनांच्या सूचकत्वाचें ज्ञान होय. हें ज्ञान मनुष्याला अनुभवानें व संवईनें येतें. अमक्या संवेदनांचा अमुकच अर्थ कां याला कांहींएक कारण देतां येत नाहीं. तसा आपला अनुभव आहे इतकेंच आपल्याला म्हणतां येतें.

येथें बार्क्लेचें पूर्ववयांतील तत्त्वज्ञान संपलें. या तत्वज्ञानाचा हेतु मागें सांगितल्याप्रमाणें आस्तिक्य व धर्मनिष्ठा उत्पन्न करण्याचा होता व बार्क्लेच्या मतें तो त्यानें बऱ्याच अंशानें साध्य करून घेतला. कारण त्याच्या मतें धर्माचा अत्यंत मोठा शत्रु म्हणजे जडवाद होय. सर्व जग–मानवी मनसुद्धां–मूळ जड द्रव्यापासून झालें आहे असें आधिभौतिक शास्त्रें म्हणतात. अर्थात् या जगाच्या उपपत्तीमध्यें परमेश्वराला जागाच राहत नाहीं. असें झालें म्हणजे धर्मनिष्ठा ही अजिबात नाहींशी होते. कारण धर्माचा मूळ आधार जो परमेश्वर तोच जडामध्यें विलीन होतो. बार्क्लेनें आपल्या तत्वज्ञानविषयक विचारांनीं या आधिभौतिक शास्त्रीय विचारसरणींतील मूळ कांटा काढून टाकला. त्याचें म्हणणें असें कीं, मनुष्याच्या अवलोकनशक्तीचें पृथक्करण केलें किंवा त्याच्या ज्ञानाचें पृथक्करण केलें तर असें दिसून येतें कीं, ज्याला 'जड द्रव्य' 'जड आदि तत्व' म्हणतात ती कल्पना मुळांतच विसंगत आहे. सर्व ज्ञान संवेदनात्मक आहे. त्या संवेदना चित्स्वरूप आहेत व त्यावरून परमात्मा व जीवात्मा अशीं दोन तत्वें शाबीत होतात व जड तत्वाला वावच रहात नाहीं; नव्हे 'जड तत्व' ही कल्पना अज्ञानमूलक भासते. कारण तिच्या अस्तित्वाला कांहींच प्रमाण दाखवितां येत नाहीं. तेव्हां अशा अज्ञानमूलक पायावर उभारलेली जडवादाची व नास्तिक्य वादाची सर्व इमारत ढासळून पडते. व मग अर्थात् मनुष्य धर्मपरायण बनण्यास उशीर लागत नाहीं.

याप्रमाणें मानवी ज्ञानाच्या पृथक्करणानें जड तत्वाची कल्पना निराधार भासते; तर त्याच पृथक्करणाच्या योगें आपल्या आत्म्याची आपल्याला प्रचीति येते. जर सर्व ज्ञान संवेदनात्मक आहे तर अर्थात् या संवेदना अनुभवणारा आत्मा अवश्यमेव असला पाहिजे असा आपल्याला प्रत्यय येतो. तसेंच संवेदना या शाश्वत आहेत, कायमच्या आहेत; त्याचप्रमाणें त्या एकमेकांच्या सूचक आहे; यावरून हें सर्व घडवून आणणारा परमात्मा याच्या अस्तित्वाबद्दल मनाची खातरी पटते.

हेंच बार्क्लेच्या पूर्ववयांतील तत्वज्ञानाचें सार आहे. यांत बार्क्लेचा भर ज्ञान संवेदनात्मक आहे, व जडवाद हा विसंगत व बुद्धीला अग्राह्य आहे असें सिद्ध करण्याकडे आहे.

हींच मतें बार्क्लेनें नंतरच्या आपल्या ग्रंथांत संभाषणरूपानें प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. पुढें बार्क्लेचें लक्ष अमेरिकेंत विश्वविद्यालय स्थापण्याच्या योजनेकडे लागलें व याच काळांत त्याच्या वाचनांत प्लेटोच्या ग्रंथानें प्रमुख स्थान पटकावलें व प्लेटोच्या विचारांचा बार्क्लेवर पगडा बसला. याचा परिणाम असा झाला कीं, त्याच्या मध्यकालीन तात्विक विचारांत थोडासा फरक पडला. आतां बार्क्लेला ज्ञानाचें संवेदनात्मक पृथक्करण अपुरें भासूं लागलें. संवेदनाखेरीज ज्ञानाचें विचाररूपी एक अंग आहे असें बार्क्लेच्या ध्यानांत येऊं लागलें. तेव्हांपासुन जडवादा विरुद्ध प्रतिपादनावरील त्याच्या लेखांचा भर कमी झाला व या जगाच्या मूळाशीं परमात्मा व त्याचे विचार आहेत अशा प्रकारचें विवेचन जास्त जोरानें पुढें आलें. तसेंच संवेदनाचें सूचकत्व अनुभवानें–संवईनें कळतें असें पूर्वी बार्क्ले प्रतिपादन करीत असे त्याचेऐवजीं सूचकत्व हें परमात्म्याच्या इच्छेचें व विचारशक्तीचें फळ आहे असें तो म्हणूं लागला. सारांश, त्याच्या मध्यकालीन तत्त्वज्ञानमननांत परमात्म्याचें अस्तित्व व त्याचें स्वरूप व त्याच्या शक्ति या गोष्टींचा विचार त्याच्या मनापुढें प्रामुख्यानें येऊं लागला. व म्हणून या काळच्या ग्रंथांत परमात्म्याच्या अस्तित्वाचीं प्रमाणें बार्क्लेनें जास्त जोरानें पुढें मांडलीं. उदाहरणार्थ, या जगाच्या रचनेंत किती चातुर्य व कुशलता भरली आहे. यावरून या जगाचा आदिकर्ता हा कसा सर्व शक्तिमान सर्वज्ञ आहे हें प्रमाण बार्क्लेनें मोठ्या सुंदर रीतीनें आपल्या ग्रंथांत ग्रथित केलें आहे.

त्याचें दुसरें प्रमाण अशा तऱ्हेचें आहे. मनुष्याला स्वतःचा आत्मा इंद्रियांनीं दिसत नाहीं तर त्याची प्रतीती स्वयंस्फूर्तीनें होतें. परंतु मनुष्याला दुसऱ्या आत्म्याचें ज्ञान फक्त अनुमानानें होतें. कारण आत्मा ही प्रत्यक्ष दृश्य वस्तु नाहीं. आतां आपण आपल्या व्यतिरिक्त आत्म्याच्या

अस्तित्वाचें अनुमान कोणत्या खुणांवरून करतो ? आपल्याला इच्छा-शक्ति आहे, आपण कांहीं गोष्टी स्वतः होऊन करूं शकतों; आपली कृत्यें सहेतुक केलेलीं असतात. अशाच तऱ्हेचें वर्तन दुसरे लोक करतांना आपण पाहतों. यावरून ते ज्ञानी व शक्तिमान आत्मे आहेत असें आपण अनुमान करतों. ते दुसरे आत्मे आपल्याला प्रत्यक्ष दिसत नाहींत, पण त्या आत्म्यांच्या अस्तित्वाच्या खुणा आपल्याला ओळखतां येतात. आतां याच तऱ्हेनें सृष्टीच्या मूळाशीं असलेल्या परमात्म्याच्या अस्तित्वाचें आपल्याला अनुमान करतां येतें. सृष्टीचा क्रमही इतर बुद्धिमान मनुष्याच्या वर्तनक्रमाप्रमाणें सहेतुक, बुद्धिपुरस्सर व युक्तीनें व नियमित पणें चाललेला दिसतो. या खुणांवरून आपल्याला सृष्टिकर्त्याच्या कर्तृत्वाबद्दल अनुमान करतां येतें. सारांश जितक्या खातरीपूर्वक व ज्या अर्थानें आपल्याला दुसऱ्यांच्या आत्म्याच्या अस्तित्वाबद्दल ज्ञान होतें तितक्याच खातरीपूर्वक व त्याच अर्थानें आपल्याला परमात्म्याच्या अस्तित्वाचें ज्ञान होतें व जर आपण दुसरे आत्मे प्रत्यक्ष पाहतों असें म्हटलें तर आपण परमेश्वर पाहतो असें म्हणण्यास हरकत नाहीं, कारण दुसरे आत्मे व परमेश्वर हे दोन्ही अमूर्त आहेत व त्या दोघांचें ज्ञान आपल्याला सारख्या तऱ्हेनें होतें. असो.

सारांश, बार्क्लेच्या या मध्यकालीन तत्वज्ञानांत त्याचा भर जड सृष्टीचा अभाव दाखविण्यावर नव्हता. तर त्या तत्वज्ञानाचा भर परमेश्वराचें स्वरूप व त्याचें अस्तित्व हें शाबीत करण्याचा होता व तो बार्क्लेनें चांगल्या रीतीनें पार पाडला.

पुढें दहा वर्षें बार्क्लेनें तत्वज्ञानविषयक ग्रंथ लिहिला नाहीं. त्याचा शेवटला तत्वज्ञानविषयक ग्रंथ 'सांखळी' हा होय. हा बार्क्लेनें आपल्या साठाव्या वर्षीं लिहिला. मागें सांगितल्याप्रमाणें या ग्रंथांत वैद्यकविषयक व तत्वज्ञानविषयक विचारांचें विलक्षण मिश्रण झालेलें आहे. त्यांत डामराच्या सर्वरोगशमनक्षमत्वापासून प्रारंभ करून या विशेषाचें कारण शोधतां शोधतां बार्क्ले सृष्टीच्या मूळाकडे गेला आहे व हें मूळ म्हणजेच सर्वशक्तिमान,

सर्वज्ञ, सर्वगुणवान असा परमेश्वर आहे असें त्यानें प्रतिपादन केलें आहे. सर्व सृष्टि या परमेश्वराच्या इच्छा व बुद्धि यांचा विकास होय. सृष्टीचें इंद्रियांना गोचर होणारें स्वरूप हें खरें स्वरुप नव्हे, तर इंद्रियांनीं दिलेल्या संवेदनांच्या आंत मानवी बुद्धीला पटणारें असें बौद्धिक स्वरूप आहे व हें स्वरूपच खरें होय व हें स्वरूप म्हणजे परमेश्वराचें शाश्वत विचार होत. या ग्रंथांत बार्क्लेच्या मनावर प्लेटो या तत्ववेत्त्याच्या विचारांचा फार परिणाम झालेला आहे असें पदोपदीं दृष्टोत्पत्तीस येते. सारांश बार्क्लेला आतां जगाकडे दोन दर्शनें पहावेंसें वाटे. एक इंद्रियदृष्टि व दुसरी बौद्धिक दृष्टि. व जगाला दोन स्वरूपें आहेत, असें तो आतां प्रतिपादन करूं लागला.

बार्क्लेच्या तत्वज्ञानाचें इतकें विवेचन पुरें आहे. यापेक्षां जास्त खोल पाण्यांत शिरण्यांत अर्थ नाहीं. बार्क्लेच्या तत्वविचारांत एकसारखा बदल होत गेलेला आहे असें वरील विवेचनावरून दिसून येईल. पूर्ववयांत व उमेदींत बार्क्ले हा ज्ञानाच्या स्वरूपासंबंधानें संवेदनावादी ( sensationa-list ) होता व यामुळें तो इंग्रज तत्वज्ञानी लॉक याच्या मताचा अनुवादक होता असें म्हटलें तरी चालेल. या बार्क्लेच्या पूर्ववयांतील तात्विक विचारांच्या पुढची पायरी ह्यूम या तत्वज्ञान्यानें स्वीकारून लॉक व बार्क्ले यांच्या तात्विक विचारांवरून संशयवाद असा निष्पन्न होतो हें दाखविलें म्हणून तत्वज्ञानाचे इतिहासकार लॉक, बार्क्ले व ह्यूम अशी तत्वज्ञान्यांची परंपरा लावतात. बार्क्लेच्या मध्ययुगीन तात्विक विचारांचें साम्य रीड या स्कॉटिश तत्वज्ञान्याच्या विचारांशीं आहे असें दिसतें व त्याच्या उत्तर वयांत तो प्लेटो या तत्वज्ञान्याच्या विचारांच्या नजीक येत चालला होता असें दिसतें. सारांश, बार्क्ले हा आमरणांत तत्वज्ञानाचा विद्यार्थी होता व त्याच्या विचारांची सारखी परिणति होत होती व म्हणून बार्क्लेचें तत्वज्ञान म्हणजे युरोपच्या अर्वाचीन तत्वज्ञानाची लहान आवृत्तिच होय असें म्हटलेलें आहे व त्यांत बराच तथ्यांश आहे असें वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत येईल.

# कँट.

## (१)

## जीवन-वृत्तांत.

मथळ्यांतील नांव वाचतांच माझे वाचक म्हणतील " हे लेखक लागले आपल्या आवडत्या तत्वज्ञानाच्या गोष्टी बोलायला ! कँट मोठा तत्वज्ञानी असेल, पण त्याचें काय आम्हांला ! मराठींतील आध्यात्मिक वाङ्मयाला कंटाळून तर आम्ही अर्वाचीन ललितवाङ्मय करमणुकीकरितां व विश्रांती-करितां वाचायला घेतों. तों येथेंहि आमच्या पाठीस अध्यात्मविद्या आहेच ! त्यांतल्या त्यांत आम्हीं असेंहि ऐकिलें आहे कीं, कँटचें तत्वज्ञान तर फार खोल, फार गूढ आणि अत्यंत दुर्बोध आहे. ज्यांची जन्मभाषा जर्मन, अशा लोकांनासुद्धां कँटचे ग्रंथ समजत नाहींत. ते समजण्यास त्यांना इंग्रजी व फ्रेंच भाषेंतील भाषांतरांची मदत घ्यावी लागते. तेव्हां असलें गूढ, दुर्बोध व कठीण तत्वज्ञान आम्हांला कशाला ? "

यावर माझें असें म्हणणें आहे कीं, कँट हें नांव ऐकल्याबरोबर माझ्या प्रिय वाचकांनीं घाबरून जाण्याचें कारण नाहीं. गुलाब म्हटल्याबरोबर गुलाबाच्या झाडाच्या कांट्यांचीच आठवण कां करावी ? गुलाबाच्या फुलाची आठवण केल्यास व त्या गुलाबाचा सुवास, त्याच्या पानांची सुकुमारता, त्याचा मोहक रंग, यांचा विचार मनांत आणल्यास मनाला आल्हादच होईल. तसेंच या विषयासंबंधींहि होईल अशी मी वाचकांची खातरजमा करतों. कारण, मी या लेखांत कँटच्या तत्वज्ञानाचें फारसें विवेचन करणार नाहीं; केलें तरी कँटच्या तत्वज्ञानरूपी डोहांत मी वाच-

कांना बुडवूं इच्छित नाहीं. फार तर पाऊलभर पाण्यांत वाचकांना नेऊन तेथून मी त्यांना कोरड्या जागेवर आणून सोडीन. या लेखात मला कँटचें मुख्यत: चरित्र सांगावयाचें आहे. आणि जितकें कँटचें तत्वज्ञान नीरस, गूढ व दुर्बोध आहे, तितकेंच त्याचें चरित्र सरस, साधें व सुगम आहे, असें आपल्यास आढळून आल्याखेरीज रहाणार नाहीं.

ज्याप्रमाणें अथेन्सचें नांव काढल्याबरोबर सॉक्रेटिसाची आठवण होते. कारण अथेन्स व सॉक्रेटिस यांमध्यें एक प्रकारची व्याप्ति आहे—सॉक्रेटिसाचें सर्व आयुष्य या एका शहरांतच गेलें,—त्याचप्रमाणें कँट व कानिग्सबर्ज यांचीहि व्याप्ति आहे. मात्र अथेन्स शहर हें सॉक्रेटिसाच्या आधींपासून जगद्विख्यात शहर होतें. परंतु कानिग्सबर्जची तशी स्थिति नव्हती. कँटच्या पूर्वी हें जर्मनींतील विद्यापीठ अगदीं अज्ञात, मागसलेलें आणि एका कोनाकोंपऱ्यांतलें होतें; परंतु कँटच्यामुळें त्याला सरस्वतीमंदिराची पदवी आली व ज्याप्रमाणें एखाद्या पुण्यक्षेत्रीं भाविकांची यात्रा भरावी, त्याप्रमाणें कँट या तत्ववेत्त्याला पाहण्याकरतां युरोपांतील हजारों विद्याभक्त आणि विद्याभाविक लोक त्या ठिकाणीं येऊं लागले.

कानिग्सबर्ज या गांवीं कँटचा जन्म १७२४ च्या एप्रिल महिन्यांत झाला. कँटच्या बापाचा कातड्याच्या वाद्या करण्याचा धंदा होता. त्याची घरची स्थिति फार गरीबीची होती, तरी पण तो मोठा बाणेदार मनुष्य होता. व त्याला आपल्या मतांचा मोठा अभिमान असे. क्रिश्चन धर्मांतील एक पोटभेद भक्तिपथ म्हणून निघाला होता, त्याचा तो अनुयायी होता व या आपल्या मताकरतां तो लोकच्छल सोसण्यासही तयार असे. कँटची आईहि फारच भाविक असे व कँटच्या मनावर तिच्या भक्तिपंथी शिक्षणाचा फार ठसा उमटला होता. कँट आपल्या उतारवयांत सुद्धां आपल्या आईबद्दल मोठ्या प्रेमानें आणि आदरानें बोलत असे. कँटचें सर्व शिक्षण या गांवांतच झालें. कँटच्या तेराव्याच वर्षी त्याची आई आपल्या एका मैत्रिणीची शुश्रूषा करीत असतांना ताप येऊन वारली. कँट आपल्या सोळाव्या वर्षी मॅट्रिक्युलेशन पास होऊन कॉलेजांत गेला.

युनिव्हर्सिटींत त्यानें एकंदर सात वर्षें अभ्यास केला. त्याच्या घरची गरीबी असल्यामुळें त्याचे मित्र त्याला थोडी फार पैशाची व इतर आवश्यक गोष्टींची मदत करीत असत आणि त्याच्या मोबदला कँट हा त्यांना शिकवीत असे. परंतु हे सर्व दिवस त्याला मोठ्या कष्टानेंच काढावे लागले.

१७४६ सालीं, म्हणजे कँटच्या २२ व्या वर्षीं त्याचा बाप वारला, आणि त्यामुळें कँटला आपलें शिक्षण सोडून पोटापाण्याच्या उद्योगाला लागावें लागलें. कँटची मोठी महत्त्वाकांक्षा म्हणजे कॉनिग्सबर्ग विश्वविद्यालयांतील प्रोफेसरची जागा मिळविण्याची होती. परंतु आतां त्याला आपलें शिक्षण अर्धवट टाकून, एका सुखवस्तु कुटुंबांतील खासगी शिक्षकाचा धंदा पत्करावा लागला. या रीतीनें त्यानें नऊ वर्षें काढली, व त्याच्या आयुष्यांतील हा कालच फक्त त्यानें कॉनिग्सबर्गच्या बाहेर घालविला. या काळांत तो तीनचार कुटुंबांत राहिला. १७५५ मध्यें त्यानें एक तात्त्विक विषयावर स्वतंत्र ग्रंथ लिहून डॉक्टरची पदवी मिळविली, व नंतर त्याला कॉनिग्सबर्ग विश्वविद्यालयांत बिनपगारी शिक्षकाची जागा मिळाली. तेव्हांपासून मरेपर्यंत म्हणजे सुमारें सतत पन्नास वर्षें, कँटनें प्रोफेसराचें काम केलें. जर्मन विश्वविद्यालयामध्यें पगारी प्रोफेसराचा दर्जा, पदवी व योग्यता मोठी असे. आपापल्या विषयांत पारंगत अशा लोकांना या जागा मिळत. दुसरा वर्ग बिनपगारी शिक्षकांचा असे. यांना विश्वविद्यालयांतून फक्त शिकविण्याची परवानगी मिळे, परंतु पगार मिळत नसे. विद्यार्थ्यांकडून जी काय फी मिळेल, त्यावरच यांना रहावें लागे. बिनपगारी शिक्षक व प्रोफेसर या दोघांचीं एकाच विषयावर व्याख्यानें होत, व विद्यार्थ्यांना पाहिजे त्या व्याख्यानाना जाण्याची मोकळीक असे. जर्मनींतील एकंदर शिक्षण उच्च दर्जाचें राहण्यास या पद्धतीचा फार उपयोग झालेला आहे. जर्मनींतील विश्वविद्यालयाची युरोपांतील इतर विश्वविद्यालयांच्या वर कमान असण्याचें मुख्य कारण ही पद्धति होय, यांत शंका नाहीं. कारण, या पद्धतीमुळें शिक्षकांच्या दोन्ही वर्गांना आपापल्या विषयाची उत्तम तयारी करावी लागे. बिनपगारी

शिक्षकांचें वेतन मुळीं त्यांच्या व्याख्यानांच्या चांगुलपणावर अवलंबून असे. त्यांचीं व्याख्यानें जर चांगलीं नसतील तर त्यांच्याकडे विद्यार्थी जाणार नाहींत, व त्यांचें वेतन तर मुलांच्या फीवर अवलंबून; तेव्हां त्यांना आपलें बुद्धिसर्वस्व आपल्या विषयावर खर्च करावें लागे. पगारी प्रोफेसरांना मुलांच्या फीवर विसंबावें लागत नसे. परंतु त्यांचा दर्जा व मान मोठा असल्यामुळें तो राखण्याकरितां त्यांनाहि फार मेहनत करावी लागे. कारण जर त्यांचीं व्याख्यानें चांगलीं नसलीं व बिनपगारी शिक्षकांचीं चांगलीं असलीं तर मुलें बिनपगारी शिक्षकांकडे जातील व असें झालें म्हणजे ती प्रोफेसराला कमीपणाची गोष्ट वाटे. या पद्धतीमुळें बिनपगारी शिक्षक व पगारी प्रोफेसर या दोघांनाहि आपापल्या विषयांत फारच पारंगतता मिळवावी लागते. असो.

बिनपगारी शिक्षक या नात्यानें कँटनें सुमारें पंधरा वर्षें काढल्यानंतर १७७० सालीं त्याची महत्त्वाकांक्षा पुरी झाली. त्याला तत्त्वज्ञानाच्या प्रोफेसराची फार मोठ्या मानाची जागा मिळाली, व त्या जागेवर तो मरेपर्यंत होता. दुसऱ्या युनिव्हर्सिटीमध्यें त्याला प्रोफेसरांच्या जागा देऊं केल्या होत्या, परंतु त्यानें आपली युनिव्हर्सिटी सोडली नाहीं, व तेथली जागा कमी पगाराची असतांना तेथेंच राहणें त्याला बरें वाटलें.

कँटचें सर्व आयुष्य अध्ययन, अध्यापन आणि लेखन यांमध्येंच गेलें. यामुळें त्याच्या आयुष्यामध्यें किंवा चरित्रामध्यें वैचित्र्य किंवा निरनिराळे प्रसंग नाहींत, हें खरें आहे. त्याचा आयुष्यक्रम अगदीं आपल्या इकडल्या ऋषींसारखा होता. कारण, कँट संसारपाशांत पडला नाहीं. प्रथमतः त्याची फार गरिबी होती, व कुटुंबपोषण करण्यासारखी पैशाची स्थिति नव्हती. यामुळें त्यानें लग्न केलें नाहीं. पुढें चांगली स्थिति आल्यावर त्याला लग्न करतां आलें असतें, व एका बाईवर कँटचें मनहि गेलें होतें; परंतु त्या बाईनें दुसऱ्या एका गृहस्थाशीं लग्न केल्यामुळें कँटचा बेत तसाच राहिला. पुढें आपले लग्नाचे दिवस निघून गेले, असें समजून कँट ब्रह्मचारीच राहिला. कँटच्या या एकलकोंड्या आयुष्याबद्दल

गांवांतील लोकांना त्याची कींव येत असे, व त्या शहरांतील एका साध्याभोळ्या उपाध्यायाला त्याची कींव येऊन त्यानें एक संभाषणात्मक लेख छापला व त्यांत गृहस्थाश्रम स्वीकारणें हें प्रत्येक माणसाचें कर्तव्य आहे, व गृहस्थाश्रम हा फार सुखदायी आश्रम आहे असेंहि प्रतिपादन करून कँटला लग्न करण्याचा आग्रह केला होता. हा लेख वाचून वृद्ध कँटला उपाध्यायाच्या आग्रहाचें हंसू आलें. कँटनें छापण्याचा खर्च त्या उपाध्यायाला दिला व विनोदाची गोष्ट म्हणून तो ही हकीकत आपल्या स्नेही मंडळीला सांगत असे.

परंतु आपल्या ब्रह्मचर्याबद्दल स्तोम माजविलेलें त्याला आवडत नसे. त्याचा बहुतेक वेळ शिकणें, शिकविणें व लिहिणें यांत जात असे. यामुळें त्याला पुढें लग्नाची आवश्यकता भासली नाहीं. शिवाय, कँट-सारख्या विद्वान् व बहुश्रुत तत्वज्ञान्याला योग्य अशी स्त्री मिळणेंहि कठिणच होतें. परंतु यावरून कँट हा एकलकोंडा होता, किंवा त्याला एकलकोंडा आयुष्यक्रम आवडत असे अशांतला प्रकार नाहीं. त्याला स्नेही–सोबत्यांची फार हौस असे, व त्याला सुस्थिति आल्यावर व त्यानें बिऱ्हाड केल्यावर तो रोज आपल्या पंक्तीला आपल्या मित्रमंडळींतील शेलक्या लोकांना जेवावयास बोलवीत असे. केव्हांकेव्हां वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांनाहि तो जेवावयास बोलवीत असे. कँटला संभाषणाची कला फार चांगली आवगत असे, व त्याला संभाषणाची कलाहि फार उत्तम साधलेली असे. शिवाय त्याचे संभाषण मनोवेधक असून त्यांत विषयवैचित्र्यहि फार असे. पुष्कळ लोकांच्या संभाषणांत त्यांच्या नेहमीच्या व्यवसायाचे घोडें सारख पुढें यावयाचें. हा दोष कँटच्या संभाषणांत केव्हांहि नसे. तो तत्वज्ञानासंबंधीं केव्हांही संभाषण करीत नसे; कारण, तो म्हणे, संभाषणाचा तो विषय नव्हे. कँट फारच बहुश्रुत होता; तो प्रत्येक माणसा-जवळ त्याच्या आवडत्या विषयावर बोले; व त्याच्याकडून माहिती काढून घेई; आणि आपल्याला असलेली माहिती सहजगत्या

दुसऱ्याला करून देई. यामुळें कँटच्या घरीं जेवावयास जाणें म्हणजे भाग्याचें आहे असें सर्वांना वाटे.

कँट हा फार नियमितपणें चालणारा मनुष्य असल्यामुळें व त्याचा व्यवसायहि वैचित्र्यविहीन असल्यामुळें कँटच्या आयुष्याचें चित्र रेखाटणें सोपें आहे. कारण, एक दिवसाचा क्रम तोच आठवड्याचा, तोच महिन्याचा व तोच वर्षाचा. हा त्याचा नियमितपणा आश्चर्य करण्यासारखा होता. त्याचीं सर्व कामें घड्याळाप्रमाणें चालत असत. त्याच्या दिनचर्येचें खालील वर्णन त्याच्या चरित्रकारांनीं दिलेलें आहे.

पहाटेला पांच वाजायला पांच मिनिटें कमी असतांना कँटचा नोकर लँपी हा कँटच्या खोलींत शिरावयाचा व " प्रोफेसरसाहेब, वेळ झाली " असें म्हणावयाचा. या हाकेला कँट कधींहि न चुकतां ओ द्यावयाचा, व पांच मिनिटांत तो आपल्या बसावयाच्या खोलींत यावयाचाच. न्याहारीला तो चहाचा एक पेला—कधीं कधीं नकळत दोन तीन पेलेहि घेत असे—व तंबाकूची एक विडी घेई. ५ पासून ७ वाजेपर्यंत तो व्याख्यानाची तयारी करी. ७ वाजतां तो आपल्या शिकवावयाच्या वर्गांत जाई व तेथून ९ वाजतां परत येई. तेव्हांपासून पाऊण वाजेपर्यंत तो आपल्या लेखनव्यवसायांत गुंतलेला असे. पाऊण वाजतां 'पाऊण झाला' असें म्हणून आपल्या स्वयंपाकिणीला हांक मारी, व त्याबरोबर स्वयंपाकीण दारूचा पेला घेऊन येई. जेवणाचें पहिलें वाढप झाल्यावर कँट हा पेला पीत असे. त्याच्या आयुष्याच्या शेवटचीं पचवीस वर्षे—( जेव्हां त्याचें स्वतंत्र घर असे ) त्याच्याबरोबर नेहमीं पाहुणे जेवावयास असत. पाहुणे दोहोंपेक्षां कमी नसत व पांचापेक्षां जास्त नसत. या पाहुण्यांना जेवणाच्या दिवशींच्या सकाळीं बोलावणें पाठविलें जात असे. एकदम बोलावणें करून ठेवणें त्याला आवडत नसे, किंवा आधींपासून केलेलेंहि आवडत नसे; परंतु कँट आपल्या पाहुण्यांपासुन एका गोष्टीची अपेक्षा करी, व ती म्हणजे नियमितपणा ही होय ! सर्व पाहुणे जमले, म्हणजे लँपी जेवणाच्या तयारीची वर्दी देई. हवेबद्दल बोलत बोलत सर्व मंडळी

जेवणाच्या जागीं जमे. कँट आपला रुमाल बाहेर काढून सर्वांना सुरुवात करण्यास सांगे, व आपणहि जेवावयास सुरुवात करी. जेवण बहुधा तीन वाढी असे, व तें सुमारें तीन व केव्हां केव्हां चार तासहि चाले. जेवणाच्या वेळीं पुष्कळ वेळां राजकीय विषयांवर संभाषण होई. कँट हा वर्तमानपत्रांचा मोठा भोक्ता होता, व वर्तमानपत्रें आणणाऱ्या पोस्टाकडे मोठ्या आस्थेनें त्याचे डोळे लागलेले असत. त्या वेळीं युरोपांत फ्रान्समधल्या राज्यक्रांतीची खळबळ चालू असे, व त्याच्या आधीं अमेरिकेंतील स्वतंत्रतेकरितां युद्ध झालें, त्याची खळबळ चालू असे. कँटचा ओढा नेहमीं स्वातंत्र्याकडे व प्रजापक्षाकडे असे. जेव्हां फ्रान्समध्यें प्रजासत्ताक राज्य स्थापन झाल्याची बातमी त्यानें ऐकली, तेव्हां तो म्हणाला, " आज माझ्या डोळ्यांचें पारणें फिटलें ! आतां मी सुखानें मरेन ! "

जेवण आटोपल्यावर म्हणजे ४ वाजल्यानंतर कँट फिरावयास निघे. पहिल्यांदा तो इतर लोकांबरोबर फिरावयास जाई, पण पुढें पुढें तो एकटा फिरावयास जात असे. कारण नाकांतून श्वासोच्छ्वास केल्यानें रोगजंतु पोटांत जाणार नाहींत, असें त्याला वाटे. व म्हणून तो फिरतांना व बोलतांना तोंड मिटून चालत असे. त्याचा दुसरा एक नियम असे, तो हा कीं, केव्हांही अंगाला घाम येतां कामा नये कँट हा नाजूक प्रकृतीचा होता; धट्टाकट्टाही नव्हता, किंवा तो नेहमीं आजारी असें, असेंही नाहीं. तरी पण खाण्यापिण्यासंबंधीं व वागण्यासंबंधीं बातावेतानें राहून तो इतकीं वर्षे जगला. रपेट करून आल्यावर बारीकसारीक कामें करावयाचीं, नवीन पुस्तकें चाळावयाचीं व वर्तमानपत्रें पहावयाचीं, काळोख पडल्यावर तो आपल्या आवडत्या विषयावरील प्रश्नासंबंधीं विचार करीत बसे. रात्रीं दहांच्या सुमाराला तो निजावयास जाई. ही त्याची दिनचर्या दिवसानुदिवस, मासानुमास व वर्षानुवर्षे चाले.

त्याच्या या व्यवसायासंबंधीं एक मजेदार गोष्ट सांगतात. कँट हा आपल्या अभ्यासाच्या खोलींत बसून विचार करी व मनाची एकाग्रता होण्याकरतां आपल्या खिडकींतून दिसणाऱ्या एका देवळाच्या मनोऱ्या-

कडे पहात असे. त्या मनोऱ्याच्या टोंकाकडे दृष्टि दिली, म्हणजे त्याचें चित्त एकाग्र होऊन त्याची विचारशक्ति चांगली चाले. परंतु कँटच्या शेजाऱ्याच्या बागेंत पॉपलर नांवाचे वृक्ष होते, ते वाढत वाढत जाऊन एके दिवशीं तो मनोरा कँटच्या दृष्टिआड झाला. या आडकाठीनें कँटच्या चित्ताची एकाग्रता न साधून त्याच्या विचाराच्या व्यवसायांत व्यत्यय येऊं लागला. आपल्याला यामुळें कांहीं सुचत नाहीं असें कँट आपल्या मित्राजवळ बोलला. त्या मित्रानें ही अडचण त्या शेजाऱ्याला सांगितली.शेजारी चांगला भला मनुष्य होता व त्याला कँटबद्दल आदरहि होता.तेव्हां त्यानें आपलीं पॉपलर झाडें छाटून टाकलीं व कँटला तो मनोरा पुनरपि दिसूं लागला, आणि तेव्हांपासून त्याच्या विचारांचें काम पुनः निर्वेधपणें चालू झालें!

त्याच्या असल्याच संवयीची आणखीहि एक गोष्ट सांगतात. कँट वर्गांत व्याख्यान देतांना बहुधा एका विवक्षित मुलाकडे पहात असे व विशेषतः त्याच्या एका बटणाकडे पहात राही; परंतु एके दिवशीं त्या मुलाच्या कोटाचें बटन पडून गेलें व त्या दिवशीं कँटच्या व्याख्यानाचा अगदीं घोंटाळा झाला. त्याला नेहमीं प्रमाणें बोलतां येईना व क्रमवार विचार सुचेनात!

कँटचे मुख्य व्यवसाय दोन, हें वर सांगितलेंच आहे. एक लेखन व दुसरा अध्ययन. कँट हा फार मोठा तत्त्वज्ञानी होऊन गेला, अशी जरी त्याची कीर्ति आहे तरी तो मारूनमुटकून तत्वज्ञानी झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण लहानपणापासून त्याचे आवडते विषय म्हणजे गणित व आधिभौतिक शास्त्रें हे होते. अगदीं लहानपणापासून त्याला न्यूटनच्या ग्रंथांचा फार नाद लागलेला होता. तत्वज्ञानाकडे त्याचें लक्ष्य मागाहून गेलें व हाच विषय शेवटीं त्याचा मुख्य विषय बनला. पण कँट हा केव्हांहि घटपटाची खटपट करणारा तत्वज्ञानी बनला नाहीं. त्याच्या अंगीं बहुश्रुतपणा व विषयवैचित्र्याची अभिरुचि शेवटपर्यंत कायम राहिली. त्याचे ग्रंथ व लेख निरनिराळ्या विषयांवर आहेत. तो मासिक पुस्तकांत

प्रचलित विषयांवर लेख लिहीत असे. त्याच्या लेखांची भाषा दुर्बोध नसे. त्याचे कांहीं कांहीं लेख तर फारच मनोरंजक व विनोदानें भरलेले आहेत.

जरी कँटचे तत्वज्ञानविषयक ग्रंथ फार दुर्बोध असले तरी तो शिक्षक या नात्यानें फार चांगला वक्ता असे. नवीन मुलांच्या मनांत विषय भरवुन देण्याचें कसब त्याला चांगलें साधलेलें होतें. तो वर्गांत जणू काय एखाद्या तत्वज्ञानविषयक विचारसरणीचा प्रयोग करून दाखवी. प्रत्यक्ष माहिती सांगण्यापेक्षां विद्यार्थ्यांना तो विचार करण्यास शिकवी, असें म्हणणें जास्त बरोबर होईल. तसेंच विषयाचें विवेचन करतांना तो दाखले, उदाहरणें, गोष्टी इत्यादि सांगे. यामुळें त्याचें व्याख्यान फार मनोरंजक होई. मागें सांगितलेंच आहे कीं, तो निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानमाला चालू करीत असे. कांहीं विषयांवरील त्याचीं व्याख्यानें फारच लोकप्रिय असत. भूगोलविषयक पदार्थविज्ञानशास्त्र हा विषय त्याचा हातखंडा असे व गांवांतील प्रौढ गृहस्थ, सैन्यांतील अधिकारी, व्यापारी वगैरे लोक सुद्धां कँटचीं हीं व्याख्यानें ऐकावयास येत असत. तसेंच पदार्थविज्ञानशास्त्र, किंवा ज्याला अर्वाचीन काळीं समाजशास्त्र म्हणतात, त्याविषयावरील कँटची व्याख्यानमालाही फार लोकप्रिय असे. कारण तो प्रत्येक विषयाची संपूर्ण माहिती मिळवून तिचें आपल्या मनाशीं तादात्म्य करून घेई. यामुळें त्याचें ज्ञान अगदीं सत्यमय असे, व म्हणून त्याचा ठसा दुसऱ्याच्या मनावर तो बरोबर बठवून देई.

इ. स. १७५५ मध्यें लिसबन शहरीं फार मोठा धरणीकंप झाला. त्याबरोबर या विलक्षण सृष्टिचमत्काराची माहिती देण्याकरतां कँटनें एक उत्तम लेख 'धरणीकंप' या विषयावर लिहिला व त्यांत यासंबंधाची उपलब्ध माहिती व या चमत्काराची उपपत्ति यांचें सुरस विवरण केलें. १७६० च्या सुमारास स्वीडनबार्ज नांवाचा मनुष्य प्रसिद्धीस आला. आपल्याला अतींद्रियज्ञान आहे व आपल्याला मेलेल्यांच्या आत्म्यांशीं संभाषण करतां येतें, असें तो म्हणे. कँटला या विषयासंबंधीं माहिती मिळविण्याची इच्छा झाल्यामुळें त्यानें स्वीडनबार्जच्या ग्रंथावर सात पौंड

खर्च केले व आपल्या स्नेह्यांच्या आग्रहावरून त्यानें यासंबंधीं एक सुरेख ग्रंथ लिहिला. या ग्रंथांत त्यानें शास्त्राय तत्त्वांवर,अशा गोष्टींचें ज्ञान मानवी शक्तीच्या बाहेर आहे, असें आपलें मत प्रतिपादन केलें. यावरून कँट हा फार बहुश्रुत होता, असें दिसून येईल.

कँटमध्यें इतका बहुश्रुतपणा येण्याचें कारण त्याची वाचनाभिरुचि तर खरी, परंतु त्याची कल्पकता व कल्पनाशक्ति या फार दांडग्या होत्या; यामुळेंच त्याला इतक्या विषयांचें सोपपत्तिक व साग्र ज्ञान मिळवितां आलें. त्याची कल्पनाशक्ति केवढी दांडगी होती, याचा प्रत्यय खालील दोन गोष्टींवरून चांगला येतो.

डी क्केन्सी या इंग्रज ग्रंथकारानें या गोष्टीचें मोठ्या विरोधाभासानें वर्णन केलें आहे. तो म्हणतो:–" कँटनें एकही पुस्तक आजन्मांत वाचलें नाहीं, असें मी बेलाशक विधान करतों व हें माझें म्हणणें मी शाबीतही करतों ! सकृद्दर्शनीं हें विधान अगदीं खोटें दिसतें. ज्याची बहुश्रुतपणाबद्दल इतकी ख्याति, तो मनुष्य एकही पुस्तक वाचीत नाहीं, हें संभवनीय तरी कसें होईल? परंतु कँट हा समग्र पुस्तक केव्हांहि वाचीत नसे, हें अगदीं खरें आहे ! कोणतेंहि पुस्तक असलें म्हणजे तें आपलें शब्दशः वाचीत जावयाचें, अशी त्याची रीत नव्हती. तर मधूनमधून तो पुस्तक वाची, कांहीं भाग वाचला म्हणजे त्यापुढें ग्रंथकारानें काय लिहिलें असलें पाहिजे, हें तो आपल्या कल्पनेनें जाणून तो भाग टाकून पुढें जाई. सारांश, तो पुस्तकांतील एकंदर मतलब व नवे विचार तेवढे ध्यानांत धरी; बाकी विषयाचा आपल्या पूर्वीच्या ज्ञानावरून तो अंदाज करी, परंतु अशा अर्धवट वाचनानें त्याचें ज्ञान अर्धवट होई, असें मात्र नाहीं. तो पूर्वी ठाऊक असलेली माहिती वाचण्यांत वेळ घालवीत नसे, इतकेंच. या त्याच्या वाचनपद्धतीमुळें त्याला बहुश्रुतपणा व विषयवैचित्र्याभिरुचि हीं मिळवितां आलीं."

दुसरी त्याच्या कल्पनेची गोष्टही आश्चर्य करण्यासारखी आहे. मागें सांगितलेंच आहे कीं, कँट हा आपलें गांव सोडून क्वचितच जात असे,

त्यानें कानिग्सबर्गपासून समुद्र जवळ असतांना सुद्धां समुद्र आजन्मांत पाहिला नव्हता ! तरी पण त्याला भूगोलाचें ज्ञान फारच असे व त्याची कल्पनाशक्ति इतकी तीव्र होती कीं तो आपल्या कल्पनेनें सर्व विषयांचें स्वरूप आपल्या मनापुढें उभें करीत असे व यामुळें तो हुबेहूब वर्णन करूं शके. एका व्याख्यानांत कँट हा इंग्लंडमधील वेस्टमिनिस्टर पुलाची माहिती सांगत होता. ती माहिती सांगत असतांना त्यानें त्या पुलाचें अगदीं हुबेहूब वर्णन केलें. त्या व्याख्यानाला एक इंग्रज गृहस्थ हजर होता. व्याख्यानाच्या शेवटीं त्यानें कँटची मुलाखत घेतली व "आपण इंग्लंडांत किती वेळ गेलां होतां ?" असें त्यानें त्याला विचारलें. त्यावर "आपण इंग्लंड पाहिलेंही नाहीं," असें त्यानें उत्तर दिलें. हें ऐकून तो इंग्रज गृहस्थ थक्क झाला. त्याला कांहीं तें खरें वाटेना ! कँट जी जी माहिती ग्रंथांवरून व प्रवासवृत्तावरून मिळवी, तिच्याशीं तो आपल्या मनाचें तादात्म्य करून घेई व त्याचें बरोबर स्वरूप मनांत ठेवी. या कल्पनाशक्तीमुळें त्याचीं भूगोलविषयक व्याख्यानें इतकीं उत्तम वठत असत. वास्तविक पाहतां भूगोलविषयक पदार्थविज्ञानाला प्रत्यक्ष अवलोकन जास्त पाहिजे. तसेंच लोकांच्या चालीरिती, मनुष्यांच्या प्रकारांचें वर्णन, मनुष्यांतील वर्णभेद वगैरे समाजशास्त्रीय गोष्टींना अवलोकन व प्रवासाची जास्त जरूर आहे. कँट हा प्रवासी नसतांना सुद्धां या दोन विषयांत त्याचा हातखंडा असे.

जरी कँट कधीं प्रवास करीत नसे, तरी त्याची अवलोकनशक्ति सूक्ष्म होती, यांत शंका नाहीं. त्यानें 'सौंदर्य व भव्यता' या विषयावर १७६४ मध्यें एक उत्तम निबंध लिहिला. तो भाषेच्या व मनोरंजकतेच्या दृष्टीनें त्याच्या उत्तम ग्रंथांपैकीं एक आहे. यांमध्यें कँटची सूक्ष्म अवलोकनशक्ती चांगली दिसून येते.

येथपर्यंत कँटच्या बहुश्रुतपणाचें थोडक्यांत विवरण केलें, परंतु कँटची कीर्ति मुख्यतः त्याच्या तत्वज्ञानविषयक ग्रंथांवरून झालेली आहे. त्याच्या तात्विक व इतर ग्रंथांविषयींचें थोडक्यांत विवेचन पुढें करावयाचें आहे.

येथें त्याच्या विचारांचा एकंदर युरोपवर कसा परिणाम झाला, एवढें सांगणें अवश्य आहे; तथापि तें करण्यापूर्वी त्याच्या राहणींतील व त्याच्या विशेष संवयींतील एकदोन गोष्टी सांगून हा विषय संपवूं.

कँटला आपल्या नित्य व्यवहारांत व नियमितपणांत व्यत्यय आलेला कधींच सहन होत नसे. एकदां कँट एका मोठ्या सरदाराच्या अत्याग्रहावरून त्याच्या गाडींतून बाहेर गेला; परंतु त्यामुळें त्याला त्या सरदाराच्या तब्येतीप्रमाणें गाडींतून सावकाश व लांब वळसे घेऊन जावें लागलें, व तेणेंकरून त्याच्या ठरलेल्या कार्यक्रमांत बिघाड झाला. तेव्हांपासून कँटनें असा नियम केला, कीं, ज्या गाडीवर आपली पूर्णपणें हुकमत नाहीं, त्या गाडींत कधींही बसावयाचें नाहीं !

कँट बारिकसारिक गोष्टीकडेहि लक्ष्य देत असे. त्याच्या खोलींतील व्यवस्थेंत फरक झालेला त्याला चालत नसे. तसेंच, नोकराकडून बरोबर काम झालेंच पाहिजे, अशी त्याची सक्ती असे. त्याचा नोकर लँपी हा जरा शिथिल स्वभावाचा होता; परंतु तो कँटची तरतूद नीट राखीत असे. पुढें पुढें तो फारच अनियमित बनला व त्यामुळें कँटला त्याला काढून टाकावें लागलें.

कँटला शब्दांचे उच्चार व नांवाचे उच्चार कोणीं चुकीचे केल्यास तें मुळींच खपत नसे. परंतु लँपी तर मृत्पिंडबुद्धि असल्यामुळें तो अशा चुका नेहमीं करी, व कँट त्याला पढवीत असे. त्यामुळें कँटकडे येणाऱ्या पाहुण्यांस एक प्रकारचा फार्स नेहमीं पहावयास सांपडे. कँटकडे हार्टंगचें वर्तमानपत्र नेहमीं येत असे; परंतु लँपी या नांवाबद्दल नेहमीं चूक करी. लँपी म्हणे " प्रोफेसरसाहेब हें हार्टमनचें वर्तमानपत्र घ्या. " यावर कँट म्हणें " काय ? तूं काय म्हणतोस ? हार्टमनचें वर्तमानपत्र ? मी तुला सांगतों, हार्टमन नव्हे, हार्टंग ! आतां माझ्याप्रमाणें म्हण पाहूं—हार्टमन नव्हे हार्टंग " लँपी एकाद्या फलटणींतील शिपायाप्रमाणें एकसारख्या स्वरानें ते शब्द उच्चारी. त्याच्याकडून कँट असें त्रिवार म्हणून घेई, व ज्या ज्या वेळीं तें वर्तमानपत्र ( आठवड्यांतून दोनदां ) येई, त्या त्या

वेळीं लँपीनें हटकून ही चुकी करावयाची, व कँटनें त्याचेकडून संथा घेववावयाची ! हा क्रम कित्येकतरी वर्षे चालला होता. तरी शेवटपर्यंत लँपीच्यानें चूक सुधारली नाहीं व कँटलाहि या संथा देण्याचा कंटाळा आला नाहीं.

आतां कँटच्या चरित्रांतील बाह्यांग सोडून अंतरंगाकडे वळूं या. कारण कँटचें सर्व चारित्र मुळीं चिन्मय आहे त्याचें अवतारकार्य मनुष्यामध्यें विचारक्रांति करण्याचें होतें, व तें त्याच्या लेखांनीं पूर्णपणें घडवून आणलें. कँटला सत्यज्ञानाची फार आवड होती. लोकांमधील अंधश्रद्धा नाहींशी होऊन लोक विचारी व सदाचरणी व्हावे, असाच त्याचा हेतु होता. त्याच्या नीतिविषयक ग्रंथांचा परिणाम लोकमतावर फारच झाल च-काळीं युरोपमध्यें सुखलालसा व विषयसुखेच्छा फार झाली होती, मनुष्याची इतिकर्तव्यता म्हणजे सुख मिळविणें, अशा प्रकारचे विचार फार पसरलेले होते. त्याविरुद्ध कँटच्या लेखांचा रोंख होता. मनुष्यानें सुखेच्छा सोडून सदसद्विवेकबुद्धीप्रमाणें करावें, असें कँटचें मत होतें. कर्तव्य कर्तव्यबुद्धीनें केलें पाहिजे, हीच मानवी इतिकर्तव्यता, असें तो प्रतिपादन करीत असे,व कँटचा आयुष्यक्रम या त्याच्या मताप्रमाणेंच असे. ' बोले तैसा चाले ' या कोटींपैकीं कँट हा होता. त्याला भित-रेपणा हा ठाऊकच नव्हता ! जें आपल्याला योग्य वाटेल तें स्पष्टपणें बोलण्यास व लिहिण्यास तो कधींच कचरत नसे. ईश्वरावर त्याचा भरंवसा होता, परंतु कर्मकांडावर त्याचा मुळींच विश्वास नसे. तो प्रार्थनां-मांदिरांत प्रार्थनेला कधींहि जात नसे. रेक्टर या नात्यानें त्याला कॉलेजां-तील विद्यार्थ्यांना मंदिरांत न्यावें लागे, त्या वेळीं तो मंदिराच्या दारापर्यंत विद्यार्थ्यांना घेऊन जाई व स्वतः तेथूनच परत जाई. त्याच्या मताप्रमाणें मनुष्याची सर्व वागणूक हीच मुळीं प्रार्थना होय. मनुष्यानें सर्व व्यवहा-रांत आपलें कर्तव्य बजावलें, म्हणजे ईश्वराची खरी भक्ति झाली, असें तो समजत असे.

कँटच्या असल्या धर्ममतांबद्दल व तीं मतें एका ग्रंथांत प्रतिपादन

केल्याबद्दल कँटवर जर्मनसरकारचा रोष झाला. कँटनें आपल्या वर्तनानें आपल्या मताचें समर्थन केलें; परंतु सरकारच्या मर्जीखातर महाराजांचा राजनिष्ठ प्रजाजन या नात्यानें मी यापुढें या विषयावर लिहिणार नाहीं व बोलणार नाहीं, असें त्यानें लिहून दिलें. 'महाराजांचा राजनिष्ठ प्रजाजन' म्हणजे 'त्यावेळच्या राजाच्या हयातींपर्यंतचें आपलें अस्तित्व' असा कँटनें अर्थ मनांत धरला होता, व त्या राजाच्या मरणानतर त्यानें धर्मविषयक एक ग्रंथ प्रसिद्ध केला. याप्रसंगीं कँटच्या हातून चूक झाली, असें म्हणणें भाग आहे. या वेळीं **'नरो वा कुंजरो वा'** अशाच प्रकारचें कँटचें वर्तन झालें, असें म्हणणें प्राप्त आहे. जो गृहस्थ आपल्या लेखणींत व लेखांत इतका विलक्षण धीट होता, तोच राजापुढें भ्याला, असें याप्रसंगीं वाटल्याखेरीज रहात नाहीं. परंतु **'एको हि दोषो गुणसंन्निपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः'** या न्यायानें कँटच्या एकंदर उदात्त चरित्रांत हा एक कमीपणा पार नाहींसा होतो. कँट इ. १८०४ मध्यें मृत्यु पावला.

( २ )

# कँटच्या पूर्वीचें तत्त्वज्ञान.

कँट आपल्या इच्छेविरुद्ध नाइलाजानें तत्त्वज्ञानी बनला, असें म्हटलें तरी चालेल. कॉलेजमध्यें त्याचे आवडते विषय म्हणजे गणित, ज्योतिष-शास्त्र व इतर आधिभौतिक शास्त्रें. त्यानें इंग्लंडांतला प्रसिद्ध गणिती व ज्योतिषी न्यूटन याच्या ग्रंथांचें आस्थेनें व काळजीपूर्वक अध्ययन केलें होतें; नव्हे त्यानें आकाशांतील तारागणांसंबंधीं एक ग्रंथ लिहून त्यांत सूर्यमालेच्या उत्पत्तीची न्यूटनच्या आकर्षणतत्त्वाच्या आधारें एक उपपत्ति बसविली होती. त्याचे काळीं सर्व आधिभौतिक शास्त्रांची झपाट्यानें वाढ होत होती व कँटनें या सर्व शास्त्रांतील नवीन शोधांची माहिती करून घेतली होती. गणितशास्त्राचे सिद्धांत व आधिभौतिक शास्त्रांतील नियम हेंच काय तें सत्यस्वरूप व खात्रीचें मानवी ज्ञान होय अशी कँटची समजुत होती. कारण हें सर्व ज्ञान अनुभवाच्या व संवेदनांच्या आधारावर उभारलेलें असल्यामुळें त्याचा पाया भरभक्कम आहे असें कँटला वाटे. कॉलेजांत असतांना कँटनें जर्मन युनिव्हर्सिटींत शिकविलें जाणाऱ्या तत्त्वज्ञानाचाही अभ्यास केला होता. प्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञानी लेबनिटझ याच्या तत्त्वज्ञानविषयक विचारांना व्यवस्थित पण संकुचित सूत्रमय असें स्वरूप वुल्फ या तत्त्वज्ञान्यानें दिलें होतें; तें तत्त्वज्ञान कँटच्या वेळीं त्याचे युनिव्हर्सिटींत शिकविलें जात असे व म्हणूनच युनिव्हर्सिटींत असतांना कँटला तें शिकावें लागलें होतें. पण या तत्त्वज्ञानाबद्दल त्याला फारशी खात्री वाटत नसे. हें तत्त्वज्ञान कच्च्या पायावर उभारलेलें आहे असें त्याला वाटे. सारांश, तरुण वयांत कँटचा सर्व भर आधिभौतिक ज्ञानावर होता. मानवी ज्ञानांत जर कोणतें ज्ञान निश्चित, त्रिकालाबाधित व सर्वथा सत्यमय

असेल तर तें अनुभव व संवेदना यांनीं दिलेलें आधिभौतिक शास्त्रांतलि ज्ञान होय अशी त्याची दृढ श्रद्धा होती. अशा मनःस्थितींत असतां इंग्रजी तत्ववेत्ता ह्यूम याचे संशयवादी ग्रंथ कँटचे हातीं पडले. ह्यूमनें आपल्या ग्रंथांत अनुभव व संवेदन या ज्ञानाच्या आधाराचे दोष दाखवून मानवी प्राण्याला कोणतेंहि ज्ञान शक्य नाहीं व म्हणून संशयवाद शेवटीं शिल्लक राहतो असें प्रस्थापित केलें होतें. हे ग्रंथ वाचून ' आपण श्रद्धेच्या झोंपेतून जागे झालों ' असें कँटनें म्हटलें आहे. मानवी प्राण्याला ज्ञान मिळविणें शक्य आहे व गणितशास्त्र व आधिभौतिक शास्त्रें यांमध्यें सत्य ज्ञान आहे अशी कँटची मनोदेवता त्याला सांगत होती. ह्यूमचें म्हणणें खरें धरलें तर सर्व ज्ञान टाकाऊ ठरतें. तेव्हां हें गौडबंगाल काय आहे; तत्त्वज्ञान्यांची कोठें तरी मोठी घोडचूक होत असावी; तेव्हां ती घोडचूक शोधून काढणें—गणित व आधिभौतिक शास्त्रांच्या समर्थनार्थ तरी—आवश्यक असें कँटला वाटून त्यानें तत्त्वज्ञानाचा प्रश्न हातीं घेऊन त्याचा आरंभापासून तलास लावण्याचा विडा उचलला व त्याचेंच फल म्हणजे कँटचें परीक्षणात्मक तत्त्वज्ञान होय. म्हणूनच कँटचें तत्त्वज्ञान समजण्यास युरोपच्या अर्वाचीन काळच्या तत्त्वज्ञानाच्या इतिहासाची थोडीशी तरी माहिती असणें अवश्य आहे. तरी या तत्त्वज्ञानाचें येथें किंचित् सिंहावलोकन करूं.

युरोपांतल्या अर्वाचीन युगाला, विद्येच्या पुनरुज्जीवनापासून सुरवात झाली. त्या पूर्वींच्या काळाला मध्ययुग किंवा अज्ञानयुग म्हणतात. या विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या योगें युरोपांत सर्व शास्त्रांची झपाट्यानें प्रगति होऊं लागली, त्याप्रमाणें तत्त्वज्ञानाचाही उद्भव झाला. मनुष्याला ज्ञान मिळणें शक्य आहे काय ? हाच तत्त्वज्ञानाचा मुख्य प्रश्न पुढें आला. कारण मध्ययुगीन कल्पनेप्रमाणें बायबल व पाद्र्यांनीं मान्य केलेले इतर ग्रंथ यांपलीकडे ज्ञानच नाहीं; मानवी बुद्धीचें काम म्हणजे या ग्रंथांचें विवेचन करणें इतकेंच आहे; मानवी बुद्धीला नवीन ज्ञान होणें शक्य नाहीं, अशी मध्ययुगीन लोकांची समजूत होती. विद्येच्या पुनरुज्जीवनानें या समजुतीला जबरदस्त धक्का बसला व म्हणूनच मानवी ज्ञानाचा प्रश्न

महत्त्वाचा बनला. या मानवी ज्ञानाची मीमांसा बेकन व डेकार्ट या दोन तत्त्वज्ञान्यांनीं निरनिराळ्या तऱ्हेनें केली.

बेकन संवेदनावादाचा जनक बनला. त्याचें मतें मनुष्याचें सर्व ज्ञान त्याला इंद्रियद्वारां होतें. बाह्य पदार्थांचें प्रतिबिंब आपल्या इंद्रियांवर पडतें. इंद्रियें मनावर संवेदना उत्पन्न करतात व या संवेदनांनीं सत्य ज्ञान होतें. मानवी मन हें आरशासारखें आहे. आरसा ज्याप्रमाणें स्वच्छ व मलरहित असला म्हणजे त्यावर पदार्थाचें प्रतिबिंब यथार्थ उठतें, त्याचप्रमाणें मनामध्यें पूर्वग्रह-कल्पनाशक्तीनें किंवा केवल विवेकानें उभारलेले विचार-नसलें म्हणजे संवेदनांचा ठसा मनावर यथार्थ उमटतो. तरी सृष्टिज्ञानाला शुद्ध व निर्विचार मन पाहिजे. मानवी कल्पनाशक्तीनें व विवेकशक्तीनें उत्पन्न केलेले विचार हे कोळ्याच्या जाळ्याप्रमाणें आहेत, असें बेकननें म्हटलेलें आहे. ज्याप्रमाणें कोळी आपल्याच अंगापासून चीक काढून त्याच्या धाग्याचें सुंदर जाळें बनवितो, पण तें एका फुकरासरसें तुटून जातें, त्याचप्रमाणें कल्पनाशक्तीनें व केवळ विवेकशक्तीनें उभारलेले विचारांचे डोलारे अनुभवानें मोडले जातात. सारांश, बेकनच्या मतें मानवी मनाची संवेदनशक्ति हीच खरें ज्ञान देणारी शक्ति होय. कल्पनाशक्ति व विवेकशक्ति या ज्ञानाभास देणाऱ्या शक्ति होत. तरी मनुष्यांनीं पहिल्या शक्तीवर विसंबलें पाहिजे; तर मनुष्याला सत्यज्ञान होईल. या मताच्या योगें बेकन हा संवेदनावादाचा जनक बनला.

डेकार्ट या फ्रेंच तत्त्वज्ञान्यानें दुसराच पंथ काढला. मला कोणत्या गोष्टीचें खात्रीचें ज्ञान आहे ? या प्रश्नापासून त्यानें तत्त्वज्ञानाला सुरवात केली. त्याचे मतें आपलीं इंद्रियें आपल्याला फसवितात;कारण तीं पुष्कळ वेळां ज्ञानाचा आभास मनांत उत्पन्न करतात. आपल्याला दृष्टिभ्रम होतो, श्रुतिभ्रम होतो. तेव्हां बाह्य सृष्टीचें खरें ज्ञान आपल्याला होत नाहीं. तसेंच गणितशास्त्रांतील प्रमेयें तरी खरीं कशावरून असा आपल्याला संशय येतो. सारांश; ज्ञानासंबंधीं आपण विचार करूं लागलों म्हणजे 'मला सर्व गोष्टींबद्दल संदेह वाटतो' अशा विधानाला आपण येऊन पोंचतों.

पण या संदेहात्मक विधानांत एका पदार्थाबद्दल संदेह राहत नाहीं. तो पदार्थ म्हणजे अहंभावरूप आत्मा अगर मन. संदेह वाटण्याला सुद्धां 'संदेही' अस्तित्वांत पाहिजे. तेव्हां ' मी विचार करतों म्हणून मी अस्तित्वांत आहें ' हें मोठें प्रमेय या संदेहपद्धतींतून निघतें. अहंभावाची जाणीव असलेल्या आत्म्याच्या अस्तित्वाबद्दलचें पहिलें सत्य आपल्याला निश्चितपणें कळतें. आतां या सत्यापासून आणखी सत्यें निष्पन्न होतात. आत्म्याच्या संदेहवृत्तीपासून आत्म्याचें अस्तित्व सिद्ध होतें. पण संदेहवृत्ति—आत्मा म्हणजे अपूर्ण सदोष आत्मा होय. पण अपूर्ण व सदोष आत्मा ही कल्पना सापेक्ष आहे. ती कळण्याकरतां 'संपूर्ण व दोषरहित आत्मा' ही कल्पना कळावीच लागते. पण ही दुसरी कल्पना म्हणजेच सर्वगुणसंपन्न परमेश्वराची कल्पना होय. तेव्हां जीवात्मा व परमात्मा अशा दोन कल्पना आपल्याला कळल्या. त्यांपैकीं जीवात्म्याच्या अस्तित्वाची खात्री झालीच आहे. आतां परमात्म्याच्या अस्तित्वाची खात्री खालील प्रमाणानें पटते. सर्वगुणसंपन्न परमात्मा अस्तित्वांत असलाच पाहिजे. कारण जर तो अस्तित्वांत नसेल तर तो सर्वगुणसंपन्न होणार नाहीं. कारण अस्तित्व हा गुण त्याच्यामध्यें नाहीं असें होईल. या विचारसरणीनें सृष्टींतील दोन पदार्थ सिद्ध झाले. आतां राहिली बाह्य सृष्टि. हिचें अस्तित्वही सिद्ध करतां येतें. परमात्मा सर्वगुणसंपन्न आहे. या गुणांमध्यें 'सचोटी' हा गुण येतो. तेव्हां सर्वगुणसंपन्न परमेश्वर दुसऱ्यास फसविणार नाहीं. म्हणूनच आपल्या इंद्रियांना ज्या ज्या गोष्टी दिसतात त्या त्या सत्यमय असल्या पाहिजेत. नाहीं तर परमेश्वरानें आपल्याला भ्रमविणारीं इंद्रियें देऊन फसविलें असें होईल. याप्रमाणें तत्त्वज्ञानाचे तीन पदार्थ सिद्ध झाले. जीवात्मा, परमात्मा व जड सृष्टि परमात्मा हा पूर्ण असून त्यानेंच जीवात्मे व जड सृष्टि निर्माण केली. जीवात्मे व जड सृष्टि यांचे गुण परस्परविरोधी आहेत. जीवात्मा विवेकवान् व अवकाशरहित पदार्थ आहे तर जड सृष्टि ही विवेकरहित व अवकाश व्यापणारी आहे. याप्रमाणें डेकार्टचें तत्त्वज्ञान आहे. या तत्त्व-

ज्ञानाचा विशेष म्हणजे त्यांत मानवी मनाच्या विवेकावर सर्व भर टाकलेला आहे. म्हणूनच डेकार्ट हा विवेकवादाचा जनक बनला.

डेकार्टचें तत्त्वज्ञान स्पायनोझा यानें परिपूर्णतेस आणिलें. साधारणतः यासारख्याच मतांचा पुरस्कार लायब्निट्स या जर्मन तत्त्वज्ञान्यानें केला व लायब्निटझच्या मतांचा व्यवस्थित संग्रह वुल्फ या तत्त्वज्ञान्यानें केला व हेंच तत्त्वज्ञान कँटच्या काळीं जर्मन युनिव्हर्सिटींत प्रचलित होतें. हें मागें एकदां सांगितलेंच आहे.

बेकननें प्रारंभ केलेल्या संवेदनावादाकडे आतां वळणें जरूर आहे. बेकन हा तत्त्वज्ञानी म्हणून फारसा प्रसिद्ध नाहीं. संवेदनावादाचा खरा पुरस्कर्ता लॉक हा इंग्रज तत्त्वज्ञानी होय. त्यानें सर्व ज्ञान संवेदनांनीं मिळतें असें प्रतिपादन केलें. विवेकशक्तीचाही त्यानें उल्लेख केला आहे. पण ज्ञानाच्या बाबतींत विवेकाचें काम गौण आहे असें त्याचें म्हणणें आहे. सर्व ज्ञानाचें मूळ संवेदनांत आहे. संवेदनांनीं कांहीं ज्ञान झाल्यावर त्या ज्ञानाच्या संयोगानें आणखी ज्ञान विवेकाला काढतां येईल. पण सर्व ज्ञान संवेदनात्मक आहे असें लॉकचें म्हणणें आहे. त्याचें मतें प्रारंभीं मानवी मन कोऱ्या कागदासारखें असतें. त्यावर संवेदनांनींच प्रथमतः संस्कार होतात व त्यांपासून मग पुढें विचार बनतात. डेकार्टप्रमाणें लॉकही सृष्टींत तीन पदार्थ आहेत असें मानीत असे. इंद्रियांनीं दिलेल्या संवेदनांनीं आपल्याला बाह्य सृष्टि कळते. म्हणजे बाह्य सृष्टीचें सर्व ज्ञान संवेदनात्मक आहे. आत्म्याचें ज्ञान आपल्या सर्व जाणीवेंत व संवेदनांत प्रतीत होतें असें डेकार्टप्रमाणेंच लॉक म्हणे. ईश्वराचें ज्ञान आपल्याला अनुमानानें होतें असें तो म्हणे; तें येणेंप्रमाणें:--

ही सृष्टि व मानवी प्राणी हीं कार्यें होत. आतां या कार्यांना कोणी तरी कर्ता पाहिजे व तो कर्ता सर्वशक्तिमान व सर्वज्ञ असा असला पाहिजे. तो अर्थात् परमेश्वरच होय. लॉकच्या पुढची संवेदनवादाची पायरी बार्क्लेनें गांठली. त्यानें तर सर्व ज्ञान संवेदनात्मक आहे व म्हणून बाह्य जगच मुळीं मानतां येत नाहीं असें दाखविलें. पण या पुस्तकांत

बार्क्लेच्या तत्वज्ञानाची हकीकत आलीच आहे. तेव्हां त्याची येथें पुनरावृत्ति करण्याचें कारण नाहीं.

ह्यूमनें संवेदनावादाचा अंत संशयवादांत कसा होतो हें स्पष्ट करून दाखविलें. त्यानें प्रथमतः तीन पदार्थांबद्दल संशय प्रदर्शित केला. त्याचें म्हणणें हें कीं, बार्क्लेनें दाखविलेल्या ज्या कारणाकरितां आपल्याला जड सृष्टीचें अस्तित्व मानतां येत नाहीं त्याच कारणाकरितां आत्मा व परमात्मा यांचेंही अस्तित्व मानतां येत नाहीं. कारण संवेदनांच्या मागें कांहीं तरी ' जड पदार्थ ' आहे असें आपल्याला सांगतां येत नाहीं, तर मनाच्या संवेदना, कल्पना, विचार, वासना व विकार—मनाचे सर्व व्यापार यांच्या मागें आत्मा आहे असें तरी कसें सांगतां येईल ? व जड सृष्टि व आत्मा हे पदार्थ संशयास्पद ठरल्यावर परमात्मा या पदार्थांच्या अस्तित्वाला तरी आधार काय ? तोही संशयास्पद ठरतो.

याप्रमाणें ह्यूमनें तत्त्वज्ञानाच्या पदार्थत्रयावर घाला घातला. पण तो येथेंच थांबला नाहीं. आधिभौतिक शास्त्राचा पाया जी 'कार्यकारणाची कल्पना' त्या कल्पनेवर ह्यूमनें घाव घालण्यास सुरवात केली. बेकन, लॉक किंवा बार्क्ले या संवेदनावादी तत्त्वज्ञान्यांनीं कार्यकारणभावाची कल्पना गृहीतच धरली होती. लॉकच्या मतें ती कल्पना आपल्या इतर शास्त्रीय कल्पनांप्रमाणें आपल्याला अनुभवानें—संवेदनांनीं कळतें. येथेंच ह्यूमनें लॉकची घोडचूक दाखविली. ह्यूमचें म्हणणें असें कीं, कार्यकारण भावाचा विचार ही कल्पनाशक्तीची भ्रांति आहे. ती संवेदनांनीं समजणें शक्यच नाहीं. कारण, संवेदना एकामागून येतात, एवढेंच संवेदना सांगूं शकते; एक बिलियर्ड गोटी हालल्यानंतर दुसरी हलते, उष्णतेची संवेदना झाल्यावर भाजल्याची संवेदना होते. पण एक गोटी दुसऱ्या गोटीच्या गतीचें कारण हें कांहीं आपण पहात नाहीं. तसेंच उष्णता हें भाजल्याचें कारण हें कांहीं आपण पहात नाहीं. उष्णता व भाजणें ही पुष्कळ वेळां एका मागून एक आलीं म्हणजे आपल्याला त्यामध्यें जास्त निकट संबंध आहे असा नुसता भास होतो; परंतु संवेदनांमध्यें निकट

संबंध उत्पन्न होत नाहीं; तर तो कल्पनासंगतीच्या तत्वानुरूप आपल्या केवळ मनांत उत्पन्न होतो. तेव्हां आपल्याला संवेदनांनीं जें बाह्य सृष्टिचें ज्ञान होतें तें अगदीं विस्कळीत असतें. त्यांत संबंधकल्पना येत नाहीं. म्हणून कार्यकारणाची भावना हा निवळ मानवी कल्पनेचा भ्रम आहे. त्यांत सत्यांश मुळींच नाहीं. याप्रमाणें ह्यूमनें कार्यकारण भावाच्या कल्पनेवर घाला घातला व ती कल्पना भ्रममूलक आहे असें दाखविलें. या योगें कार्यकारण भावाच्या तत्वावर उभारलेली सर्व आधिभौतिक शास्त्रांची इमारत पार ढासळली. ह्यूमच्या मताप्रमाणें पदार्थत्रय संशास्पद झालें; कार्यकारणभाव भ्रमरूप झाला. अर्थात् शास्त्राचा सर्व पायाच गेला व अशा तऱ्हेनें ह्यूमनें संवेदनावादाचा संशयवादांत शेवट करून दाखविला.

मानवी मनाला ज्ञान असाध्य आहे व म्हणूनच संशयवाद खरा ही कल्पना कँटच्या मनाला मुळींच सहन होईना. तरुण वयापासून त्याचा सर्व भर आधिभौतिक शास्त्रांवर. तीं शास्त्रेंही ह्यूमच्या तत्वज्ञानानें जेव्हां विलयास जाऊं लागलीं, तेव्हां कँटचें मन गोंधळून गेलें. त्याची मनोदेवता त्याला सांग कीं गणित व भौतिक शास्त्रें या द्वयीमध्यें तरी सत्य ज्ञान आहे खास. पण तत्वज्ञानाच्या पंथाप्रमाणें तर या ज्ञानावर पाणी सोडण्याची पाळी आली. तरी पूर्वीच्या तत्वज्ञानाची कोठें तरी भयंकर भूल होत असली पाहिजे असें कँटच्या मनानें घेतलें. व म्हणूनच त्यानें तत्वज्ञानाचा प्रश्न मुळापासून स्वतंत्रपणें सोडविण्याचा निश्चय केला व त्या निश्चयाचें फळ म्हणजेच कँटचें परिक्षणात्मक तत्वज्ञान होय. तेव्हां आतां त्या कँटच्या तत्वज्ञानाकडेच आपण वळणें बरें.

( ३ )

# कँटचें तत्त्वज्ञान.

पूर्वीच्या सर्व तत्वज्ञानापासून आपल्या तत्त्वज्ञानाचा फरक दाखविण्या-करतां कँटनें आपल्या तत्वज्ञानाला 'परीक्षणात्मक तत्वज्ञान' असें नवीन नांव दिलें आहे व तें त्यानें तीन ग्रंथांत ग्रथित केलें आहे. या ग्रंथांचीं नांवेंही दुर्बोध अशीं आहेत. प्रथमतः त्यानें 'शुद्ध विवेकाचें परीक्षण' या नांवाचा ग्रंथ लिहिला. हाच त्याच्या तत्वज्ञानाचा मूळ ग्रंथ होय. यामध्यें कँटनें आपली नवी ज्ञानमीमांसा इचें विवेचन केलें. नंतर त्यानें 'सदसद्विवेकाचें परीक्षण' म्हणून दुसरा ग्रंथ लिहिला. यांत त्याचे नीति-शास्त्रविषयक विचार आलेले आहेत. शेवटीं त्यानें 'भावनेचें परीक्षण' नांवाचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ कँटच्या तत्वज्ञानरूपी कमानीचा जणूं कांहीं मधला चिराच आहे. यामध्यें आपल्या पहिल्या दोन ग्रंथांतील विचा-रांचा मेळ घालून कँटनें त्यावर नवीन विचारांचा मुगुटमणी चढविला आहे. हे तीन ग्रंथ म्हणजे मानवी मनाच्या तीन प्रमुख शक्ति—विवेकशक्ति, इच्छाशक्ति व भावनाशक्ति—यांचें विवेचन आहे असें म्हटलें तरी चालेल. आतां क्रमानें या तीन ग्रंथांचें थोडक्यांत सार सांगूं या.

कँटनें कॉलेजांत असतांनाच वुल्फच्या विवेकवादी तत्वज्ञानाचा अभ्यास केला होता. या मताचें म्हणणें हें कीं, सर्व मानवी ज्ञान विवेकानें होतें. पण त्याच वेळीं विवेकशक्तीचा कमतरपणा कँटच्या मनांत आला होता. विवेकशक्ति ही पृथक्करणात्मक शक्ति आहे; ती विधायक शक्ति नाहीं. विवेक विचारांचें पृथक्करण करून त्यांतून अनुमानानें सिद्धांत काढील. परंतु विवेकानें नवीन ज्ञान कधींही होणार नाहीं. विवेकाला प्रथमतः पुष्कळसे सिद्धांत गृहीत धरावे लागतात व त्या सिद्धांतांच्या साहाय्यानें

उपसिद्धांत विवेक काढतो. तेव्हां सर्व ज्ञान विवेकानें होतें हें म्हणणें बरोबर नाहीं असें कँटला वाटत असे. त्या वेळीं हे गृहीत धरलेले सिद्धांत अनुभवानें कळतात असें त्याला वाटे, पण ह्यूमनें अनुभवानें सिद्धांत निघत नाहींत असें दाखविण्याचा प्रयत्न केला. याप्रमाणें सर्व ज्ञान संशयास्पद होऊं लागलें. म्हणूनच कँटनें मानवी ज्ञान कसें होतें हाच प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाचे त्यानें चार विभाग केले व आपल्या ग्रंथांच्या चार भागांत त्यांचें विवेचन केलें. मानवी ज्ञानाचें स्थूल मानानें तीन शास्त्रांमध्यें वर्गीकरण करतां येतें. गणित, आधिभौतिक शास्त्रें किंवा सृष्टिशास्त्र आणि तत्वज्ञान. गणित व सृष्टिशास्त्रें हीं अस्तित्वांत असून त्यांची सारखी प्रगति होत आहे ही निर्विवाद गोष्ट आहे असें कँटचें म्हणणें होतें. तत्वज्ञानाच्या अस्तित्वाबद्दल मात्र शंका आहे. कारण त्यांत सर्वसंमत अशीं प्रमेयेंच दृष्टीस पडत नाहींत. म्हणून विचार करावयाचे प्रश्न हे होत.

१ गणितशास्त्र कां व कसें शक्य आहे?

२ सृष्टिशास्त्र का व कसें शक्य आहे?

३ तत्त्वज्ञान शक्य आहे का? व शक्य नसल्यास मानवी मनाची तत्त्वज्ञानविषयक स्वाभाविक प्रवृत्ति कां आहे?

४ कोणत्या पायावर नवीन तत्त्वज्ञान बनवितां येईल?

कँटच्या पहिल्या परीक्षणात्मक ग्रंथांत या चार प्रश्नांचीं चार भागांत उत्तरें आलेलीं आहेत. हीं उत्तरें देतांना कँटच्या मनापुढें विवेकवाद व संवेदनावाद हे एकांगीवाद सारखे आहेत व त्यांना उद्देशूनच जणूं कांहीं कँटनें या प्रश्नांचीं उत्तरें दिलीं आहेत. त्याचा प्रथमतः ओढा संवेदनावादाकडे होता व म्हणून त्या वादाच्या म्हणण्यापासून सुरवात करून कँटनें त्या वादाचा कमतरपणा दाखवून हळुहळू आपल्या परीक्षणात्मक तत्त्वज्ञानाकडे वाचकांना ओढीत नेलें आहे.

सर्व मानवी ज्ञानाला संवेदनांपासून सुरवात होते हें खरें आहे. पण त्यावरून सर्व ज्ञान संवेदनात्मक आहे हें मात्र खरें नाहीं. संवेदना ही

ज्ञानाचें एक अंग आहे. त्या अंगाला बुद्धीच्या व्यापाराची जोड झाल्या खेरीज त्याला ज्ञानरूप प्राप्त होत नाहीं. तेव्हां बुद्धीचें अंग ज्ञानाला आवश्यक आहे व ज्ञान हें संवेदना व विचार (बुद्धीचें कार्य) यांच्या संयोगापासून होतें असें कँटनें प्रतिपादन केलें आहे व प्रथमतः संवेदनांत बुद्धीचा अंश कसा आहे हें पहिल्या भागांत दाखवून दिलें आहे.

बाह्य पदार्थांपासून इंद्रियद्वारां आपल्याला संवेदना होतात असें आपण म्हणतों. या संवेदना एकसमयावच्छेदेंकरून किंवा एकामागून एक अशा आपल्या मनावर येतात. तसेंच त्या बाहेरून, दुरून, जवळून, मागून, पुढून, खालून, वरून, उजवीकडून, डावीकडून येतात. आतां एकसमयावच्छेदकता व आनुपूर्व्य यांमध्यें काळाची कल्पना अन्तर्भूत झालेली आहे व बाह्यता यामध्यें अवकाश, दिशा या कल्पनेचा अन्तर्भाव झालेला आहे. म्हणजे दिक् व काल या संवेदना नव्हत, तर संवेदना मानवी मनाला मिळण्याच्या या अटी आहेत. जर मानवी मनाला संवेदना व्हायच्या असतील तर त्या अवकाश व काल याशिवाय होणार नाहींत. अवकाश व काल हीं जणूं कांहीं मानवी मनानें उत्पन्न केलेलीं वस्तूंचीं आवरणें होत. बाह्य वस्तूचें ज्ञान या आवरणांतूनच आपल्याला व्हावें अशीच आपल्या मनाची घटना आहे. म्हणजे अवकाश व काल या संवेदना नव्हत. कारण संवेदना भासण्यास त्यांची जरूरी आहे व त्या बाह्य वस्तुही नव्हत. कारण त्या सर्वव्यापी आहेत तेव्हां अवकाश व काल हीं मानवी बुद्धीचा मानवी ज्ञानाला लागणारा वाटा आहे. आतां गणितशास्त्र, अवकाश काल व (पुढें विवेचन करावयाची कल्पना संख्या व परिमाण) संख्या या गुणत्रयीचें शास्त्र आहे हें सर्वसंमत आहे. या शास्त्रांत नवीं नवीं सत्यें व सिद्धांत आपण सिद्ध करतों तें अनुभवानें किंवा प्रयोगानें करीत नाहीं तर तें विवेकानें एका खोलींत बसून सिद्ध करतों; तरी पण हे आपल्या विवेकानें सिद्ध केलेले सिद्धांत सर्व ज्ञात-अज्ञात बाह्य सृष्टींतील पदार्थांना लागू असले पाहिजेत, असें आपण खात्रीनें सांगूं शकतों. सारांश, गणितशास्त्र शक्य आहे. कारण जरी तें केवळ विवेकानें सिद्ध केलें जातें,

तरी गणितशास्त्राचे विषय मुळीं मानवी मनानें संवेदनांस दिलेले असल्यामुळें गणिताचे सिद्धांत सर्व पदार्थमात्राला लागू आहेत.

याच्या पुढल्या प्रश्नाच्या उत्तराकरितां कँटनें ज्ञानाचें जास्त पृथक्करण केलें आहे. आपण ज्याला ज्ञान म्हणतों त्या विस्कळीत कल्पना नव्हेत. ज्ञान हे दोन कल्पनांच्या संयोगानें होतें, म्हणजे ज्ञान हें विधानाच्या योगें होतें. आतां ह्यूमनें म्हटल्याप्रमाणें संवेदना तर विस्कळीत व एकापासून एक दूर अशा असतात, त्यांत संबंध दिसून येत नाहीं. सर्व ज्ञान तर संबंधमय असते. तेव्हां ज्ञानांत हे संबंध कसे उत्पन्न होतात ? तर बुद्धि आपल्या कांहीं स्वयंसिद्ध कल्पनांनीं हे संबंध उत्पन्न करते व ज्या अर्थी विधानें बुद्धीनें केलीं जातात त्या अर्थी तर्कशास्त्रानें केलेल्या विधानांच्या वर्गीकरणाकडे पाहिलें म्हणजे ज्ञानामध्यें बुद्धीचा अंश किती हें तेव्हांच कळून येईल. कँटनें विधानाच्या वर्गीकरणावरून व पृथक्करणावरून खालील कल्पना ज्ञानामध्यें अन्तर्भूत होतात असें काढलें आहे.

| | |
|---|---|
| संख्येची कल्पना | १ एकत्व, बहुत्व व एकूणत्व. |
| गुणाची कल्पना | १ अस्तित्व, नास्तित्व व आस्तित्वनास्तित्व |
| संबंधाची कल्पना | १ पदार्थांची शाश्वतता, २ कार्यकारणभाव ३ अन्योन्याश्रयभाव. |
| संभवनीयतेची कल्पना | २ शक्यता व अशक्यता, २ प्रत्यक्षता, अप्रत्यक्षता ३ अवश्यकता व संभवनीयता. |

विस्कळीत संवेदनांना ज्ञानात्मक स्वरूप येण्यास या सर्व कल्पना अवश्यक आहेत. व या विशिष्ट कल्पनांशिवाय आणखी सर्व ज्ञानांत एक सामान्य कल्पना अन्तर्भूत झालेली असते; ती कल्पना म्हणजे आत्म्याची होय. सर्व संवेदनाचें एकीकरण व्हावयास या सर्व कल्पना मी अनुभवीत आहे अशी आत्म्याची जाणीव लागते. त्याखेरीज संबद्ध असें ज्ञानच शक्य नाहीं. तरी आतां पूर्वींच्या विवेचनाचा संग्रह करून मानवी ज्ञानाचे अवयव कोणते ठरतात तें पाहूं या.

ज्ञान होण्यास प्रथमतः संवेदना पाहिजेत हें उघड आहे. संवेदनां-

खेरीज ज्ञानाला प्रारंभच होणार नाहीं. तेव्हां मानवी ज्ञानाचें पहिलें अंग संवेदना होत; पण या संवेदना अवकाश व काल यांखेरीज शक्य नाहींत; म्हणून अवकाश व काल हींही ज्ञानाचीं अंगें होत. शिवाय ज्ञानाला एकत्व किंवा संबद्धत्व आणणाऱ्या कल्पना म्हणजे संख्या, गुण, संबंध व संभवनीयता या होत व या सर्वांच्या मूळाशीं आत्म्याच्या जाणीवेची कल्पना. कोणतेही ज्ञान तुम्ही घ्या; त्यांत या सर्व अंगांचा अन्तर्भाव झालेला आहे असें आपल्यास दिसून येईल. एका दाखल्यानें हें स्पष्ट करतां येईल. समजा एखादा मनुष्य गाढ निद्रेंतून जागा झाला तर प्रथमतः त्याच्या मनावर त्याच्या इंद्रियांकडून संवेदनांचा जणू कांहीं मारा होईल. या सर्व संवेदनांचा त्याच्या मनांत घोटाळा माजलेला असेल. मला संवेदना होत आहेत येवढेंच आधीं त्याला कळेल. व बुद्धीच्या व्यापाराच्या योगें या सर्व विस्कळीत व म्हणूनच संदिग्ध संवेदनांचें बुद्धीनें दिलेल्या स्वयंसिद्ध कल्पनांनुरूप वर्गीकरण होईल व त्या संवेदनांना स्पष्ट व सविकल्प ज्ञानाचें स्वरूप प्राप्त होईल. हें सर्व परिवर्तन मानवी मनाला न कळत अशा तऱ्हेनें मनांत होत असते व मगच मानवी ज्ञान तयार होतें. म्हणजे संवेदनारूपी ज्ञानाच्या कच्च्या मालावर बुद्धीचे व्यापार घडून ज्ञानरूपी पक्का माल तयार होतो असें उपमेनें सांगतां येतें.

थोडक्यांत कँटची ज्ञानमीमांसा वरील तऱ्हेची आहे. त्यानें संवेदनावादी व विवेकवादी ह्या दोघां तत्वज्ञांची ज्ञानमीमांसा कशी एकतर्फी व म्हणून चुकीची आहे हें आपल्या नव्या परीक्षणात्मक तत्वज्ञानांत दाखविलें आहे. कँटच्या मताप्रमाणें मानवी ज्ञानाला खालील गोष्टी अवश्यक आहेत.

१ संवेदना.

२ अवकाश व काल.

३ संख्या, परिमाण, भावरूपी व अभावरूपी गुण, कार्यकारणभाव, अन्योन्याश्रयभाव, पदार्थांचे अविनाशित्व व शक्याशक्यता वगैरे बारा स्वसंसिद्ध कल्पना.

४ सर्व ज्ञानाला एकसूत्रता आणणारी आत्म्याची जाणीव.

वर दिल्याप्रमाणें थोडक्यांत कँटची मानवी ज्ञानाची मीमांसा आहे. तिचा विशेष हा होय कीं, संवेदनावादी व विवेकवादी या दोन्ही पंथांच्या तत्त्वज्ञान्यांच्या मतांतील सत्याच्या अंशाचा अंतर्भाव कँटनें आपल्या मीमांसेंत केला आहे. संवेदना व विवेक या दोन्हीहि शक्ति मानवी ज्ञानाला आवश्यक आहेत असें त्यानें प्रतिपादन केलें आहे. व या मीमांसेच्या योगानें त्यानें आधिभौतिक शास्त्रांची शक्यता शाबीत केली आहे. आधिभौतिक शास्त्रें गणितशास्त्राप्रमाणें कांहीं तत्वें स्वयंसिद्ध अशीं धरतात व त्या तत्वांवरच सर्व आधिभौतिक शास्त्रें अवलंबून आहेत. पण हीं तत्वें मानवी ज्ञानाला विवेकज्ञानमीमांसेंत अंतर्भूत झालेल्या कल्पनांच्या द्वारेंच होतात. उ० सर्व ज्ञेय पदार्थांना अवकाश, काल, संख्या व परिमाण हे गुण असतात व म्हणूनच सर्व बाह्य ज्ञेय पदार्थ हे सावयव असून ते विभागतां येतात. आतां आधिभौतिक शास्त्रांतलें हें गृहीत तत्त्व ज्ञानाच्या अटीपासून निष्पन्न होतें हें उघड आहे. तसेंच सर्व बाह्य ज्ञेय पदार्थांना कमीअधिक होणारे सांश गुण आहेत हें तत्त्व सुद्धां ज्ञानाच्या अटींपासून निष्पन्न होतें. त्याप्रमाणेंच प्रत्येक ज्ञेय वस्तु ही कांहीं तरी कारणाचें कार्य असतें हें तत्व सुद्धां ज्ञानाच्या अटीपासूनच निष्पन्न होतें. तसेंच बाह्य सृष्टि ज्या जड द्रव्यानें बनलेली आहे तें जड तत्व अविनाशी आहे, त्याची जगांत नवी वाढ होत नाहीं किंवा त्याचा जगांत नाशही कधीं होत नाहीं हें तत्व ज्ञानाच्या अटींतून निष्पन्न होतें. सारांश, कँटच्या मतानें त्याची एकदां ज्ञानमीमांसा गृहीत केली कीं, आधिभौतिक शास्त्रांचें त्यायोगें समर्थन होतें व ह्यूमची मानवी ज्ञानाबद्दलची व विशेषतः आधिभौतिक शास्त्रांच्या शक्यतेची कुशंका नष्ट होते.

येथपर्यंत गणितशास्त्र व आधिभौतिक शास्त्रें यांची शक्यता शाबीत करून ह्यूमची चूक कँटनें दाखवून दिली. त्याच्या पुस्तकाच्या पुढल्या भागांत मात्र ह्यूमचें व कँटचें एकमत असून त्यांत त्यानें विवेकवादी तत्वज्ञान्यांचें तत्वज्ञानाच्या अस्तित्वाबद्दलचें मत खोडून काढलें आहे व अज्ञेयवाद स्थापित केला आहे. विवेकवादी तत्वज्ञान्यांच्या मतानें आप-

त्याला तत्वज्ञान साध्य आहे. त्यांचे मताप्रमाणें तत्वज्ञानाचे प्रश्न तीन. आत्म्याचें अस्तित्व व अमरत्व याबद्दलचा पहिला प्रश्न, सृष्टीचें यथार्थ व केवल स्वरूप याबद्दलचा दुसरा प्रश्न व परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दलचा तिसरा प्रश्न. हे तिन्ही प्रश्न आपल्या केवल विवेकानें सोडवितां येतात, असें विवेकवादीपंथाचें मत होतें. कँटनें असें दाखवून दिलें कीं, विवेकवादी यांच्या यासंबंधींच्या विवेचनांत घोडचुका आहेत व या वस्तूंचें ज्ञान मानवी मनाला होणें शक्य नाहीं व म्हणून मानवी बुद्धीच्या द्वारें तरी हे पदार्थ अज्ञेय आहेत.

प्रथमतः आत्म्याच्या अस्तित्वाचा प्रश्न घ्या. आत्म्याची कल्पना आपल्या ज्ञानाला आवश्यक आहे हें कँटला कबूल आहे सर्व ज्ञानांत 'ज्ञाता' व 'ज्ञेय' हा संबंध आवश्यक असतो व म्हणूनच आत्म्याची जाणीव हें एक ज्ञानाचें आवश्यक अंग आहे, असं कँटनें प्रतिपादन केलें आहे. पण हें ज्ञान होण्यास आपल्याला संवेदना आवश्यक आहेत. संवेदना येतील तेव्हांच मला संवेदना भासतात असें ज्ञान होईल. सारांश, आत्म्याच्या जाणिवेचें ज्ञान हें सापेक्ष आहे. तें संवेदनांशीं संलग्न आहे. म्हणजे विषय व विषयी किंवा ज्ञेय व ज्ञाता, किंवा बाह्य पदार्थ व आत्मा या दुकल सापेक्ष आहेत; त्या दोन्ही वस्तूंचें एकसमयावच्छेदेंकरून ज्ञान होतें. अर्थात् दोन्हीही कल्पना आपल्या ज्ञानांत अंतर्भूत आहेत असें ज्ञानाच्या पृथक्करणावरून आपल्याला कळतें. पण या आत्म्याचें मूळ स्वरूप काय; त्याचे गुण कोणते, तो अमर आहे काय, तो शरीराखेरीज बाहेर राहूं शकतो काय? वगैरे प्रश्नांचें उत्तर मिळणें शक्य नाहीं. कारण हे अतींद्रिय ज्ञानाचे प्रश्न झाले व असें अतींद्रियज्ञान आपल्याला होणें शक्य नाहीं. कारण ज्ञानमीमांसेवरूनच कळतें कीं संवेदना किंवा इंद्रियद्वारां अनुभव हा आपल्या ज्ञानाला आवश्यक आहे. अर्थात् आपल्या मानवी बुद्धीला अतींद्रियज्ञान शक्य नाहीं. कारण ती बुद्धि इंद्रियसंवेदनांनीं मर्यादित आहे. ता स्वतंत्र शक्ति नाहीं, ती ज्ञान उत्पन्न करूं शकत नाहीं, तर संवेदना अनुभवल्यावर बुद्धि त्यावर संस्कार करूं शकते इतकेंच. पण मानवी ज्ञानाचा पाया

संवेदना होय. व ह्यूमनें म्हटल्याप्रमाणें आत्म्याची आपल्याला संवेदना होत नाहीं. म्हणून तत्वज्ञानाचा हा भाग म्हणजे निवळ एक मानवी बुद्धीची घोडचूक होय. आपल्याला आत्मज्ञान नाहीं, म्हणून आत्म्याचें अमरत्व किंवा जडराहित्य किंवा अणुत्व वगैरे प्रश्न मानवी ज्ञानाच्या आटोक्याबाहेरचे आहेत.

बाह्य सृष्टीचें जें आपल्याला ज्ञान होतें तेंहि अर्थात् संवेदनात्मक असतें म्हणून आपल्याला बाह्य सृष्टीचें केवल स्वरूप कळणें शक्य नाहीं. विवेकवादीपंथानें असें ज्ञान होतें असें प्रतिपादन केलें आहे खरें. पण संवेदनावादीपंथानें त्यांचें म्हणणें खोडून काढलें आहे. कँटचें म्हणणें असें कीं, या परस्परविरोधी विधानांवरून हेंहि ज्ञान मानवी बुद्धीच्या आटोक्याबाहेरचें आहे असें दिसून येतें. उदाहरणार्थ बाह्य सृष्टि ही मर्यादित आहे किंवा अमर्यादित आहे ह्यासंबंधीं वाद आहे. दोन्ही विधानें प्रमाणानें सिद्ध करतां येतात. परंतु कँटचे मतें आपल्याला बाह्य सृष्टीचें निश्चित ज्ञान होणें शक्य नाहीं. कारण अवकाश ही जर सृष्टिज्ञानाची एक आवश्यक अट आहे तर आपल्याला बाह्य सृष्टीची मर्यादा संपली किंवा ती मर्यादा कधींहि संपणार नाहीं असें म्हणतां येत नाहीं. या दोन्ही स्थिति अतींद्रिय आहेत व आपल्या बुद्धीला अतींद्रियज्ञान होऊं शकत नाहीं. तसेंच बाह्य सृष्टि विभाज्य आहे किंवा अविभाज्य आहे, म्हणजे तिचे परमाणू आहेत किंवा नाहींत हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. कारण ही स्थिति अतींद्रिय आहे. असो.

आतां परमेश्वराची कल्पनाही अतीन्द्रिय आहे. म्हणूनच तो मानवी बुद्धीला अज्ञेय आहे. कारण परमेश्वर म्हणजे सर्वगुणसंपन्न व कारणरहित सृष्टीचें कारण होय. पण गुण हे आपल्याला संवेदनांनीं कळतात तेव्हां सर्वगुणसंपन्नता कळणें शक्य नाहीं. कारण ती अतीन्द्रिय आहे. तसेंच आपल्या बुद्धीला कारणरहित कारण कळणें शक्य नाहीं. कारण आपल्या बुद्धीला जें जें कळतें त्याला त्याला कार्यकारणभाव लागू

आहे. तेव्हां 'कारणरहित कारण' ही कल्पनाच मुळीं बुद्धिदृष्ट्या विसंगत आहे. तेव्हां असा पदार्थ आपल्याला कळणारच नाहीं.

परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल विवेकवादी जीं प्रमाणें पुढें आणतात तींही सदोष आहेत असें कँटनें दाखविलें आहे.

परमेश्वर पूर्ण किंवा सर्वगुणसंपन्न आहे. तेव्हां तो अस्तित्वांत असलाच पाहिजे. कारण जर त्याला अस्तित्व हा गुण नसेल तर तो सर्वगुणसंपन्न होणार नाहीं. ईश्वराच्या अस्तित्वाचें हें प्रमाण सदोष आहे. कारण येथें आपण कल्पनेवरून अस्तित्वाकडे जातों. 'पूर्ण पदार्थाची' कल्पना आपल्या अपूर्ण पदार्थाच्या कल्पनेवरून सुचते खरी; पण कल्पना म्हणजे खरी सृष्टि नव्हे. कल्पना जर खरी सृष्टि असती तर कविकल्पना किंवा स्वप्नकल्पना खऱ्या मानाव्या लागतील. मानवी बुद्धि खऱ्या खोट्याचा निर्णय संवेदनावरून करते व परमेश्वराची कल्पना तशी संवेद्य नाहीं. तेव्हां तिचें अस्तित्व सिद्ध करणें अशक्य आहे.

परमेश्वराच्या अस्तित्वाच्या दुसऱ्या प्रमाणाचें विवेकवाद्यांनीं असें विवेचन केलें आहे. बाह्य जग व मानवी मन अस्तित्वांत आहेत यांना कांहीं तरी कारण असलेंच पाहिजे व तें कारण परमेश्वर होय. पण कँटचें मतें हें प्रमाणही सदोष आहे. यांत जें तत्व आधिभौतिक शास्त्राला व ज्ञेय पदार्थांना लागू आहे तें तत्व अतीन्द्रिय पदार्थाला लागू केलें आहे. म्हणूनच सृष्टीचें कारण परमेश्वर तर परमेश्वराचें कारण काय असा जडवादी रोखठोक जबाब विवेकवाद्यांना विचारतात व मग विवेकवादी निरुत्तर होतात. कारण विवेकवादी व जडवादी यांमध्यें फारसा फरक राहत नाहीं. जडवादी 'जडा' शीं थांबतात तर विवेकवादी एक पायरी पुढें जातात येवढेंच. पण त्या पायरीच्या पुढें काय हा प्रश्न राहतोच. म्हणूनच कँटचें म्हणणें बुद्धीनें हा प्रश्न सुटण्यासारखाच नाहीं.

परमेश्वराच्या अस्तित्वाचे तिसरें प्रमाण म्हणजे सृष्टीच्या रचना चातुर्याचें प्रसिद्ध प्रमाण होय. या प्रमाणाबद्दल कँटला नेहेमीं आदर वाटत असे; पण बुद्धिदृष्ट्या या प्रमाणावरून परमेश्वर 'सृष्टीचा विश्वकर्मा'

येवढेंच फार तर सिद्ध होतें; म्हणजे सृष्टीचें मूळ द्रव्य अनादि व स्वतंत्र मानावें लागतें; परमेश्वर फक्त त्या जडद्रव्याची चतुराईनें मांडणी करतो इतकेंच दिसून येतें.

याप्रमाणें तत्त्वज्ञान मानवी बुद्धीच्या आटोक्याबाहेर आहे असें कँटनें दाखविलें आहे. मानवी ज्ञानाच्या योगानें विवेकशक्तीला ' आत्मा, सृष्टीचें केवळ स्वरूप व परमेश्वर' या कल्पना सुचतात खऱ्या व या कल्पनांचा 'ज्ञानाचें ध्येय' म्हणून उपयोग आहे खरा. पण या कल्पना अतीन्द्रिय असल्यामुळें त्यांचें ज्ञान होणें शक्य नाहीं. या विवेचनालाच कँटचा बौद्धिक अज्ञेयवाद म्हणतात.

अर्थात् बुद्धीनें तत्त्वज्ञान शक्य नाहीं असा कँटचा सिद्धांत आहे. पण बुद्धीखेरीज मानवी इतर शक्तीनें या अतीन्द्रिय गोष्टींबद्दल डोळस-श्रद्धा उत्पन्न होणें शक्य आहे. ती कशी उत्पन्न होते हें सांगणें म्हण-जेच कँटच्या नव्या तत्त्वज्ञानाचा मथितार्थ सांगणें होय. तरी आतां शेवटीं तिकडे वळूं.

कँटच्या नव्या तत्वज्ञानाचा उल्लेख त्याच्या पहिल्या परीक्षणात्मक ग्रंथाचें शेवटीं आला आहे खरा; व तेथें त्यानें या तत्वज्ञानाची रूपरेखा दिली आहे खरी; तरी पण त्या तत्वज्ञानाचें त्याच्या पुढच्या परीक्षणात्मक ग्रंथांत सविस्तर विवरण आलेलें आहे. त्याच्या पहिल्या परीक्षणात्मक ग्रंथाचा शेवट अज्ञेय वादांत होतो खरा; पण कँट येथेंच थांबत नाहीं. आपल्या ज्ञानांनें सूचित केलेले' आत्मा' 'परमेश्वर ' इत्यादि प्रश्न आपल्या बुद्धीला सुटले नाहींत तरी ते मानवी मनाच्या इतर शक्तींच्या आंवाक्या-बाहेरचे आहेत अशांतला भाग नाहीं; असें कँटचें म्हणणें आहे व हा मुद्दाच त्यानें आपल्या पुढील परीक्षणात्मक ग्रंथांत प्रमुखपणें पुढें आणला आहे.

त्याच्या दुसऱ्या परीक्षणात्मक पुस्तकाचा विषय सद्सद्विवेकशक्ती हा होय. मनुष्याला पुष्कळ वासना आहेत; त्यामुळेंच मनुष्य प्रवृत्तिपर बनून वर्तन करतो. पण पशुप्रमाणें मनुष्याचें वर्तन केवळ वासनावर

अवलंबून नसतें . तेथेंही मनुष्याची विवेकशक्ति पुढें येते व मनुष्याला आज्ञा करते. म्हणून त्या विवेकशक्तीला सद्सद्विवेकशक्ति म्हणतात.' तूं अमूक मार्गानेंच वागलें पाहिजे, तुझें अमुक कर्तव्यकर्म आहे ' अशी सद्सद्विवेकशक्ति आज्ञा करते. आतां, ही आज्ञा ' तुला लेखक व्हावयाचें असेल तर चांगलें अक्षर कर; किंवा तुला सुख पाहिजे असेल तर वासनातृप्ति कर ' अशा तऱ्हेची शर्तीची आज्ञा नसते. तर ती बिनशर्त आज्ञा असते. ' विवेकी मनुष्य म्हणून तूं हें केलें पाहिजेस, तुझें कर्तव्यकर्म म्हणून हें केलें पाहिजेस; फलाशा ठेवून कर्म करतां कामा नये ' अशा तऱ्हेची ही आज्ञा असते. अर्थात् अशी आज्ञा पाळणें म्हणजे वासनांना बाजूस सारून केवळ विवेकाचे पाय धरणें होय. ही आज्ञाच सर्व नीतिनिर्बंधाचा मूळ पाया होय. या बिनशर्त आज्ञेपासूनच सर्व नीतीचे नियम निघालेले आहेत. आतां या आज्ञेचे स्वरूप तरी काय आहे ? अर्थात् या आज्ञेंत विशेष वासनांचा समावेश होत नाहीं, या आज्ञेंत सुखाच्या कल्पनेचें ध्येय येत नाहीं. ही आज्ञा कर्तव्य म्हणून कर्तव्य करा इतकेंच सांगते. तुमचें कर्तव्य कोणतें हें तुमच्या परिस्थितीवर व समाजांतील दर्जावर अवलंबून राहील. पण तुमचें कर्तव्यकर्म कर्तव्यकर्म म्हणून करा फलाशेनें करूं नका इतकेंच विवेकाचें म्हणणें आहे. अर्थात् ही आज्ञा सर्व माणसांना लागू आहे. ती सदा सर्वकाळ पाळावयाची आहे. ती एकाला आहे आणि दुसऱ्याला नाहीं अशांतला भाग नाहीं; तिला अपवाद टाकून नाहीं. एकाच परिस्थितींत जर एका मनुष्याचें एक कर्तव्यकर्म असलें तर त्याच परिस्थितींत तें सर्व मनुष्यांचें कर्तव्यकर्म असलें पाहिजे असें ती आज्ञा म्हणते. 'तूं अशा तऱ्हेनें वाग कीं तुझ्या वागण्याचें तत्व तुझ्या इच्छेनें सार्वत्रिक नियम करतां आल्यास तुझ्या विवेकाला तें तत्व आवडेल ' असें या आज्ञेचें स्वरूप कँटनें दिलें आहे. याला त्यानें नैतिक कायदा म्हटलें आहे व सर्व नीतिनियम या कायद्यापासून निष्पन्न होतात असें कँटनें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ सत्य बोलण्याचा

नियम घ्या. खोटें बोलून दुसऱ्याला फसविण्याची आपल्याला इच्छा होते. तेव्हां जर खोटें बोलण्याचें तत्व रास्त आहे तर सर्वांनीं अशा प्रसंगीं खोटें बोलण्यास हरकत नाहीं असें ठरतें. पण असा सार्वत्रिक नियम झाला तर कोणी कोणावर विश्वास ठेवणार नाहीं. व मग आपलें खोटें बोलण्याचा उपयोग नाहीं; तेव्हां खोटें बोलण्याची इच्छा म्हणजे अपवादात्मक आहे. आपण मात्र खोटें बोलावें व सर्वत्रांनीं खरें बोलण्याचा नियम पाळावा असें आपल्याला वाटतें. या विवेचनावरून खोटें बोलणें नैतिक कायद्याच्या विरुद्ध म्हणूनच अनीतीचें ठरतें.

तसेंच एखाद्याला चोरीची इच्छा झाली तर ही वाईट कीं चांगली ? जर चांगली तर सर्वांनीं सर्वांच्या वस्तु न विचारतां घेणें रास्त होईल. पण मग चोरीचा उद्देश नाहींसा होईल. कारण आपल्याजवळ चोरलेली वस्तु कशी राहील? दुसरा आपल्यास न विचारतां ती घेऊन जाईल व न विचारतां घेऊन जाणें यांत कांहीं वावगें नाहीं असें आपल्या वर्तनाचें तत्व सांगतें. पण अशी सार्वत्रिक अदाधुंदीची स्थिति आपल्या विवेकशक्तीला बरोबर वाटत नाहीं. येथेंसुद्धां सामान्य नियम व आपल्यापुरतां अपवाद आपल्याला पाहिजे असतो व म्हणून अशी अपवादात्मक वर्तणुक नैतिक कायद्याविरुद्ध ठरते. आणखी एक उदाहरण घेऊं. एखादा गरजू आपल्याजवळ मदत मागावयास आला तर ती त्याला द्यावी किंवा नाहीं? आपली स्वार्थी इच्छा म्हणते देऊं नये. पण आपलें करणें रास्त असेल तर कोणी कोणास संकटांत मदत करूं नये असा सार्वत्रिक नियम ठरतों. पण असा नियम व्हावा अशी आपली खरी इच्छा नसते. आपण संकटांत असलों म्हणजे दुसऱ्यांनीं आपल्या मदतीला यावें असें आपणास वाटतें तेव्हां येथें सुद्धां दुसऱ्याला मदत न करण्याची स्वार्थी बुद्धि ही अपवादात्मक असते. म्हणजे आपण मात्र दुसऱ्यास मदत करूं नये, दुसऱ्यानें मात्र आपल्या मदतीस धावावें असें आपलें आपलपोटेपणाचें वर्तन असतें व म्हणूनच आपलपोटेपणा हा नैतिक दुर्गुण ठरतो.

याप्रमाणें कँटनें सदसीद्विवेकशक्तीचें पृथक्करण करून नीती-नियमाची मीमांसा केली आहे. आतां या पृथक्करणावरून त्यांत कोणती गृहीततत्त्वें समाविष्ट झालेलीं आहेत, याचें विवेचन करणें क्रम-प्राप्त आहे.

नीतिशास्त्रांतला पहिला सिद्धांत म्हणजे कर्तव्यकर्माची जाणीव होय. ' मी अमुक एक गोष्ट केलीच पाहिजे; तें माझें कर्तव्यकर्म आहे.' पण विधानामध्यें माझी स्वतंत्रताशक्ति गृहीत धरली आहे. ( I ougbt therefore I can ) माझें कर्तव्यकर्म आहे म्हणजे मला तसें वागण्याची स्वतंत्र शक्ति आहे. बाह्य सृष्टीला लागू असणारा कार्यकारणभाव मला लागू नाहीं. मी आपल्या सदसद्विवेकशक्तीप्रमाणें वागण्यास समर्थ आहे असें सिद्ध होतें बाह्य सृष्टींतील गोष्टींच्या बाबतींत अमुक केलें पाहिजे असें आज्ञापक विधाने निरर्थक होय. कारण बाह्य वस्तु सृष्टिनियमानी बद्ध आहेत, त्यांना निराळ्या तऱ्हेनें वागणें शक्य नाहीं; पण विवेकी मानव-प्राण्याला स्वतंत्रता आहे व म्हणून त्याच्या विवेकशक्तीच्या आज्ञेला अर्थ व महत्त्व आहे. तेव्हां नीतिविषयक सदसद्विवेकशक्तीच्या आज्ञेपासून आत्म्याचें स्वतंत्र व कार्यकारणभावरहित अस्तित्व सिद्ध होतें. आपली बुद्धि या आत्म्याच्याबद्दल असलें विधान करूं शकत नव्हती. कारण आत्म्याचें स्वतंत्र अस्तित्व ही कल्पनाच मुळीं अतीन्द्रिय आहे व अशा कल्पनेचा प्रत्यय मानवी बुद्धीला होऊं शकत नाहीं. पण आतां आपल्या नैतिक अनुभवावरून आत्म्याचें स्वतंत्र अस्तित्व आपल्याला मानणें भाग आहे. कारण या अनुभवानें,हें एक गृहीत तत्व आहे, असें दिसून येतें.

सदसद्विवेकशक्तीनें दिलेल्या नैतिक कायद्यापासून दुसरें एक गृहीततत्व सिद्ध होतें तें असें. आपली सदसद्विवेकशक्ति म्हणते कीं, आपलें कर्तव्य-कर्म फलाशेनें किंवा वासनांनीं किंवा भावनांनी प्रेरित होऊन करूं नका तर कर्तव्य म्हणून सदसद्विवेकाची आज्ञा म्हणून करा. सारांश कर्तव्य-कर्म करतांना फलाशा वासना किंवा भावना यांचा लेशसुद्धां मनांत वावरूं देऊं नका असें विवेक सांगतो. पण जोंपर्यंत मानवी आयुष्य

देहाशीं संलग्न आहे तोंपर्यंत वासनाच्छेद, फलाशाछेद किंवा भावनाच्छेद सर्वांशीं होणें शक्य नाहीं असा आपला अनुभव आहे. पण ही गोष्ट जर अशक्य असती तर विवेकशक्ति अशी निरर्थक व निरुपयोगी आज्ञा कशी करती ? केवळ विवेकाची आज्ञा म्हणून वर्तन करणें आपल्याला साध्य झालें पाहिजे तर ती आज्ञा अन्वर्थक होईल. तेव्हां ही आज्ञा एका जन्मांत पाळण्यासारखी नसल्यास तिची पूर्तता पुढल्या जन्मांत होईल व अर्थात असें होण्यास आत्मा अमर असला पाहिजे असें मानण्यास आपण तयार झालें पाहिजे. म्हणजे नीतीच्या कायद्यावरून आत्म्याचें अमरत्व निष्पन्न होतें. हें नीतिशास्त्रांतून निघणारें दुसरें गृहीत तत्व होय.

आतां नीतिशास्त्रांतून निघणारें तिसरें गृहीत तत्व परमेश्वराच्या अस्तित्वाचें होय. कँटनें हें तत्व खालील पद्धतीनें सिद्ध केलें आहे. आपण मनुष्याच्या पुरुषार्थाच्या कल्पनेचा विचार करूं लागलों म्हणजे श्रेयस व प्रेयस किंवा धर्म व काम किंवा हित व सुख या दुकलीची आठवण होते. म्हणजे या दुकलीपैकीं दोन्ही गोष्टी जरी परस्पर भिन्न किंवा विरुद्ध आहेत, तरी त्या एकत्र असाव्या तरच मानवी आयुष्याचें खरें ध्येय साध्य झालें असें म्हणतां येईल. सारांश, सद्‌गुणी मनुष्य नेहमीं सुखी असावा असें आपली विवेकशक्ति सांगते. केवळ सद्‌गुण किंवा केवळ सुख येवढ्यानें मानवी आयुष्याची साफल्यता झाली असें विवेकशक्तीला वाटत नाहीं. तर खऱ्या आयुष्याच्या साफल्यतेला सद्‌गुण व सुख यांची सांगड पाहिजे असें विवेक कंठरवानें सांगतो. विवेकाची नैतिक आज्ञा तर निवळ सद्‌गुणांबद्दल आहे, उलट सुखाकडे पाहूं नको असें त्याचें म्हणणें आहे. तरी पण अंतीं सद्‌गुणी माणसाला सुख व्हावें असें आपल्याला वाटतें. तसेंच दुर्गुणी माणूस दुःखांत असावासें आपल्या विवेकशक्तीला वाटतें. पण आयुष्यांत तर नेहेमी याच्या उलट अनुभव येतो.

दुर्गुणी माणसें चैनींत व सुखांत आहेत असें आपण पाहतों तर सद्‌गुणी माणसें हालअपेष्टा व दुःख भोगीत आहेत असें आप-

त्याला दिसतें. पण ही वस्तुस्थिति आपल्या विवेकाला पटत नाहीं. तेव्हां आपली सहज भावना होते कीं, या जगांत परमेश्वर आहे व जरी हल्लीच्या जगांत अशी वस्तुस्थिति असली तरी ती क्षणीक आहे निरंतरची नाहीं; परमेश्वराच्या घरीं सद्‌गुणाला सुख लाभलेंच पाहिजे व दुर्गुणाला शासन झालेंच पाहिजे व जगाचा कर्ता तो न्यायी परमेश्वर येथें नाहीं तर स्वर्गांत तरी सद्‌गुणांची व सुखाची सांगड घालून देईल. तेव्हां या सर्व न्यायी परमेश्वराच्या अस्तित्वाच्या कल्पनेनें आपल्या नैतिक आकांक्षाचें समाधान होतें व असा न्यायी परमेश्वर नैतिक कल्पना असणाऱ्या जगाच्या मूळाशीं असलाच पाहिजे अशी आपली विवेकवाणी सांगते व आपल्या नैतिक अनुभवावरून तो आपल्याला श्रद्धेय आहे असेंही वाटतें.

सारांश, बुद्धीला ज्या गोष्टी शास्त्रीयदृष्ट्या म्हणजे संवेदनात्मक ज्ञानदृष्ट्या सिद्ध करतां येत नाहींत, त्या गोष्टी आपल्या नैतिक अनुभवानें सिद्ध करतां येतात व म्हणून तत्वज्ञान हें बौद्धिक अनुभवाच्या पायावर न उभारतां—कारण तेथें अज्ञेयवाद व जडवाद आपल्याला निरुत्तर करतात—नैतिक अनुभवाच्या पायावर उभारावें असें कँटच्या प्रतिपादनाचें सार आहे व यालाच तो आपलें नवें तत्वज्ञान म्हणतो; मात्र आत्मा, परमेश्वर वगैरे अतींद्रिय गोष्टींचें ज्ञान झालें असें न म्हणतां याबद्दल आपली विवेकी श्रद्धा उत्पन्न झाली असें तो म्हणतो. अर्थात् ही तडजोड कँटनें जडवाद्यांचें व अज्ञेयवाद्यांचें तोंड बंद करण्याकरितां सुचविली आहे असें दिसतें.

कँटच्या तिसऱ्या परीक्षणात्मक पुस्तकाचा विषय जडाजड जगांत दिसून येणारें सौंदर्य, भव्यता, प्रयोजन व रचनाचातुर्य इत्यादि गोष्टींचें विवेचन करण्याचा आहे. व या विवेचनावरून या जगाला कोणी तरी चिन्मय कर्ता आहे असें मानवी मनाला वाटावयाला लागतें, तेव्हां ज्याप्रमाणें आपल्या नैतिक अनुभवावरून मनुष्यामध्यें परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल श्रद्धा उत्पन्न होते त्याप्रमाणेंच मनुष्याच्या सौंदर्यविषयक अनु-

भवावरून परमेश्वरविषयक भावना मनांत उत्पन्न होते असें कँटनें या ग्रंथांत प्रतिपादन केलें आहे.

तात्पर्य, कँटचें नवें तत्वज्ञान जरी अज्ञेयवादी आहे असें प्रथमदर्शनीं वाटलें तरी त्या तत्वज्ञानाचा सर्व रोख परमेश्वराचें व आत्म्याचें अस्तित्व सिद्ध करण्याकडे आहे यांत शंका नाहीं. कँटचें म्हणणें थोडक्यांत असें सांगतां येईल; परमेश्वर किंवा आत्मा आपल्याला दृष्टीनें दिसत नाहीं. कारण हे पदार्थ उघड उघड अतींद्रिय आहेत, तेव्हां परमात्मा व जीवात्मा बुद्धिगम्य आहेत व बाह्य जगाप्रमाणें आपल्याला त्यांचें अस्तित्व कळतें अशा तऱ्हेचा आग्रह धरण्यांत अर्थ नाहीं. येथें अज्ञेयवादच पतकरणें श्रेयस्कर आहे. कारण, परमेश्वर आम्हांला कळत नाहीं. आमच्या आटोक्याबाहेरचा तो विषय आहे इतकें सिद्ध झालें तर निदान जडवाद्यांचें किंवा नास्तिक्यवाद्यांचें तोंड बंद होतें. याप्रमाणें दोघांचीं तोंडें बंद केल्यावर आपल्याला नीतिशास्त्राचा व नैतिक अनुभवाचा आश्रय करावयास सांपडतो. या नैतिक अनुभवावरून आपली परमेश्वराच्या व आत्म्याच्या अस्तित्वाबद्दल सकारण व विवेकी श्रद्धा उत्पन्न होते; नव्हे सौंदर्यविषयक भावनांनीं तर परमेश्वर साक्षात् आपल्याला भासमान होतो, म्हणजे जरी परमेश्वर मानवी मनाला कळत नाहीं; तरी त्यावर श्रद्धा बसते व जणूं कांहीं तो आपल्यापुढेंच उभा आहे असा भासतो. इतकेंच आपल्याला परमात्म्याबद्दल समजतें. पण हें समजणें कांहीं थोडें नाहीं. त्यानें आपण धर्मपरायण व नीतिपरायण होण्यास हरकत नाहीं व अशा तऱ्हेनें तत्वज्ञानाचा विकास केल्यास नास्तिक्याचा व जडवादाचा जगांतून नायनाट व्हायला हरकत नाहीं. हें कँटच्या शिकवणीचें सार होय व म्हणूनच कँटचें तत्वज्ञान सर्व युरोपभर पसरलें व कँट हा तत्वज्ञानांतील क्रांतिकर्ता बनला.

समाप्त

प्रो० गोविंद चिमणाजी भाटे यांचीं

## विक्रीस तयार पुस्तकें.

१ अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें २ऽ८
२ समाजशास्त्रावरील व्याख्यानें ऽ८
३ सज्जनगड व समर्थ रामदास ऽ१२
४ माझा उत्तरहिंदुस्तानचा प्रवास
किंवा हरिद्वार-मथुरा-वृंदावनादि
स्थळांचीं सचित्र वर्णनें ऽ१२
५ माझा अटकेपार प्रवास—सचित्र ऽ१२
६ हिंदुस्तानचें नंदनवन—सचित्र ऽ१२
७ कार्लाईल व हिंदूचालीरीति १
८ चरित्र-पंचक—सचित्र (छापत आहे) ऽ१२

**आर. आर. आणि मंडळी,**
केतकर यांचा बंगला, सांगली.